
रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ७ एप्रिल २०२४



# काँग्रेसने मिळवले वर्चस्व; आंबेडकरांना दिला धोका

आधुनिक केसरी

**देशात आठराव्या लोकसभेच्या निवडणुकीला सुरुवात झालेली आहे. हिंदुस्थानात १९५१- १९५२ पहिली निवडणुकीत राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा झाला. लोकांत उत्साह व आनंद होता!कारण आपल्या मतांनी आपले सरकार निवडून येणार होते! भारतीय मतदारांनी पहिल्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रहिताचा विचार करुन मतदान केले. तेव्हा राजकीय पक्षाचा जाहीरनाम्यास महत्व होते दिले. पहिल्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले. नेहरू युगाला सुरुवात झाली!पण काँग्रेसने अनेक घोडचूका केल्या. तो भारत आजही भोगत आहे.**

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले. पण देशाला फार मोठी किंमत मोजावी लागली. काँग्रेसने धर्मिक आधारावर देशाचे  विभाजन केले! यात वीस लाख भारतीयांचा बळी गेला! प्रेताचे ढिगारे करून जाळण्यात आले. या विभाजनाचा इतिहास काँग्रेसला पुसून टाकता येणार नाही. एकीकडे स्वांत्र्याचा आनंद दुसरीकडे लाखो भारतीयांच मुडदे पाडले गेले होते. याचे दु:ख होते. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहाले पंतप्रधान प्रांति पंतप्रधान कोणाला करावयाचे? यावर मतदान घेण्यात आले. काँग्रेस सदस्यांनी स.वल्लभाई पटेल यांचे बाजूने कौल दिला. पं. नेहरूंना एक मत मिळाले नाही. पण महात्मा गांधी यांचे हट्टापायी पं. नेहरु यांची म्हणून निवड केली गेली. २ सप्टेंबर १९४६ रोजी गर्व्हनर विल्काऊंट यांनी शपथ दिली. नंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी हंगामी पंतप्रधान म्हणून गर्व्हनर माउँटबेटन यांनी शपथ घेतली. आता भारतीय घटना अस्तित्वात आली नसताना नेहरुंनी कोणत्या घटनेची शपथ घेतली.? स. वल्लभाई पटेल यांनी मनाचे मोठेपणा दाखविला! पं. नेहरू यांना शेवटच्या श्वासापर्यंत साथ दिली. स. पटेल पंतप्रधान झाले असते तर काँग्रेस पक्षात घरणेशाही सुरू आलेली नसती. ते काँग्रेसवर नाराज झाले नाहीत व पक्ष सोडला नाही. पंतप्रधान निवडीसाठी पक्षाने प्रथम लोकशाही तत्वाची हत्या केली गेली. काँग्रेसचा नेता खूर्चीसाठी पक्षाला रोज तलाक देतो आहे. स.पटेल हे पोलादी नेते होते. त्यांनी हिंदुस्थानातील सर्व संस्थानांना विलीन करून घेतले! त्यांनी अखंड भारत जोडण्याचे जोखीमीचे काम केले. स. पटेलांचे यांचे कौतूक सोडा व मृत्यूनंतर काँग्रेस पक्षाला विसर पडला. नेहरूंचा उदो उदो करत राहिला. भारताची घटना तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परिश्रम घेतले त्यांनी घटनेत भारतात समान अधिकार, मताचा अधिकार दिला आहे.! महिलांना शिक्षणाचा व मताचा हक्क व अधिकार दिले! तसेच धार्मिक स्वातत्र्य दिले.तेंव्हा त्यांनी कायदे धर्मावर आधारित केले जाऊ नयेत नये, असे स्पष्ट बजावले होते. भारतीय घटना २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आली.त्यानंतर घटनेत अनेक दुरुस्ती करण्यात आलेल्या आहेत.जर घटना दुरुस्ती जर कायदे घटनेच्या चौकटीत नसेल तर सर्वोच्च खंडपीठ त्यावर निर्णय देत असतो.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

देशात १९५१ - १९५२ लोकसभेची निवडणुक लोकांसाठी राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा केला. घटनेने लोकांना आपले सरकार निवडण्यात अधिकार दिला होता, याचा लोकांना आनंद होता. गावा- गावात  मोठा उत्साह होता. शहरात तर गावात मिरवणूका काढण्याल आल्या होत्या! घरासमोर रांगोळ्या काढून गावात सजावट करण्यात आली मतदान केंद्रावर लोकशाहीचे तोरण बांधून सजविले गेले होते. देशाचे पहिले निवडणुक आयोग सुकुमार सेन यांच्यासमोर निवडणुका घेण्याचे मोठे आव्हान होते! देशाच्या १९५१ जनगणेनुसार लोकसंख्या ३६ कोटी १० लाख ८० हजार होते, त्यात साक्षरतेप्रमाणे केवळ १६.२७ टक्के होते. त्यामुळे मतदान कसे घ्यायचे? असा यक्ष प्रश्न होता निरक्षक मतदाराला हक्क बजावता यावा, म्हणून चिन्हाचा पर्याय निवड केला गेला. भारतात राजकीय चिन्हाचा आग्रह धरला जात आहे.यावरुन भांडत आहेत! यांना लाज कशी वाटत नाही. लोकसभेच्या निवडणुकीची तयारीला सहा महिने लागले.यात १७ कोटी३६ लाख मतदारांची नोंदणी झाली. त्यापैकी १० कोटी ५८ मतदारांनी मतदान केले.निवडणुकीवर १०.५ कोटी रुपये खर्च झाले. उमेवारांचा खर्च शंभर रुपये वर होत नव्हता! विरोधी पक्षाच्या सभेला लोक यायचे नाहीत! अनेकवेळा विरोधी पक्ष सत्ताधारी वाहनात जात असत ! त्यांच्यात वैचारिक मतभेद होते,वैर नव्हते. निवडणूक आयोगाने लोकशाहीचे आव्हान स्विकारले! आयोगाने राजकीय पक्षांनी चिन्ह दिले. त्यावेळी बैलजोडी चिन्हावर रस्सीखेच झाली. काँग्रेस आपण शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून 'बैलजोडी' चिन्ह घेतले. पण काँग्रेस सरकारचे कृषी धोरण फसवे निघाले!शेतकरी कर्जबाजारी होत गेला! त्यातून काँग्रेस व  शरद पवार कृषी मंत्री असताना देशात २००४ मध्ये सर्वाधिक शेतकऱ्यांनी गळ्याला फास घेतला! काँग्रेस ५५ वर्षात शेतकऱ्यांचे भले करू शकले नाही.पण त्याचे खापर मोदी सरकारवर फोडत आहेत! तेव्हा भारतीय जनसंघाने दिवा चिन्ह घेतले!तेंव्हा' जनसंघाचा दिवा घरोघरो लावा, असा होता.जनसंघाचा हा  दिवा घरात लागलाच नाही. भाकपाला विळा कणीस आदी चिन्ह मिळाले. डॉ.आंबेडकरांच्या शेड्यूल कास्ट फेडडेशनने 'हत्ती' हे चिन्ह घेतले. काँग्रेसचे 'हाता'चे चिन्ह ऑल इंडिया फारवर्ड ब्लॉक पक्षाचे होते. याची स्थापना नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी १९३९ मध्ये केली होती. तेव्हा १४ पक्ष व १९४९ उमेदवार उतरले होते! आजच्या सारखे राजकीय बाजार बुणगे नव्हते! उमेदवाराचा प्रचारावर सर्वाधिक एक हजार रूपये खर्च  झाला असावा. काँग्रेसने सरकाने देशात निवडणूक महाग केली. आज नव्वद लाखावरुन कोट्यवधी रुपायांची उधळण होत आहे. सामान्य माणूस निवडणुक लढविण्याचे स्वप्नही पाहू शकत नाही! तेव्हा देशात रस्ते, वाहने नव्हती, मतदानांसाठी यासाठी दोन कोटी लोखंडी मतपेट्या तयार केल्या गेल्या, तर ६२ कोटी मतपत्रिका छापण्यात आलेल्या होत्या! प्रत्येक स्वंतत्र पेटी त्यावर उमेदवार नाव व पक्षाचे चिन्ह लिहिले होते! त्यामुळे मतदार कोणाला मते टाकत आहे, हे उघडपणे समजत होती. यात गोपिनीयता राहत नाही हे लक्षात आले. त्यानंतर निवडणूक विभागाने सुधारणा केल्या आहेत! विरोधी पक्षाला पुन्हा कागदी मतपत्रिका पध्दत हवी आहे. म्हणजे बोगस मतदान करून घेता येते. या मतदानाला पाच महिने लागले, ६८ टप्यात मतदान घेतले! देशात ४५ टक्के मतदान झाले. भारताचे पहिले मतदार म्हणून श्याम सुरेन यांना मान मिळाला. यावेळी ४८९ जागापैकी काँग्रेसने ३६४  जागा मिळविल्या. यात डाव्या आघाडीला २७ आणि समाजवादी पक्षाला १२ तर जनसंघाला केवळ तीन जागा मिळाल्या! पहिल्या निवडणुकीत काँग्रेसला ४५ टक्के मते पडली.नंतर काँग्रेसच्या मताची टक्के घसरत गेली. ती १७ व्या लोकसभा निवडणुकीपर्यंत २० टक्यापर्यंत आली. काँग्रेस हा आंबेडकर यांचा व्देष केला तो दलित आरक्षण विरोधी होता! याचा पुरावा म्हणून नेहरूंचे ते पत्र मोदींनी संसदेत ठेवले. काँग्रेसने डॉ.आंबेडकरांच्या विरोध उमेदवार न देण्याचे वचन दिले होते, ते पाळले नाही उलट त्याच्या विरोधात काँग्रेसने बॉम्बे मतदारसंघात नारायण काजोळकरांना उभे केले. यात आबेडकर १५ हजार मतांनी पराभूत झाले काँग्रेसला घटनाकारांपेक्षा महात्मा गांधी 'बापू' महत्वाचे वाटले! नंतर १९५४ ला भंडारा पोटनिवडणुनंतर डॉ.आंबेडकर लोकसभेत गेले! काँग्रेसने घटनाकाराचा सन्मान कधीच केला नाही. पं. नेहरू यांनी १९५५ तर श्रीमती इंदिरा गांधी यांनी१९७१ मध्ये स्वतःपदावर असताना व हयात असताना भारतरत्न पुरस्कार घेतले! तर डॉ. आंबेडकरांना १९९० मध्ये भारतरत्न पुरस्कार दिला गेला! तो व्ही.पी. सिंग सरकारने दिला.डॉ. आंबेडकर म्हणालेले आहेत, 'काँग्रेस हे जळते घर आहे, त्यात जाऊ नका! आज त्यांचे नातू प्रकाश आंबेडकर हे काँग्रेस अध्यक्षासाठी विनवणीचे व प्रेमाचे पत्र लिहित आहेत! यांचे लाचारीचे आश्चर्य वाटते! पं. नेहरु १९५२ मध्ये भारतीय घटनेची शपथ घेवून पहिले पंतप्रधान झाले. विरोधी पक्षाने स्वागत केले.तेंव्हा जागाने भारतीय निवडणुकीचे कौतूक केले!पहिली लोकसभा अस्तित्वात आली.लोकसभेचे पहिले अध्यक्ष गणेश वासुदेव मावलकर यांची निवड झाली. त्यांचा जन्म गुजरातमध्ये झाला असला तरी त्यांनी महाराष्ट्रात प्रतिनिधीत्व केले आहे. दुसरी लोकसभा निवडणूक १९५७ मध्ये झाली. यावेळी काँग्रेसने ४९० पैकी ३७१ जागेवर विजय मिळविला. मताची ४७.७८ टक्के होती. नागपूरमधून अनुसयाताई काळे निवडून आल्या.तिसऱ्या लोकसभेठी निवडणूक १९६२ झाली. काँग्रेसने ३६१ जागा जिंकल्या. मताची टक्केवारी ४५ टक्के होती. याचवेळी चीनचे आक्रमण भारतावर झाले. यावेळी भारताला पराभवाची नामुश्की ओढवली! त्यावर हकीकत चित्रपट निघाला होता. या युध्दात भारतीय सैन्याचे जे हाल झाले. त्यावर बंदी घालण्याची मागणी केली होती.तेंव्हा नेहरू नीती याला कारणीभूत ठरली! चिनी, हिंदी भाई, भाई म्हणत चीनने घात केला. नेहरूंनी आपली चूक असताना संरक्षण मंत्री व्ही.के. कृष्णमेनन यांना पदावरुन काढून टाकले. भारतात निराशाचे वातावरण होते. तेव्हा सम्राज्ञी स्व. लता मांगेशकर स्व. लता मंगेकशकर यांनी 'ये मेरे वतन के लोगो! आंख भरा दो पानी' हे ऱ्हदयस्पशी गीत गायिले, तेव्हा नेहरूंच्या डोळ्यात अश्रू आले! पण शब्द होते कवी प्रदिप यांचे होते! त्यांचेकडे दुर्लक्ष केले. काँग्रेस व पंतप्रधान पंडित नेहरू सामान्यांचे भले करतील मतदारांनी विश्वास दाखविला. नेहरू सरकारचे भारताच्या उभारणीत योगदान आहे!कारण देशात पायाभूत सुविधा, रस्ते पाणी, आरोग्य वीज, सिंचन गरिबी व साक्षरता वाढविणे या सारखे ज्वलंत प्रश्न होते! पंचवार्षिक योजना तयार केली होती.पण नेहरू यांनी घोडचूका केल्या त्या भारत भोगतो आहे.काश्मिरचा भाग पाकमध्ये गेला! चीनला ३८ हजार वर्ग किं. मि.वर्ग भाग दान म्हणून दिला. तर काश्मीरचा भाग पाकिस्तान गेला! नेहरूंनी धर्मनिरपेक्ष वेगळा खेळ सुरु केला. मुस्लिम पर्सनल बोर्ड वक्त बोर्ड, अल्पसंख्याक आयोग संस्था कशाची देण आहे! मुस्लिम समाजाचा 'वोट' बँक म्हणून वापर सुरू केला.दुसरीकडे नेहरूंनी भारतात सोमनाथ मंदिर मंदिराच्या जिर्णोव्दाराला विरोध केला होता. नेहरूंचा ऐशचा खर्च हा केंद्र सरकारच्या तिजोरीतून केला जात होता! त्यांचा अनेक लिलांचा उल्लेख केला जातो. हे काँग्रेस नेते कबूल करतच नाही.काँग्रेस पक्ष हा गांधीवादी व आंबेडकरांचा विचाराचा आहे तेच फसवे आहे. देशातील तीन लोकसभा निवडणूका काँग्रेससाठी सुवर्णकाळ ठरलेला आहे, तेव्हा मराठवाड्यात पहिल्या निवडणुकीत सात खासदार निवडून आले त्यात काँग्रेस पाच व ईतर दोघांचा समावेश आहे. नांदेड राखीव दोन उमेदवार निवडून आले. शंकरराव टेळकीकर व डॉ देवराव कांबळे हे काँग्रेसतर्फे औरंगाबादला काँग्रेसचे सुर्यचंद्र आर्य,अंबडमधून हनमंतराव हे काँग्रेसतर्फे, उस्मानाबाद मधून काँग्रेसचे राघेंद्र श्रीनिवास, परभणीत पीडब्लूपी तर्फे नारायणराव वाघमारे, बीडमधून पीडीएफचे रामचंद्र परांजपे निवडून आले देशाची घटनेचा लोकशाही पाया मजबुत आहे!तेंव्हा श्यामाप्रसा मुखर्जी यांनी काँग्रेस पक्ष सोडला! डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बील व इतर मुद्दावर काँग्रेस त्याग करुन शुड्यल कास्ट फेडेशन स्थापन केला.पहिल्या निवडणुकीपासून समाजवादी पक्ष व भाकप! इतर डावे पक्ष काँग्रेसच्या धोरणा विरोधात संघर्ष करत आले.ते आता काँग्रेसच्या प्रेमात पडले दिसत आहेत. काँग्रेस राजवटीत "भ्रष्टाचारांना फाशी द्या. अश्या घोषणा देणारे डावे पक्ष विरोधी काँग्रेस व भ्रष्टाचाचारी पक्षाचे समर्थन करत आहेत. आता काळ बदला आहे.राजकीय धोरण विचारसरणी बदली आहे. पक्षांनी तत्व गुंडाळून ठेवले,नैतिमतेला तिलांजली दिली आहे. देशापेक्षा पक्ष मोठा समजला जातोय.भारतीय घटना डॉ. आंबेडकरांनी लिहिली त्यात सर्वांना समान अधिकार! महिलांना मतांचा, शिक्षणाचा व इतर हक्क दिले! तसेच धार्मिक स्वातंत्र्य दिले! कायदे धर्मावर आधारित केले जाणार नाहीत असे स्पष्ट म्हंटले!घटनेत १२४ वेळा दुरुस्ती केली गेली आहे. घटनेच्या चौकटीत सरकार कायदे करते किंवा नाही. यासाठी सर्वोच्च खंडपीठ आहे. श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधानपदावर असताना त्यांचे विरोधात निकाल दिला.तसेच शहाबानो खटला,नुकताच राजकीय पक्षाबाबचा देणगी रोखे कायदा न्यायालयाने विरोध निकाल दिलायात 'भारतीय घटना संपुष्टात आणली  तर देशात आग लागेल अशी नकली गांधी धमकी दिली! त्यांनी भारताची घटना व लोकशाही अभ्यास करावा! काँग्रेसच्या



श्रीमती इंदिरा गांधीनी १७६ मध्ये घटनेतील मुळ घटनेत छेडछाड केली. त्यांनी घटनेत धर्मनिरपेक्ष व समाजवाद हे दोन शब्द घुसविले! काँग्रेस पक्षाने देशावर आणीबाणी लादली. ही लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी विरोधी पक्ष व जनताच रस्तावर उतरली होती. याच गांधी विचाराच्या पक्षाच्या नेत्यांना १९४८ मध्ये ब्राह्मणांनीजाळली.यावर रंगा दाते यांनी घटनांचे संशोधन करुन'अग्नीकांड' पुस्तक  लिहिले.ते वाचल्यावर अंगावर शहारे येतील ! म. गांधी हत्या नथुराम गोडसे यांनी केली ? हे सत्य तरणांसमोर बाहेर सांगा! गोडसेला फाशी देण्याची घाई का केली? तेंव्हा भारतीय घटना नव्हती ना न्याय व्यवस्था. काँग्रेस ब्राह्मण समाजांना शोधून ठेचून मारले. तेव्हा काँग्रेसने गांधी व आबेडकरांची विचारसरणी संपविली. काँग्रेस व मोदी सरकार या घटनेची इतिहास म्हणून नोंद व खंत व्यक्त करत नाही. नेहरु धोरणाचा विरोध म्हणून श्यामाप्रसाद मुखर्जी,आंबेडकर या नेत्यांना काँग्रेस पक्ष सोडला. देशातील पहिल्या निवडणुकीपासून समाजवादी पक्ष व भाकप! इतर डावे पक्ष काँग्रेसच्या धोरणा विरोधात संघर्ष करत आला.आता तो काँग्रेसच्या प्रेमात पडला आहे. काँग्रेसच्या राजवटीत डावे पक्ष "भ्रष्टाचारांना फाशी द्या, अश्या घोषणा देत आला आहे.आता तो काँग्रेस व भ्रष्टाचाचाचे समर्थन करत आहे. आता काळ बदला,राजकीय धोरण विचारसरणी बदली आहे. राजकीय पक्षांनी तत्व गुंडाळून ठेवले आहेत. नैतिमतेला तिलांजली दिली आहे. देशापेक्षा पक्ष मोठा समजला जातोय. भारतीय घटना डॉ.आंबेडकरांनी लिहिली त्यात सर्वांना समान अधिकार! महिलांना मतांचा,शिक्षणाचा व इतर हक्क दिले!तसेच धार्मिक स्वातंत्र्य दिले! कायदे धर्मावर आधारित केले जाणार नाहीत, असे स्पष्ट म्हंटले! पण काँग्रेसने तुष्टीकरणातून अनेक कायदे केले.जर भारतीय घटनेचा व लोकशाही पाया मजबूत आहे, याचे त्यांनी घटनेच्या अभ्यास करावा! तेव्हा विरोधी पक्ष दुबळा होता!पण त्यावेळी डॉ. आंबेडकर, श्मप्रसाद मुखर्जी, आचार्य कृपलानी,राममनोहर लोहिया! जयप्रकाश नारायण, भाकप नेते श्रीपाद अमृत डांगे इतर विरोधी पक्षांचे नेते विचाराने मजबूत होते! संसदेत बोलताना नेहरू सरकारला घाम सुटत असे! १९५२, १९५५, १९६२ हे नेहरु युग होते. हा १५ वर्षांचा काळ काँग्रेससाठी सुवर्ण युग होता. नेहरुंचे १९६४ मध्ये निधन झाले, या युगाचा शेवट येथेच झाला कंधारच्या एका कवीने १९६७ वर्षी काँग्रेसवर आरती लिहिली ते आज आठवते ! ती अशी 'जय जय देव काँग्रेस माते, किती वर्णू तूला दुर्गन सरिते! 'स्वातंत्र्यापासून सत्ता तुझ्या हाती। तुवा केली साऱ्या देशाची माती! मंत्रिमडळात गाढवांची भरती। नोकर वर्ग बोकड खेचून चरती! जय देव, जय देव,ही आरती मोठी आहे, केवळ चार ओळी दिल्या आहेत! तेंव्हा जनतेत काँग्रेसबद्दल नाराजी होती, हे यावरुन स्पष्ट होते.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

महाराष्ट्र ही संतांची भूमी. महाराष्ट्रातील जनतेला संतांनीच शतकानुशतके मार्ग दाखवला आहे. संतांच्या शिकवणुकीवरच महाराष्ट्राची धार्मिक, सांस्कृतिक जडणघडण झाली.आणि महाराष्ट्रातील धार्मिक आणि सांस्कृतिक एकोपा टिकून राहिला. आज श्री गजानन महाराजांची पुण्यतिथी. संत हे परमात्म तत्वाचा स्पर्श झालेले दैवी पुरुष असतात. काम,क्रोध,लोभ,मोह,मद,मत्सर या षड्रिपूपासून ते मुक्त झालेले असतात.ते जीवन्मुक्त विरागी पुरुष असतात. आपल्या कार्यातून आणि जीवनातून ते सर्वसामान्यांना मार्गदर्शन करीत असतात.त्यांच्यापुढे आदर्श घालून देत असतात.या आपल्या पवित्र भारतभूमीत संतांनीच आपल्याला उच्च नीतिमूल्ये आणि जीवनमूल्यांचे पाठ घालून दिले आहेत.म्हणूनच अनेक अस्मानी आणि सुलतानी संकटे आली तरी इथली संस्कृती टिकून राहिली. दोन प्रकारचे संत या महाराष्ट्रभूमीत होऊन गेले. ज्यांच्याजवळ अलौकिक काव्यप्रतिभा होती आणि ज्यांनी आपल्या साहित्याद्वारे अज्ञ जनांचे प्रबोधन केले असे संत. आणि दुसरे म्हणजे आपल्या जीवनातून,उक्तीतून आणि कृतीतून लोकांपुढे कसे वागावे याचा आदर्श ठेवणारे संत. ज्यांनी आपल्या अलौकिक काव्यप्रतिभेने समाजप्रबोधनाचे कार्य केले अशा संतांमध्ये संत ज्ञानदेव,संत नामदेव,संत तुकाराम,संत रामदास,संत एकनाथ इ. संतांचा समावेश होतो. त्यांची प्रत्येक ओवी,अभंग त्यांना आलेल्या दिव्य अनुभूतीतून निर्माण झाला आहे. म्हणून त्यांच्या प्रत्येक ओवीला,अभंगाला सुभाषिताचे मोल आहे. म्हणून एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले जाते.कारण आपले जीवन उजळून टाकण्याचे सामर्थ्य या ओव्यांमध्ये किंवा अभंगामध्ये आहे.

दुसऱ्या प्रकारात जे संत होऊन गेले, ज्यांनी कुठलेही साहित्य निर्माण केले नाही,त्यांनी आपल्या स्वतःच्या जीवनातून लोकांना जीवन कसे जगावे याचा वस्तुपाठ घालून दिला. उच्च नीतिमूल्यांचा आदर्श समाजापुढे ठेवला; अशा संतांमध्ये शेगावचे श्री गजानन महाराज,अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ महाराज,शिर्डीचे साईबाबा इ. संतांचा समावेश होतो.त्यांच्या जीवनचरित्रातून आपल्याला जीवन जगण्याची दिशा मिळते.पण या संतांच्या चरित्रामध्ये काही चमत्कार सुद्धा आलेले आहेत.बऱ्याच वेळेला आपण या चमत्कारांमध्ये अडकून त्या संतांनी जो मूळ उपदेश केला तो विसरून जाण्याची शक्यता असते.आपण त्या त्या संतांच्या पोथ्यांची पारायणे करतो.पण आपण केवळ पोथीनिष्ठ बनून न राहता त्या संतांना जे सांगायचे आहे तो मूळ उपदेश विसरता कामा नये तरच आपण त्या संतचरित्रातून काहीतरी शिकलो असे म्हणता येईल. आज आपण श्री गजानन महाराजांच्या जीवनकार्यावर थोडी नजर टाकू या.



## आनंदी पहाट

## "मी म्हणेन तीच पूर्व दिशा", हा विचार घातक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आज्ञेचा अभाव जसा काहीवेळा तापदायक ठरत असतो, तसाच आज्ञेचा प्रभाव देखील त्रासदायक ठरू शकतो, ह्याचा अनुभव आपल्यापैकी प्रत्येकाने कमी-अधिक प्रमाणांत कधीना कधी घेतलाच असणार. असा अनुभव कदाचित शाळा-महाविद्यालयांत, नोकरी-व्यवसायांत, घरांत-धंद्यांत इतरत्र कोठेही आलेला असू शकतो. प्रत्येक ठिकाणी एखाद्या अधिकारप्राप्त व्यक्तीने आज्ञा दिल्याशिवाय कार्यकृती होत नाहीत. मी म्हणेन तीच पूर्व दिशा असे म्हणणारी व्यक्ती कितीही दिशाभूल करत असली तरीही त्या व्यक्तीच्या आज्ञेचा प्रभाव इतका असतो कि, त्याच्यापुढे कोणाचेच काही चालत नाही. काहीवेळा तर नसलेल्या अधिकाराचा सुद्धा गैरवापर करण्याची प्रवृत्ती ह्यामुळे बळावत जाते. आज्ञेच्या प्रभावाखाली आणि दबावाखाली दबलेल्या प्रत्येकास सांगितल्याप्रमाणे काम करावे लागते. अर्थात तो म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्यासारखेच असते. बालपणापासून आपल्या अंगवळणी पडलेल्या सवयीमुळे आपण अनेकदा आज्ञेच्या आधीन झालेले असतो. आज्ञेच्या अभावी आपण विचार, वर्तन अथवा व्यवहार ह्याबाबतीत काहीवेळा अनभिज्ञ असतो, अनावधानाने देखील काही करायला सुरुवात करतोच असे नाही. परंतू काहीवेळा आपल्याला आज्ञाच मिळत नाही. ही आज्ञा एखाद्या व्यक्तीकडूनच मिळावी लागते असे काही नाही, तर आपल्या ज्ञानेद्रीयांकडून जरी मिळाली तरी कार्यकृती सुरु होऊन त्यांतून आपल्या प्रकृतीचे आणि संस्कृतीचे दर्शन घडू शकते. अनेकांच्या बाबतीत ती आज्ञा कोणाकडूनच मिळत नाही, परंतू कृती मात्र होत राहते तेव्हा त्यांतून विकृतीचे प्रदर्शन होत जाते. इतर व्यक्तीकडून अथवा स्वतःच्या ज्ञानेद्रीयांकडून आज्ञा न मिळाल्यास आपल्यातील कृतीचा अभाव दिसू लागतो. त्याचा थेट परिणाम आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांच्यावर होताना आपल्याला दिसतो. आज्ञेच्या अभावाची खरेच आपल्याला जाणीव होत नसते का? आपले वैचारिक मंथन आज्ञेशिवाय होऊच शकत नाही का?




आधुनिक केसरी

### उजळे अंबर | त्रिकाळाचे ||


तिमिराची गाठ | सुटता सुटेना ||
वाट सापडेना | प्रकाशाची ||१||
अहंकारा ठायी | अज्ञान पोसीले ||
आणि नशविले | आयुष्याला ||२||
आंधळ्याच्या हाती | सापडला दीवा ||
तैसा जन्म देवा | मज झाला ||३||
अनाहत टाळ | वाजता अंतरी ||
देहचि पंढरी | झाला आता ||४||
संत कृपादाने | फिटला अंधार ||
उजळे अंबर | त्रिकाळाचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



पुष्प ३४वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### भारतीय मन कायम राममय

संत तुलसीदास, एकनाथ, रामदास यांनी राष्ट्रीय स्तरावर 'श्रीराम' मना-मनातून जागवला. भारतीय माणसांच्या कृतीशी, उक्तीशी, भावनेशी 'श्रीराम' एकरूप करण्यासाठी संतांनी आजीवन विवेक-यज्ञ प्रज्वलित केला. कोणाला भेटलो की परिचयाचा आनंद 'राम-राम' करून व्यक्त होतो. जीवनाची सार्थकता 'जीवनात राम आहे' अशा कृतार्थतेने व्यक्त होते. प्रत्येक आईला आपला बाळ श्रीरामासारखा वाटतो. प्रत्येक पत्नीला श्री रामासारखा पती अपेक्षित असतो. भय व अशुभाच्या ठिकाणी 'राम-राम' उच्चारून अनिष्ठ प्रभाव कमी केला जातो. माणूस शेवटी जगाचा निरोप घेतो ते देखील 'हे राम' म्हणूनच, इतका श्रीराम आपल्या ध्यानी-मनी एकरूप आहे, ही आपली परंपरा आहे. फादर कामिल बुल्के हे इंग्रजांच्या काळातील विद्वान गृहस्थ भारत बघण्यासाठी आले. त्यांनी उत्सुकतेने संस्कृतचा अभ्यास करून मूळ रामायण वाचले. एका एका शब्दार्थाने हा माणूस इतका दंग झाला की, आजीवन रामायणाचा ध्यास घेऊन त्याचे अध्ययन चिंतन-मनन करीत राहीला. या श्रद्धेने त्यांनी भारत कधीच सोडला नाही. ते भारतात रामभक्तीचा प्रसार करीत राममय बनून शेवटच्या श्वासापर्यंत राहिले. ही किमया 'रामभावाची', 'रामश्रद्धेची' आहे. श्रीरामाचे चरित्र आपली सर्वांची अनमोल अशी वंशपरंपरागत लाभलेली संपत्ती आहे. आई व मातृभूमीसाठी एका क्षणात सोन्याची लंका त्यागणारा 'श्रीराम' खरा भारतीय आहे. हा 'श्रीराम' पुन्हा पुन्हा मना-मनात शक्तीमान करणे, काळाची गरज आहे.


संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जाग्रित है अस्थूल में, स्वप्न है सुक्षम माहिं ।
कारण देह सुषोप्ति है, रुप तीन तिन माहिं
।।४४।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/४४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
स्थूल देहात जागृत, सूक्ष्म देहात स्वप्न आणि कारण देहात सुषुप्ती अशा तीन देहांत तीन अवस्था असतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## भगवंताची तळमळ लागायला पाहिजे

आधुनिक केसरी

ज्याला जे आवडते ते आपण केले तर त्याला गोड लागते. भगवंताला प्रेमाशिवाय दुसऱ्या कशाचीच गरज नसते. भगवंताचे प्रेम यायला त्याच्याशी आपलेपणा लावून ठेवावा. भगवंत जोडल्याशिवाय नाहीच राहणार, असे ठरवावे. भगवंत जोडावा हे ठरल्यावर, मला लोक नावे ठेवतील याचा कशाला विचार करावा ? निश्चय आहे तिथे सर्व काही सुचते. तळमळ लागली म्हणजे मार्ग दिसतो. साधुसंत मार्ग दाखवायला सतत तयार असतात; मात्र आपण आपली देहबुद्धी बाजूला ठेवून त्यांना शरण जावे.सर्व जग जर भगवंताचे आहे तर मग काळजीचे कारण काय ? उपाधी कोणी लावून घेतली ? माझी मीच ! मी निर्दोष होईन तेव्हाच लोक मला तसे दिसतील. आपल्या सर्व अवगुणांना कारण म्हणजे ' मी रामाला विसरलो ' हेच आहे. परमात्म्याचा विसर पडतो हेच खरे पाप. कोणी पाहात नसेल तिथे वाईट कर्म आपण करतो; पण भगवंत चोहोकडे पाहतो अशी जाणीव ठेवली, म्हणजे असे पाप घडणार नाही. कोणतेही कर्म करताना फळाची आशा धरली तर ते घातुक



होते. ज्याने भगवंत जवळ आणला जातो तेच चांगले कृत्य. स्नानसंध्या केली, आणि व्यवहार खोटा केला, तर त्या संध्येचा काय उपयोग ? मनात कोणताही हेतू न धरता परमेश्वरावर श्रद्धा ठेवून वागावे. मन परमेश्वराला अर्पण करावे, ते दुसरीकडे गुंतवू नये. एकदा अर्पण केलेल्या मनाला जर पुनः विषयाचा आनंद झाला, तर ते अर्पण झाले नाही असे समजावे. माझा प्रपंच व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर पडू देऊ नको, असे अनन्य भावाने भगवंताला म्हणावे. प्रत्येक कृतीत, ' मी भगवंताचा आहे ' ही जाणीव ठेवावी. पडत्या काळातही जो भगवंताचा होऊन राहतो त्याला कशाचीच भीती नाही वाटत. पांडवांच्याजवळ प्रत्यक्ष भगवान असताना त्यांना किती संकटे सोसावी लागली ! संकट येऊ देऊन मग त्यातून बाहेर काढण्यापेक्षा भगवंताने संकटे टाळलीच का नाहीत, याचे उत्तर देणे सोपे आहे. पुष्कळ वेळा, आपल्यावर येणारे संकट कुणी टाळले, तर ते संकट येणारच नव्हते असे आपण समजतो. खरे सांगायचे म्हणजे संकटे ही आपल्या कर्माचीच फळे असतात. संकटांमध्ये भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव राहिली तर ती आपल्याला समाधान देते. ज्यांना सर्व अनुकूल आहे त्यांनादेखील समाधान हे नसतेच; म्हणून, ज्यांना तितकी अनुकूलता नाही त्यांनी त्याबद्दल असमाधान ठेवण्याचे कारण नाही, कारण समाधान हे त्यामध्ये नाहीच नाही. असमाधान हा रोग सर्वांचा एकच आहे, आणि भगवंताचे स्मरण हे औषधही सर्वांना एकच आहे. १५०. ज्याचे समाधान भगवंतावर अवलंबून आहे, त्याचे समाधान कोणत्याही परिस्थितीमध्ये टिकेल.

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

संसाररूपी भवसागर पार करतो.या अफाट विश्वामध्ये प्रतिक्षणी घडणाऱ्या घटना तो समजून घेतो. शाश्वताच्या अनुभवाने अशाश्वत नाहींसे होते. तसेच पंचमहाभूतांमध्ये आपसात असणारा विरोध तो नाहींसा करून टाकतो. साधकाला कोणतेही भय रहात नाही. साधक काळसत्ता झुगारुन देऊन अमरत्वात प्रवेश करतो. साधक मरणावर विजय मिळवतो. जगणे आणि मरणे या काळसत्तेच्या खुणा आहेत. जन्ममरणाचा ताबा देहावर चालतो. साधक आत्मस्वरूप असल्याने त्याला 'जन्ममरण' नाही. साधक देहरूपी पिशाच्यावर हल्ला करतो. व त्याला पळवून लावतो. 'मी' आत्मा असताना 'मी 'देह आहे अशी बाधा झाली. साधक हे मनात द्वैताची भावना काढून टाकतो. साधक संकल्परूपी शत्रू विरूद्ध उठाव करून त्याला हतबल करतो. माणसाच्या अंतर्यामी संकल्पाचे जसे काही मोठै सैन्य असते यात साधक त्याचा निःपाद करतो.

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 7 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-223 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती

## मध्यम प्रकल्पातही मोजकाच जलसाठा : प्रकल्पातील आरक्षित जलसाठ्यांची पातळी घसरली

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम : तालुक्यात संग्राहित प्रकल्पासह, लहान मोठे पाझर तलाव व लघु सिंचन प्रकल्प मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु सदर प्रकल्पातील आरक्षित जलसाठयांची पातळी ३० टक्के पेक्षाही खाली घसरली आहे. परिणामी वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून, सदर प्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत. तद्वतच अनेक प्रकल्पातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार असे संकेत मिळत आहेत. मध्यम प्रकल्पातही मोजकाच जलसाठा शिल्लक राहीला आहे. या गंभीर बाबीकडे संबंधीत यंत्रणेने विशेष लक्ष देण्याची गरज आहे.**



तालुक्यात जवळपास शेकडोच्या संख्येने तलाव, लघु व मध्यम जलासाठ्यांचे प्रकल्प कार्यान्वित आहेत. पावसाळ्यात येणाऱ्या पुराचे पाणी आडवून उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याची टंचाई भासू नये याच एकमेव हेतूने काही जलसाठयांची निर्मिती करण्यात आली आहे. परंतू शेतीच्या सिंचनासाठी पाणी मोठ्या प्रमाणात वापरल्या जात असल्यामुळे काही प्रकल्प जानेवारी, फेब्रुवारी महिन्यातच निम्म्याहून अधिक प्रमाणात खाली होत आहेत. तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तालुक्यातील एकलासापुर येथे वाकद संग्राहक जलसाठा हा मध्यम प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर प्रकल्पातून वाकद, एकलासापुर, शेलुखडसे, कंकरवाडी आदी पाच सहा गावातील जल जीवन मिशनच्या योजनेचं भवितव्य अवलंबून आहे. मात्र सदर प्रकल्पातही जेमतेम ३० टक्केच्या आसपास मोजकाच जलसाठा शिल्लक राहीला आहे. तर उर्वरीत ईतर प्रकल्पातील जलसाठा हा आरक्षित जलासाठ्याच्या प्रमाणत निम्म्याहून खाली घसरला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसातच सदर प्रकल्प शंभर टक्के कोरडे पडण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. परिणामी एप्रिल, मे, जून आणि गतवर्षी सारखा पाऊस लांबणीवर पडला तर तीव्र पाण्याची टंचाई सर्वांनाच सोसावी लागणार आहे. आणि त्याहीपेक्षा वन्यप्राण्यांना तहान भागवण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागणार आहे. या गंभीर बाबीची संबंधितांनी त्वरीत दखल घेऊन आहे तो जलसाठा बचत ठेवण्याचा प्रयत्न करणे खुप गरजेचे आहे.

**वन विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष :** मोहजाबंदी, कापडशिंगी, कुऱ्हा, मांडावा, आसोला, जवळा आदी गावे जंगलसदृश डोंगराळ भागात असल्याने संबंधित गावातील नागरिकांना वन्यप्राण्यांचा त्रास सोसावा लागत आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे सदर वन्यप्राणी तहान भागवण्यासाठी पाण्याच्या शोधात गाववस्तीकडे धाव घेत आहेत. गावाशेजारच्या पाणवठ्यावर तहान भागली की, भूक शमविण्यासाठी आसपासच्या शेतातील उभे पीक फस्त करीत आहेत. त्यासाठी जंगली भागात कृतीम पाणवठे तयार करून त्यात उन्हाळ्याच्या दिवसात पाणी सोडले तर वन्य प्राण्यांची भटकंती थांबेल आणि आपसूकच शेतकऱ्यांचा त्रास सुद्धा कमी होईल परंतु याकडे वन विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे त्रस्त शेतकरी बोलत आहेत.

**ऐन वेळेवर सिंचन उपसा बंद केल्यास शेतकऱ्यांचे होतंय नुकसान :** साधारणत : जानेवारीत संबंधित विभागाकडून कुठलीही पूर्व सूचना न मिळाल्यामुळे बहुतांश शेतकरी उन्हाळी पिकांची पेरणी करतात. त्यामुळे आपसूकच प्रकल्पातील पाणी पातळी खालावत जाते. तेंव्हा कुठ संबंधित विभागाला जाग येते आणि ऐन वेळेवर सिंचन उपसा बंद करण्यात येतो. कोणाचे मोटार पंप जप्त करण्यात येतात तर कोणाचे विद्युत जोडणी कापण्यात येते. मात्र या ऐन वेळेवरच्या कारवाईमुळे शेतकऱ्यांचे हातात आलेले पीक वाळून जाते. परिणामी केलेले कष्ट व्यर्थ जाऊन शेतकऱ्यांना आथिर्क नुकसान सोसावे लागते. या बाबत मृद व जलसंधारण विभाग व लघु पाटबंधारे विभाग आणि वन विभागाचे अधिकारी यांच्याशी भ्रमण ध्वनीवरून संपर्क साधला असता संबंधितांकडून प्रतिसाद मिळाला नाही.



उपसा सिंचन करणाऱ्या लाभार्थ्यांना मृद व जलसंधारण विभागाकडून डिसेंबर २०२३ मधे नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने गणेशपुर प्रकल्पात ३५ ते ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून जवळपास उन्हाळ्यातील पिके अंतिम टप्प्यात आली आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी व वन्य प्राण्यांच्या सोईसाठी उर्वरीत पाणीसाठा बचत ठेवण्याचा निर्णय आम्ही सर्व गावकऱ्यांच्या सहकार्याने घेतला आहे.
**शोभा विजय जाधव, ( सरपंच, गणेशपुर / पाचंबा ता .रिसोड )**

# धनंजय सावंत यांना उमेदवारी डावलल्याने शिवसैनिक आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** शिवसेनेला डावलून महायुती मधील वरिष्ठ नेत्यांनी शिवसेनेचे महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री प्राध्यापक डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत यांना उमेदवारी डावलून भाजपमधून राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून उमेदवारी दिल्यामुळे नाराज वाशी तालुक्यातील शिवसैनिकांनी महायुतीतील सर्व पदाधिकाऱ्यांचा निषेध करत तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी पदाचा राजीनामा देऊन शिवसेनेच्या प्राथमिक सदस्य नोंदणीच्या फॉर्मची होळी करण्यात आली. तसेच झालेल्या बैठकीमध्ये सर्व पदाधिकाऱ्यांनी भावना व्यक्त करत महायुती सरकारमधील वरिष्ठ नेत्यांनी अजूनही वेळ न घालवता सदरची जागा शिवसेनेला सोडून



घ्यावी, किंवा उमेदवार बदलून विजयी होणारा उमेदवाराला उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली. भविष्यात जर महायुतीचा उमेदवार पराभूत झाला तर याला याला धाराशिव जिल्ह्यातील शिवसैनिक जबाबदार असणार नाहीत, अशी भावना पदाधिकारी यांनी व्यक्त केल्या. त्याचबरोबर आमचे मार्गदर्शक तानाजीराव सावंतहे जी भूमिका घेतील ती आम्हाला मान्य आहे, ते सांगतील ते काम करण्याची ही भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या बैठकीला शिवसेना वाशी तालुकाप्रमुख सत्यवान गपाट, युवासेनेचे युवा जिल्हाधिकारी बाळासाहेब मांगले, माजी नगराध्यक्ष नागनाथ नायकवाडी, उपतालुकाप्रमुख विकास तळेकर, सतीश शेरकर, तालुकाप्रमुख प्रवीण गायकवाड, स्वप्निल कोकाटे, सुनील मोरे, रंजीत घुले, नितीन रणदिवे, अतुल चौधरी, अशोक लाखे, उद्धव साळवी, शरद मनगिरे, बालाजी नकाते, दिनकर शिंदे, नाना घुले, सुनील जाधवर, सोमनाथ शिंदे, सुनील उंद्रे, राजाभाऊ सुकाळे, तुकाराम वीर, संदीप लाखे, राजाभाऊ जोगदंड, तानाजी कोकाटे, मुजमील पठाण, राजाभाऊ कोळी, राजाभाऊ सावंत, विनोद खोसे, दत्ता जाधव, नामदेव लहाने, विलास खवले, महेश कोकणे, बाबासाहेब हारे, बाबासाहेब कांबळे, लायक तांबोळी, प्रवीण शेटे, मदन मुरकुटे, बप्पा शिंदे, अक्षय मेटे, अभिषेक गवारे, दत्ता चौधरी, नंदू सुकाळे, बाबू तावरे, अक्षय चव्हाण, मोहन दळवे, पोपट उघडे, अजय देशमुख, अक्षय चव्हाण, राजेंद्र सुकाळे, उमेश सानप मच्छिंद्र सारूक राहुल घोळवे तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# 'एनआयए'च्या पथकावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकावर हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. एनआयएच्या पथकावर जमावाकडून अचानक दगडफेक करण्यात आली. तसेच पथकातील वाहनांची तोडफोड करण्यात आली. यामध्ये एनआयएच्या पथकातील दोन अधिकारी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे पश्चिम बंगालमध्ये एकच खळबळ उडाली आहे. डिंसेबर २०२२ च्या भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे एक पथक या ठिकाणी दाखल झाले होते. या बॉम्बस्फोट प्रकरणात तीन जणांचा मुत्यू झाला होता. यासंदर्भातील तपास एनआयएकडून सुरु असून यासाठी भूपतीनगर येथे आलेल्या पथकावर संतप्त जमावाकडून हल्ला करण्यात आला. यावेळी दगडफेक करत अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. ही घटना ६ एप्रिल रोजी पहाटे घडली. या घटनेत दोन अधिकारी जखमी झाले आहेत. थकावर हल्ला झालेल्या प्रकरणात पोलिसांनी काहींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणात तृणमूल काँग्रेसच्या आठ नेत्यांची चौकशी सुरु आहे. या प्रकरणात काहींना नोटीसा देण्यात आल्या होत्या. ते चौकशीसाठी हजर नव्हते.

# देवगड येथे भगवान दत्तात्रेयांच्या मूर्तीभोवती विविध फळांची आरास

आधुनिक केसरी न्यूज

नेवासा : पापमोचिनी वद्य एकादशी व सदगुरू संत श्री किसनगिरीजी बाबांच्या पंचदिनात्मक पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड गुरुदेव दत्तपीठ येथे भगवान दत्तात्रयांच्या मूर्ती भोवती फळांची आरास करण्यात आली यावेळी भगवान दत्तात्रयांचे मनमोहक रूप पहावयास मिळाले.

वद्य एकादशीच्या निमित्ताने वेदमंत्राच्या जयघोषात भगवान दत्तात्रयांच्या मूर्तीला पहाटेच्या वेळी अभिषेक घालण्यात आला त्यानंतर आंबा, केळी, संत्रा, मोसंबी, द्राक्ष, अननस, चिकू, पपई आदी फळांनी दत्तात्रय भगवंताच्या मूर्तीला सजविण्यात आले. यावेळी गुरुदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते पहाटेच्या वेळी काकडा आरती भजन करण्यात आले. यावेळी देवगड देवस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराजांनी मंत्र पुष्पांजली म्हटली. यावेळी भगवान सिद्धेश्वर व कार्तिक स्वामी, गणपती मंदिरामध्ये त्या नंतर किसनगिरी बाबांच्या समाधी मंदिरात जाऊन ही आरती करण्यात आली यावेळी परिसरातील भाविक भक्त, देवस्थानचे विद्यार्थी, सेवेकरी, परिसरातील महिला भक्तमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवगड देवस्थान येथे देवगड येथील बँड पथकाच्या वतीने ढोल, सनई, चौघडे, वाजवले गेले त्यात सर्व देवी, देवतांच्या आरत्या भक्ती गीते म्हटले गेले यावेळी संपूर्ण देवगड परिसराचे वातावरण मंगलमय व भक्तीमय बनले होते.

यावेळी संतसेवक नारायण महाराज



साबळे, गणपत महाराज आहेर, बाळू महाराज कानडे, तात्यासाहेब महाराज शिंदे, चांगदेव साबळे, महेंद्र फलटणे, दत्ता महाराज शिंदे, सरपंच अजय साबळे, संदीप साबळे, परिसरातील टाळकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# महिला आणि राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग हा विषय खरेतर संशोधनाचा ठरावा एवढा व्यापक आणि गहन आहे. केवळ भारतातच नव्हे आणि फक्त राजकारणातच नाही तर जगात सर्वत्र आणि सर्व क्षेत्रातील महिलांचा सहभाग हा अजूनही चिंतनाचा विषय व्हावा ही खंत म्हणावी लागेल. कारण हे जग जणू काही पुरुषांची मक्तेदारी आहे अशा आविर्भावात आम्ही वागतो आणि अर्ध्या जगाकडे साफ दुर्लक्ष करतो. त्याचाच परिणाम म्हणून राजकारणात देखील महिलांचा सहभाग अत्यंत नगण्य आहे.**



## क्षितिजापल्याड

जागतिक पातळीवर जेव्हा स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीविषयक मंथन सुरू झाले तेव्हा पहिल्यांदा तर त्यास आजसारखाच विरोध होता आणि स्त्री वर्गात देखील धोरणाच्या बाबतीत सुसंगती नव्हती. असे असले तरी आपण काहीतरी गमावत आलो आहोत, ही जाणीव मात्र पक्की होती. कारण समाजात गप्पांचे विषय देखील ठरवून दिल्याप्रमाणे होते.
घर सोडून बाहेरचे सर्व विषय पुरुषांच्या चर्चाविश्वाचा भाग तर घर, संसार, मुलांचे संगोपन, पाककला, नवऱ्याच्या आवडी - निवडी हे विषय स्त्रियांचे विषय. अशी एक अघोषित विभागणी झालेली. आज देखील यात काही फार मोठा बदल झाला किंवा परिस्थिती बदलली असे दिसत नाही. साहित्य, राजकारण किंवा तत्सम विषय अपवादानेच स्त्री वर्गाने हाताळले असे म्हणावे लागेल. ज्या समाजात स्त्रीने वाहन चालवणे हा नवलाचा विषय ठरावा तेथे इतर बाबतीत काय भाष्य करावे? काम करण्यासाठी, देखभाल आणि सांभाळ करण्यासाठी स्त्री हवी मात्र ती निर्णय प्रक्रियेत नसावी, ही अर्ध्या जगाची मानसिकता स्त्री वर्गाला दुय्यमत्व देणारी ठरते. राजकारण हा घटक सामाजिक निर्णय प्रक्रियेशी निगडित असल्यामुळे तेथे स्त्रीचे काय काम असाही सवाल उपस्थित केला जातो. भारतीय राजकीय निर्णय प्रक्रियेत आजही तेहत्तीस टक्के आरक्षण पूर्णपणे लागू होत नाही, हे आमच्या मध्ययुगीन मागास मानसिकतेचे लक्षण ठरत नाही का? भारतीय लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत बावीस स्त्रियांनी प्रतिनिधित्व केले, त्यात आज फक्त तिपटीने वाढ झाली. मुळात स्त्री म्हणून आम्ही एक स्वनिर्मित प्रतिमा निर्माण करत असतो. त्या प्रतिमेत एकदा बंदिस्त करण्यात समाज यशस्वी झाला की मग स्त्रीला देखील आपण तशाच आहोत, असा भास होत असतो. ही प्रतिमा स्त्रीच्या शरीराभोवतीच फिरत असते. पुरुषांच्या लैंगिकतेचे समाधान आणि मातृत्वाची धन्यता याशिवाय सुद्धा बाहेर खूप मोठे जग आहे आणि त्या जगात आत्मसन्मान, समाधान, स्वावलंबन, स्वातंत्र्य, यश या गोष्टी आपण मिळवू शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे आणि तसे वातावरण जाणीवूर्वक निर्माण करणे हे समाज म्हणून आपले कर्तव्य असायला पाहिजे. महिला विधेयकाच्या बाबतीत चर्चा चालू असताना मागे एकदा लोकसभेत काही राजकीय नेत्यांनी अत्यंत खालच्या पातळीची टीका केली होती. केस कापलेल्या बायका ह्या भारतातील समस्त स्त्री वर्गाचे प्रतिनिधित्व कशा काय करू शकतात, असा त्याचा अन्वयार्थ होता. ही आपली जी स्त्रीवर्गाविषयी मनमंडीत प्रतिमा आहे ती अगोदर दूर करावी लागेल. राजकारण हे गलिच्छ क्षेत्र आहे, ह्या गृहीतकावर पुढची सगळी मांडणी होत असते. मग राजकारणात येणारी स्त्री ही घर संसार सांभाळणारी नसते, ती अशी तशीच असते किंवा तिला तथाकथित प्रतिष्ठा नसते अशा प्रकारची वक्तव्ये कधी खाजगीत तर कधी उघड उघड केली जातात. या सर्वांच्या पाठीमागे असणारी आपली मानसिकता लक्षात घेता अजूनही आपण स्त्रीला किमान माणूस म्हणून तरी वागवतो का हा प्रश्नच आहे. एकतर तिला देवीचे रूप देऊन देव्हाऱ्यात ठेऊन पूजा करायची किंवा पायीची वहाण समजून ठोकर मारायची अशी द्विध्रुवात्मक मानसिकता घेऊन आपण वावरत असतो. यातूनच मग समाज माध्यमांतून किंवा जाहिरातीतून स्त्रीदेहाभोवती फिरणारे वातावरण निर्माण करायचे. ह्या गोष्टीला जसा स्त्री वर्गातून विरोध झाला पाहिजे तसाच तो विवेकी पुरुषांनी देखील केला पाहिजे. अमेरिकेमध्ये जेव्हा स्त्रीवादी विचारांची सुरुवात झाली तेव्हा मी माणूस आहे आणि मला जे हवे आहे ते मी होऊ शकते या विचारातून पुढे लढा उभारला गेला. आज भारतीय परिप्रेक्ष्यात या लढयाचे स्वरूप पाहू जाता कुपमंडूक प्रवृत्तीपेक्षा काही वेगळे




चित्र दिसत नाही. स्त्री म्हणून स्त्रीला चिंता नाही आणि अर्ध्या लोकसंख्येला आपण वंचित ठेवत आहोत याचा खेद पुरुषवर्गाला नाही. स्त्रियांना पन्नास टक्के आरक्षण देणे ही खूप दूरची गोष्ट आहे. किमान तेहतीस टक्के आरक्षण दिले तरी लोकसभेतील महिलांचा सहभाग हा पावणे दोनशेच्या घरात जाईल हे लक्षात घेतले पाहिजे. युनोने १९७५ हे वर्ष महिला वर्ष म्हणून घोषित केले होते. उद्देश असा की, या निमित्ताने तरी आम्ही महिलांच्या बाबतीत सजग झाले पाहिजे, प्रगतीसाठी दारे खुली केली पाहिजेत. कोणत्याही माणसाने स्वतःपुरते पाहणे ही स्व ची हत्या ठरते, याच न्यायाने स्त्रीने देखील स्वतःची हत्या होऊ द्यायची नसेल तर फक्त घर संसार म्हणत कुढत आयुष्य जगण्यापेक्षा समाजकारण, राजकारण यात सक्रीय सहभाग नोंदवावा. जेणेकरून स्वतःला न्याय देत देत समस्त स्त्रीवर्गाला देखील न्याय मिळू शकेल. आजची शिकून सवरून पुढे आलेली स्त्री देखील कुरड्या, पापुड्या आणि खरुड्या करण्यातच जर धन्यता मानत असेल आणि कौटुंबिक मालिकेच्या वातावरणातून बाहेर पडायचे नाही असे जर मनोमन ठरवले असेल तर
कोणीही आपली परिस्थिती बदलू शकणार नाही, याची जाणीव असू द्या. लोकशाहीमध्ये फक्त राजकारणाच्या माध्यमातूनच प्रश्न सुटू शकतात ज्याचे आपणास वावडे असते. एकतर कौटुंबिक पार्श्वभूमी असेल तर त्या घरातील स्त्री राजकारणात प्रवेश करते किंवा जिच्यात लढण्याची, बंड करण्याची धमक असते तीच स्त्री राजकारणात येते. या निमित्ताने समस्त स्त्रीवर्गाला लढण्याचे बळ मिळो आणि भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढो एवढी तरी अपेक्षा आपण नक्कीच करू शकतो. कारण तुमचे भले तुम्हालाच करायचे आहे.

# होतात वेदना मनाला जेव्हा...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा हे माणसाचे पाच ज्ञानेंद्रिये आहेत. या पाच ज्ञानेंद्रियांमुळे माणूस त्याचे संपूर्ण जीवन अगदी आरामात जगतो.ही ज्ञानेंद्रिये माणसाला संपूर्ण जगाची आणि ज्ञात व अज्ञात लोकांची खरी ओळख करुन देतात.कोण चांगला आणि कोण वाईट?कोण स्वार्थी आणि कोण निस्वार्थी?कोण धूर्त आणि कोण मदतगार?कोण कपटी आणि कोण निर्मळ?हे माणसाला केवळ ज्ञानेंद्रियांमुळे कळते बरे का.आणि मानवी शरीरात अदृश्य रुपात लपून बसलेलं मन हे जे इंद्रिय आहे ते त्या पाच ज्ञानेंद्रियांचा बाप आहे.**

मन हे पाच ज्ञानेंद्रियांना कधी लगाम घालतं तर कधी मोकाट हुंदडायला लावतं.मन हे माणसाला सुखात आनंदी ठेवतं व दुःखात मात्र वेदना देत राहतं.हे मन अतिशय चंचल,तरल,हट्टी,विखारी, संकुचित असतं. हेच मन कधी विशाल समुद्र बनतं तर कधी महाकाय पर्वत बनतं.परंतु,मानवी मनाला जेव्हा वेदना होतात तेव्हा ते उदास व खिन्न होऊन जातं.ते कोणाशी बोलत नाही, गप्प गप्प राहतं.नुसतं विचार करत इकडे तिकडे बघतं. मनाला वेदना केव्हा होतात? मनाविरुद्ध घटना घडल्यावर, कोणी नाहक बदनामी केल्यावर आणि मनाच्या इच्छा पूर्ण नाही झाल्यावर. मनाच्या इच्छा अपूर्ण का राहतात?याचे उत्तर महान विचारवंत तथागत गौतम बुद्धांनी अतिशय सोप्या शब्दात सांगितले आहे.मानवाच्या दुःखाचे मूळ कारण तृष्णा असते.तृष्णा म्हणजे वेगवेगळ्या स्थितीत मनात उचमळून येणारी वासना होय. आणि ही वासना कधीच शमत नसते.जोपर्यंत आपण आपल्या मनाला लगाम घालत नाही तोपर्यंत ते बेफाम राहतं,वासनांच्या आहारी जातं.वासना नाही शमली की मन उदास,दुःखी व कष्टी बनतं.आणि म्हणून मानवी मनाला वेदना होतात.मनाला वेदना होण्याची कारणे सुध्दा निरनिराळे असतात. आपण कितीही सरळ वागत असलो,आपण कितीही चांगले असलो आणि आपले कर्म नेक असले तरीही काही लोक केवळ ईर्षेपोटी आपल्याला नावे ठेवतात. म्हणून मनाला वेदना होतात. आपण ज्या क्षेत्रात नोकरी किंवा व्यवसाय करतो त्या क्षेत्रातील इतर लोक आपल्या सारख्या विचारांचे नसतात.आपण सगळ्यांच्या अगोदर ऑफिसला जात असू, आपले काम चोखपणे करत असू आणि आपण आपल्या पेशाला न्याय देणारे असू पण आपल्यापैकी असतो एखादा कामचुकार,कोणी असतो लेट कमर्स आणि असतात काही वारंवार रजेवर जाणारे आणि सगळ्यांना अडचणीत आणणारे. तेव्हा मनाला खूप वेदना होतात. आणि आपण आतल्या आत चरफडत राहतो. लोक असे का वागतात म्हणून त्रागा करून घेतो. एखाद्याला आपण मदत म्हणून हात उसने पैसे देतो. पण तो वेळेवर पैसे परत देत नाही. इतकेच कशाला तो कधी उसने घेतलेल्या पैशाचे नाव सुध्दा काढत नाही म्हणून मनाला वेदना होतात. आपण आपल्या अनेक नातेवाईकांच्या मदतीला धावून जातो पण आपण अडचणीत असल्यावर आपल्या मदतीला कोणी येत नसेल तर मग मनाला खूप खूप वेदना होतात. आपण स्वतःला व आपल्या नशिबाला दोष देत बसतो.आपण भाड्याने कोणाच्या घरात राहत असताना आपण कितीही चांगले राहिलो,चांगले वागलो तरीही घरमालक नेहमी सुचनांची फैरी झाडत असेल तर मग मनाला वेदना होतात.सगळ्या सुखसोयी देऊनही मुले अभ्यास करत नसतील तर आईवडिलांना खूप वेदना होतात. कमावते मुले वृद्ध आईवडिलांचा योग्य रीतीने सांभाळ करत नसतील तर मनाला वेदना होतात.फुटपाथवर राहणाऱ्या लोकांच्या अंतरीच्या वेदना जाणून घेतल्या की आपल्या मनाला वेदना होतात. एखादा संस्थाचालक स्टाफमधील मर्जीतल्या शिक्षकांचे ऐकून इतर शिक्षकांना विनाकारण मानसिक त्रास देत असेल किंवा एखाद्या शिक्षकाने संस्थाचालकाकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारले तर त्याचे वेतन किंवा पेन्शन बंद केले जात असेल तर मनाला खूप वेदना होतात.या सगळ्या वेदना किती दिवस सहन करायच्या? कोणत्याही कारणाने मनाला वेदना होऊ द्यायच्या नसतील तर कोणाकडूनही चांगल्या अपेक्षा बाळगणे सोडून द्या.लोक वाईट वागतात ती त्यांची समस्या आहे.तुम्ही कशाला त्रागा करता?जशास तसे उत्तर देण्याची तयारी ठेवा आणि वाईट लोकांकडे दुर्लक्ष करून चांगल्या लोकांशी मैत्री करा.मनाला नेहमी आनंदी ठेवा. चांगले कर्म करत राहा. आपला चांगुलपणा कधीच सोडू नका.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बेरळी येथील सुमीत ढेंबरे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

## सुधाकर पाटील पवार यांनी वाढदिवस साजरा न करता केली मदत

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दि. ५ एप्रिल रोजी सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारे लोहा येथील युवा समाजसेवक सुधाकर पाटील पवार यांचा वाढदिवस! त्यानिमित्त त्यांनी हार तुरे न स्विकारता शुभेच्छा बॅनर पोस्टर यांच्यावर वायफळ खर्च न करता त्यांनी मराठा आरक्षणासाठी अगदी 16 वर्ष वय असलेल्या सुमितने आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपविली म्हणून आज दि.५ एप्रिल रोजी सुधाकर पाटील पवार हे कै.सुमित यांच्या बेरळी येथील घरी स्वतः जाऊन सुमीतचे वडील शरद दादाराव ढेंबरे यांची बेरळी, ता. लोहा यांचे सात्वन करुन त्यांना सुधाकर पाटील पवार यांच्या कडून ११ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी बोलताना युवा समाजसेवक सुधाकर पाटील पवार म्हणाले की, मराठा समाजातील सर्व मित्र बांधवांना विनंती आहे की असे टोकाचे पाऊल उचलू नका आपल्या परिवाराचा विचार करा. तेव्हा मराठा समाजातील युवकांना मी हात जोडून कळकळीची अशी विनंती करतो की, मराठा आरक्षणासाठी कुणीही आत्महत्या करु नये. आपल्याला ही लढाई जिंकायची आहे. मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या बेरळी येथील सुमितच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्यासाठी पुढे यावे, असे सुधाकर पाटील पवार म्हणाले. यावेळी माऊली पाटील पवार, नागेश पाटील हिलाल, ऋषिकेश जोगदंड, निळू वडजे, पवन लोंढे भानू पवार आदी उपस्थित होते.



# शेतकऱ्यांच्या हितासाठी भूमिपुत्र कटिबद्ध

## निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडणार

आधुनिक केसरी न्यूज



**वाशिम :** लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. त्या अनुषंगाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. यानिमित्ताने प्रत्येक तालुक्यात भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या बैठका घेणे सुरु असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून काल कारंजा येथे वाशिम जिल्ह्यातील कारंजा, मानोरा, मंगरूळनाथ तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. निवडणुकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नाला एरणीवर घेण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून संपुर्ण जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. बैठकीला भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर, जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, शेतकरी नेते गजानन अमदाबादकर, डॉ. सौ. तृप्ती गवळी यांनी मार्गदर्शन केले. या वेळी बोलतांना भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी सांगीतले, भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या स्थापनेपासून राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी मोफत व मुबलक विज मिळावी या साठी संघटना आग्रही आहे. सोयाबीन व कापुस भाव, शेत रस्ते, बि- बियाण्यामधील काळा बाजार, खतांच्या वाढलेल्या किमती सह शेतकऱ्यांच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण विषयाची सोडवणूक करण्यासाठी कटिबद्ध आसणार्या उमेदवारांच्या पाठीसी भूमिपुत्र शेतकरी संघटना उभी राहणार आसल्याचे त्यांनी सांगीतले. यावेळी आढावा बैठकीसाठी व पत्रकार परिषदेकरीता भूमिपुत्र चे युवा जिल्हाध्यक्ष सचिन भाऊ काकडे, जिल्हा कार्याध्यक्ष बालाजी बोरकर, महिला राज्य समन्वयक डॉ सौ तृप्ती ताई गवळी, महिला जिल्हाध्यक्ष संगीताताई मार्गे. माजी जि. प. अध्यक्षा सौ. ज्योतीतांई गणेशपुरे, मानोरा चे अध्यक्ष भूषण मोराळे, मंगरूळ तालुका अध्यक्ष विलास गहुले, ओम तापडियाजी, गजानन भाऊ आमदाबादकर, जिल्हा महिला कार्याध्यक्ष उषा नाईक, कारंजा तालुका अध्यक्ष देवेंद्र पाटील लांडकर, उपाध्यक्ष आकाश मोहकर, सचिव रवी पाटील लाहे, झोडगा सर्कल अध्यक्ष अमोल उगले, कामरगाव सर्कल अध्यक्ष उल्हास ठाकरे, उमरडा सर्कल अध्यक्ष दिनेशवर, हिवरा शाखाध्यक्ष अजय मोहोळ, नागोराव अघमे, कारंजा तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी पदाधिकारी उपस्थित होते.

# मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिर ठरले ७५ वयोवृद्धांना वरदान

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबाच्या समकालीन. साईभक्त कै लक्ष्मीबाई यांच्या नावाने असलेल्या शिर्डी शहरातील साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच जे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर हे ७५ वयोवृद्ध निराधार गोरं गरिब आधार ठरल्याची भावना. शिर्डी येथे आलेल्या. रुग्णांनी त्यांच्या सत्कार प्रसंगी. व्यक्त केली. यावेळी अरुण गायकवाड सौ संगिता गायकवाड साईराज गायकवाड. उपस्थित होते.वाढलेले वय पती पत्नीचा तुटलेला जोड वाढता वैद्यकीय खर्च आरोग्य सेवेच्या बाबतीत कौटुंबिक होणारे दुर्लक्ष या चिंतेने ग्रासलेल्या व अनेक वर्षांपासून कुटुंबातील लोकांना सोडून शिर्डी येथेच राहत असलेल्या व काहींना मायेचा आधार. नसलेल्याना हे शिबिर भविष्यात जगण्यासाठी इच्छाशक्ती देणारे ठरले यातच मोठा आनंद व समाधान वाटत असल्याची भावना यावेळी संगिता गायकवाड यांनी व्यक्त केली. साईराज गायकवाड म्हणाले की सेवाभाव. डोळ्यासमोर ठेवून हि संकल्पना. राबवली दोन शिबिराचे आयोजन पार पाडले शिर्डी सह नगर औरंगाबाद जिल्ह्यातील अनेक रुग्णांनी आपली तपासणी करून घेतली असून ७५ रुग्णांवर मोफत डोळ्यांची नेत्र शस्त्रक्रिया देखील पार पडली अरुण गायकवाड म्हणाले की वाढती महागाई कोव्हीड काळातील कर्ज शेतीच्या उत्पादनात झालेली घट गरिबी कधी कौटुंबिक अडचणी अशी अनेक. कारणांमुळे वयोवृद्धाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते त्यातच खाजगी वैद्यकीय उपचाराचा वाढता खर्च. गोरगरिबांना परवडत नाही त्यामुळे घरात असलेल्या वयोवृद्धाच्या महत्त्वपूर्ण असलेल्या डोळ्यांच्या समस्याकडे गंभीरपणे बघितले जात नाही हे लक्षात आल्यानंतर श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी यांनी साईबाबांनी दिलेला रूग्ण सेवा हिच ईश्वर सेवा हा मंत्र डोळ्यासमोर ठेवत आरोग्य शिबीर घेण्यात पुढाकार घेतला त्यास वाढता प्रतिसाद बघता हा उपक्रम यापुढेही सुरूच राहणार आहे यासाठी डॉक्टर प्रकाश पाटील डॉक्टर क्षमा डॉक्टर सपना शर्मा डॉक्टर अश्विनी पाटील डॉक्टर अक्षदा पारटे डॉक्टर स्नेहल जाधव रामदास पवार सर्व नर्सेस ट्रस्टचे कर्मचारी यांनी शिबिर यशस्वीतेसाठी भाग घेतला.






# भगवान महावीरांच्या विचारांची गरज

## आचार्य विशुद्धसागर महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** भगवान ऋषभदेव जन्मजंयती महोत्सव निमित्ताने जैन मुनी आचार्य विशुद्ध सांगर महाराज यांच्या संघाचे श्री ज्ञानतिर्थ कमल मंदिर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी आचार्य विशुद्ध सांगर महाराज म्हणाले की आज जगभर युद्ध परिस्थिती निर्माण झाली असताना सर्व समाजाला भगवान महावीराच्या. विचारांची गरज असुन घरात असताना आपल्या पुरता समाज असावा परतु बाहेर पडल्यानंतर प्रत्येकाने विश्व हाच समाज हा मंत्र जोपासला तर जगात. शांतता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही त्यासाठी चांगल्या संस्काराची गरज असुन एकीकडे अल्पवयीन मुलांकडून होत असलेले गुन्हे बघता आता सरकारने वयाची जी १८ वर्षांची अट आहे त्याकडे देखील गंभीरपणे बघण्याची गरज असुन केवळ अल्पवयीन आहे म्हणून त्याने जो गुन्हा केला त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही असे मत आपल्या प्रवचनात व्यक्त केले यावेळी निवृत्त न्यायमूर्ती कैलास चांदीवाल उद्योगपती कैलास ठोळे जी एस टी चे अधिकारी सुमेर काले राजाभाऊ पाटणी उद्योजक किशोर गंगवाल साई अरिहंत पतसंस्थेचे चेअरमन सतिश गंगवाल संजय पापडीवाल प्रेमाबाई बज शोभा ठोळे फुलचंद पांडे महेंद्र काले शिखरचंद कासलीवाल सुरजमल गंगवाल आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते.

विशुद्ध सांगर महाराज म्हणाले की भाषण करणे हि कला आहे आपले विचार लाखो लोकांच्या पर्यंत मांडता येतात त्यासाठी चांगले वाचणं गरजेचे आहे मानसाने मोह माया व स्वार्थाचा त्याग केला पाहिजे तर मोठी मनःशांती मिळते मात्र मानुस या त्रिसुत्रीचा त्याग करायला तयार नाही एक वेळ मृत्यूला जवळ करायला तयार आहे पण त्याग करण्यास तयार नाही ही खंत व्यक्त केली देशभर भगवान महावीराचा विचार सर्व समाजबांधवांच्या पर्यंत पोहोचविण्याचा आपला संकल्प असुन त्यासाठी पंथ भेद नष्ट करुन सर्व बांधवांनी काम करण्याची गरज आहे ज्ञानमती माताजी यांनी जगाला श्रध्दा व संबुरीचा संदेश देणा-या साईच्या पावनभुमित ज्ञानतिर्थ क्षेत्र उभे करत केलेले कार्य बघितल्यावर मनाला मोठे समाधान मिळाल्याचे सांगितले यावेळी विविध विषयावर त्यांनी आपले मत व्यक्त केले यावेळी अशोक गंगवाल शितल पाटणी प्रमोद कासलीवाल पारस जैन अशोक पाटणी सुधीर बंज रमेश चुडीवाल डॉक्टर अनिल गंगवाल मनोज ठोळे राजेंद्र गंगवाल सुभाष झांजरी पत्रकार किशोर पाटणी उपेंद्र मिश्रा आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते.

# मन व्यथामुक्त होण्यासाठी हरिकथा हाच प्रभावी उपाय




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मानवी मन हे दुःख निर्मितच केंद्र आहे आणि हेच केंद्र हरी कथा ऐकण्यासाठी केंद्रीत केलं तर दुःखांचा प्रभाव हा निश्चित कमी होत.तस पाहिलं तर व्यथांची चितरकथा म्हणजे जीवन असून हिच चितरकथा कायमची संपुष्टात येण्यासाठी हरी कथा ऐकण गरजेचं आहे.विज्ञान तंत्रज्ञान युग हे कितीही प्रगत झालं असल तरी देखील निसर्गाच्या निर्मात्यांच अस्तित्व कोणीही नाकारू शकत नाही.आज विज्ञान जी प्रगती करत आहे या मध्ये आपल्याला आश्चर्य वाटत असेल पण भगवतगीता तसंच वेगवेगळ्या धार्मिक ग्रंथा मध्ये आपण नीट अवलोकन केले तर हया सगळ्या प्रगतीच मुळ तीथे सापडेल.**

.म्हणजे हे सगळं लिखित स्वरूपात आहे याचा अनुभव त्या त्या कालखंडात त्या पद्धतीने घेतला आहे.आज लोकसंख्ये सोबत शहरीकरण व सुविधा जास्त वाढल्याने हे सगळं आश्चर्य निर्माण करणार आहे.परंतु आजही जीवनातील महत्वाच्या दोन गोष्टी जन्म आणि मृत्यू ह्या निसर्गाच्या आधीन आहेत.महणजे निसर्ग निर्मात्याची अंतीम सत्ता आहेच.आयुष्यात आपण किती धन,द्रव्य, संपत्ती,मिळवली तरी सदा सर्वदा सर्व काळ सुख मिळेलच आशी शाश्वती खात्री कोणीही देऊ शकत नाही.पद प्रतिष्ठा,सत्ता हे सगळं क्षणिक आहे.आपेक्षा कधीचं संपत नाही.मोह दुःखांचा सागर कमी होऊ देत नाही.मग या दुःख रूपी समुद्रातुन तरूण पैलतीरावर जाण तर क्रमप्राप्त असत मग जायचं कसं त्यासाठी मार्ग काय आणि हाच शाश्वत मार्ग शोधता आला पाहिजे काढता आला पाहिजे.मुळात मानवी जीवनाचं सार्थकी कार्य काय असतं दुर्दैवाने जीवनाचा उद्देश समजत नाही म्हणून अडचण उद्‌भवते.उदेश समजला तर जीवन सार्थकी लागत.जीवन सार्थकी लागण्यासाठी हरी कथा हा एकमेव प्रभावी उपाय आहे.मानवी जीवनात जेव्हा जेव्हा दुःख निर्माण होत तेव्हा मात्र आपल्याला आपसुकच निसर्गाच्या निर्मात्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही मग निसर्गाचा निर्माता म्हणजे हरी आहे.आणि हरी म्हणजे कोण काय हे अगोदर समजणं गरजेचे आहे.या सृष्टीचा निर्माता ,पालक आणि संहारक जगाचा बाप म्हणजे हरी मग नाव काही पण असु द्या . प्रत्येक धर्म संस्कृती नुसार नाव वेगवेगळ असेलही पण अंतिमतः सर्व शक्तिमान शक्ति म्हणजेच ईश्वर आणि ईश्वराची कथा ऐकली तर दुःख आपलं काहिच नुकसान करू शकणार नाही.एवढी खात्री बाळगली तर दुःख मुक्त होण्यासाठी आपल्याला फार वेळ लागणार नाही. दुःख मुक्त जीवन हिच प्रत्येक व्यक्तिची इच्छा असते.त्या साठी आपण अहोरात्र जगंजग पछाडत असतो . जीवनातील अनेक दुःख व्यथा,समस्या,अडचणी, संकट याला पार करून स्थिरता निर्माण होण्यासाठी तसंच जीवनातील सर्व व्यथा पासुन मुक्त होण्यासाठी आपण अनेक भौतिक मार्ग शोधतो पण कोणाताही उपाय कामी येत नाही कारणं यावर शाश्वत मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे हरी कथा ऐकण व समजणं हाच एकमेव उपाय व पर्याय आहे. जीवन हा सुख दुःखांचा संघर्ष आहे .हाच संघर्ष दैनंदिन जीवनात विविध समस्या निर्माण करत असतो.कलयुगात वेगवेगळ्या क्षेत्रातील यश अपयश जीवनातील चढता उतरता क्रम , विविध नातेवाईक यांच्या कडून झालेला मनस्ताप ,




आपल्या चांगल्या वागण्याचा लोकांनी घेतलेला फायदा , नात्यातील,कौटुंबिक कलह,आर्थिक विवंचना,शरीरक व्याधी, विश्वासाला तडा, फसवणूक,अशा सह अनेक प्रकारच्या दुःखाचे क्षण क्षणोक्षणी जीवनात निर्माण होत असतात आणि या सर्व बाबींचा परिणाम तणावात होऊन आपल्या जीवनात दुःखांचा प्रवेश होत असतो.हाच दुःखांचा प्रवेश रोखण्यासाठी आपण ब्रह्म अस्त्र म्हणून हरी कथा ऐकली व समजली पाहिजे.हिच हरी कथा आपले सर्व दुःख दूर करण्यासाठी मुलभूत साधनं ठरेल.हरीच नाम आणि गुणगान हे अमृतापेक्षाही उर्जावान आहे.जगातील कितीही घातक अशा दुःखावर हरीनाम हरीकथा हा अ प्रतिम ईलाज आहे.औषधी खाल्यावर जसं शारिरीक व्याधी ,वेदना कमी होतात तसंच मानसिक दुःख ताणतणाव ज्यावर जगातील कोणतही औषधं काम करत नाही त्यावर एकाच औषधं काम करत प्रभावी ठरत आणि विशेष म्हणजे हे औषध निःशुल्क आहे अगदी मुक्त आहे.पण तरी सुद्धा आपण हे मुक्त औषध वापरत नाहीत हे आपलं किती मोठं दुर्भाग्य आहे.आपल जीवन दुःख मुक्त तणाव मुक्त होण्यासाठी करण्यासाठी आपणं नियमित पणे हरी कथा ऐकली पाहिजे.समजुन घेतली पाहिजे.

# मन जाता है तो जाने दे | मत जाने दे शरीर ||



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**जीवन जगत असताना आपल्या अवतीभवती घडणाऱ्या सर्वच गोष्टींना आपले मन कारणीभूत असते. कारण आपले मन सतत नकारात्मक विचार करत असते. या नकारात्मक विचारांमुळे नसलेले दुःख ते ओढवून घेते. म्हणून आपण त्या मनावरती काम करायला शिकला पाहिजे. जसं सोन्यावरती काम केलं की सुंदर अलंकार घडतात अगदी त्याचप्रमाणे मनावरती काम केलं तर मनामध्ये सकारात्मक विचार अधिक येतात व मनाला स्थिरता प्राप्त होते. मन म्हणजेच आपली 'मनेरी' गाय आहे. जसं आपणच आपल्या कल्पनेने कपिला गाय उभी केली आहे. अगदी तद्वतच आपण आपल्या मनाचे मनोरे उभा उभारून मनेरी गाय तयार केलेली आहे.**

म्हणून आपलं मन जे आहे ते 'कळतंय पण वळत नाही' अशा स्थितीमध्ये सतत राहतं. एखादी गोष्ट किंवा एखादा विचार आपल्याला कळत नाही असं नाही, परंतु त्याप्रमाणे आपली कृती होत नाही, आचरण होत नाही. याचाच अर्थ आपलं मन ती गोष्ट करायला- स्वीकारायला तयार होत नाही. यासाठी संत कबीर सांगतात, "रहे वासना न मन में | ममता रहे न मन में || रहू मस्त नाम धून में | जब प्राण तन से निकले ||" कारण जायचं तर प्रत्येकाला एक ना एक दिवस आहेच. परंतु जात असताना शेवटच्या क्षणांमध्ये आपल्या मनामध्ये जो विचार चालू असेल तो विचारच आपल्याला वासनांच्या पाठीमागे घेऊन जातो आणि जन्ममरणाच्या फेऱ्यांमध्ये अडकवितो. म्हणून ज्या वेळेला आपण ही कुडी सोडताना आपल्या मनामध्ये नाम असेल, सद्‌गुरूंचे चिंतन असेल तर पुन्हा जन्मा येणे नाही. त्यासाठी आपल्याला मनावरती अधिक काम करावे लागेल. मनाला वळण लावावं लागेल, कारण संत सांगतात, "लागले इंद्रियांशी वळण तो भाव निराळा" जोपर्यंत मनाला- इंद्रियांना वळण लागत नाही तोपर्यंत आपल्या आचार -विचार -उच्चार-दृष्टी यामध्ये बदल होणार नाही. म्हणून आपण संत कबीर सांगतात त्याप्रमाणे," मन जाता है तो जाने दे |मत जाने दे शरीर || नही खिचेगा कमान | तो कहा से निकलेगा तीर ||" म्हणजेच बऱ्याचदा आपल्याला मनाने एखादी गोष्ट करावीशी वाटते, तिथे जावसं वाटतं, आपल्याला तिथे गेल्यानंतर दुःख होणार आहे याची कल्पना देखील असते, परंतु मन ऐकत नाही अशा वेळेला आपण मनाने जरी त्या ठिकाणी असलो तरी देहाने त्या ठिकाणी जाता कामा नये. जेव्हा हा संयम आपल्याकडे येईल तेव्हा मात्र कोणतीच वस्तू, व्यक्ती, गोष्ट आपल्याला दुःख देऊ शकत नाही. यासाठी ज्ञानेश्वर माऊली सांगतात, या जगाच्या पाठीवर आपल्याला दुःख देण्यास कोणीही समर्थ नाही. आपणच आपल्या सुखदुःखाला कारणीभूत असतो. आपण जर सकारात्मक विचार केला तर आपण सुखीच आहोत. आपण जर नकारात्मक विचार केला तर मात्र आपण दुःखीच होतो. म्हणून आपण मनाच्या मागे न धावता मनाला स्थिर करण्यासाठी ध्यानधारणा, नामस्मरण, चिंतन, निजध्यास, संतांवर दृढ विश्वास ठेवला तर आपलं जीवन सहज सुंदर होईल. यासाठी संतांनी सांगितले की, मन ही अशी गोष्ट आहे की, या मनानेच भगवंताला जाणता येतं. उदा. जर आपल्याला मंदिरात जायचं असेल तर आपण पायात चप्पल घालून जातो पण ज्यावेळेस आपण मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करतो त्यावेळेला चप्पल आपण पायरीवरच सोडतो. अगदी त्याचप्रमाणे मनानेच आपल्याला भगवंताला जाणता येतं आणि जेव्हा आपण भगवंताला जाणतो तेव्हा आपलं मन तिथं उरत नाही, त्यालाच नमन असे म्हणतात. ही करण्याची गोष्ट नाही तर ती आपोआप होते. कारण मनाला स्थिरता लाभलेली असते नामामुळे, सद्‌गुरुं कृपेमुळे. मन हे असंच आहे ते अंतर्मन ही जाणता व बाह्य जगतही जाणतं. म्हणूनच या मनाला सर्व अवस्थेतून जर आपल्याला बाहेर काढायचं असेल तर ध्यानधारणा आणि चिंतन आवश्यक आहे. जेव्हा आपली ध्यानधारणा होईल चिंतन होईल नामस्मरण होईल तेव्हा याच मनाला उन्मनीची अवस्था प्राप्त होईल आणि उन्मनीची अवस्था म्हणजे देहाच्या चारही अवस्थांच्या पलीकडे, जिथे मन उरत नाही. ही अवस्था मनाच्या पलीकडची आहे. जेव्हा उन्मनीची अवस्था मनाला प्राप्त होते तेव्हा मन आणि भगवंत या दोन्ही गोष्टी वेगळ्या राहत नसून त्या एकच होत असतात. कारण मन हे दुभाषक आहे, जे जीवाला जाणवतं- वाटतं ते भगवंता पर्यंत पोहोचवण्यासाठी हे मन दुभाषकाचे काम करते. म्हणून मनावरतीच आपल्याला जास्त क्रिया करायची आहे. कारण मन हे सोंगाड्या आहे. ते जसं समोर येईल तसं ते वागत राहतं. म्हणजे आपल्या मनासारखी व्यक्तीसमोर आली की मन त्याच्यासारखं वागत. मनाला न आवडणारे, त्यांचे विचार न पडणारी व्यक्ती समोर आली की मन आपलं त्याच्याप्रमाणे वागायला लागतं. म्हणून मनाला संतांनी सोंगाड्या म्हटला आहे. जसं आपण जर मंदिरासमोर उभा असेल की आपण लगेच दर्शन घेतो. पण तेच जर आपण चराचरसृष्टीमध्ये कुठेही उभे असल तर आपलं मन तिथे लीन होत नाही. ते कुठेही देवाचे दर्शन घेत नाही. कारण चराचर सृष्टीमध्ये भगवंत आहे. हे मन मानायला तयार होत नाही. हे चौऱ्यांऐंशी लक्ष योनीमध्ये एक भगवंतच भरून उरला आहे. हे मनाला पटत नाही. त्यामुळे ते फक्त ठराविक ठिकाणीच लीन होतं आणि सुखदुःख भोगतं. म्हणून त्यासाठी आपल्याला आपल्या मनाची एकाग्रता वाढवली पाहिजे जेव्हा मनाचे एकाग्रता वाढवली जाईल तेव्हा मन स्थिर आणि शांत होईल. जसं पाणी अस्थिर असेल तर पाण्यामध्ये प्रतिबिंब दिसत नाही. तेच पाणी स्थिर झालं की त्याच्यामध्ये प्रतिबिंब दिसतं. अगदी त्याचप्रमाणे अस्थिर मनामध्ये भगवंताचं प्रतिबिंब दिसू शकत नाही. परंतु एकाग्रतेने मन जर स्थिर झालं तर त्याच्यामध्ये आपल्याला भगवंताचे प्रतिबिंब दिसतं. हे मनामध्ये जे 'मी आणि माझं' हा जो अहंकार आहे, तो सगळ्या गोष्टीला कारणीभूत आहे. जे काही दुःख माणसाला आयुष्यामध्ये भोगावे लागतात ती मी आणि माझे या अहंकारामुळेच भोगावे लागतात. म्हणून आपण हे मी न करत नाही, हे माझे नाही, याचा करता कोणी वेगळाच आहे, त्याला निसर्ग म्हणा, तत्व म्हणा, भगवंत म्हणा नाव कोणतेही द्या. फक्त करता मात्र मी नाही याची जाणीव असावी. यासाठी ज्ञानेश्वर माऊली म्हणतात," हे मजिस्तव झाले | परि म्या नाही केले || ऐसे जेणें जाणितले |



संत साहित्यातील तत्वज्ञान : भाग-२

तो सुटला गा ||" त्यासाठी आपल्याला प्रथम मनाला सवय लावली पाहिजे. कारण आपलं आपण जिथे आहोत तिथे शंभर टक्के प्रेझेंट राहत नाही. आपण एक तर भूतकाळात तरी रमतो किंवा भविष्यकाळात तरी रमतो. आणि भूत आणि भविष्यामध्ये चिंता आहे दुःख आहे. म्हणून आनंद स्वरूप असणारे तत्व याच्यामुळे आपल्याला आनंदच मिळतो. त्यासाठी आपल्याला वर्तमान काळात जगलं पाहिजे. जिथे आहोत त्या ठिकाणी शंभर टक्के प्रेझेंट राहिला शिकलं पाहिजे, तरच आपल्याला आनंद उपभोक्ता येणार आहे. कारण हे मन नेहमी त्याच्या अवस्थेमध्ये अडकून राहतं. त्याच्या अवस्थेमध्ये जागृती, स्वप्न, शिशुप्ती, समाधी आहे. जागृती मध्ये बुद्धी असते, स्वप्नामध्ये मन असतं, शिशुप्ती मध्ये अहंकार असतो. त्याचबरोबर जागृती आणि स्वप्नामध्ये आपल्या दृश्य दिसतात परंतु शिशुप्ती मध्ये मात्र दृश्य दिसत नाहीत. म्हणून आपल्याला ह्या जागृती, स्वप्न, शिशुप्ती, समाधी या सगळ्यांच्या पलीकडे जायचं आहे, कारण या सगळ्यांना चालवणारा, या अवस्थांना चालवणारा तो भगवंत वेगळा आहे. या अवस्था म्हणजे भगवंत नाही. आणि समाधी लागावी लागते कारण त्या समाधीमध्ये चित्त असतं. ज्या वेळेला या सर्व अवस्था होतात त्या अवस्था माझ्यामुळे होतात पण या अवस्था म्हणजे मी नाही. जेव्हा हा दृढ निश्चय पक्का होईल, तेव्हा भगवंत आपल्या अवतीभवती आहेच आहे. किंबहुना आपण त्या भगवंतामध्ये आहोतच आहोत. जसं गुलाबजाम पाकात टाकल्याशिवाय त्याला गोडी येत नाही, अगदी त्याचप्रमाणे आपण भगवंतामध्ये लीन झाल्याशिवाय आपल्या जीवनाला गोडी येणार नाही. कारण हे मन जे आहे या सगळ्या अवस्थांच्या पलीकडे गेल्याशिवाय या मनाला उन्मनीची अवस्था प्राप्त होत नाही, आणि जोपर्यंत उन्मनीची अवस्था मनाला प्राप्त होत नाही तोपर्यंत मन चंचल, अस्थिर, सुखदुःख भोगत राहते. म्हणून या मनाला स्थिर करण्यासाठी, मनावरती काम करण्यासाठी नामस्मरणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. जेवढे अधिक नामस्मरण होईल तेवढी स्थिरता मनाला, विचारांला लाभेल. कारण रस्त्याला सुद्धा स्पीड ब्रेकर असतात ते वाहनांचा वेग कमी करण्यासाठी. नामस्मरण सुद्धा असेच आहे जेवढे मनामध्ये अधिकाधिक वेगाने येणारे विचार आहेत, त्या विचारांची गती कमी करण्यासाठी नामस्मरण आहे. विचारांची गती जर एकदा कमी झाली की, मानवाला चांगलं काय- वाईट काय, खरं काय -खोटं काय, सार काय- सार काय याचा विवेक निर्माण होतो व जीवनामध्ये घडणारे जे घटना आहेत त्यामध्ये जास्त अडकून न राहता तो स्व स्वरूप स्थितीमध्ये अधिक राहतो व आनंद उपभोगतो. म्हणून ज्याचे नामस्मरण आहे, चिंतन आहे, संतांवर दृढ विश्वास आहे त्याच्या आयुष्यामध्ये आनंदी आनंद आहेच आहे. कारण संतही सांगतात, "मी आणि माझे विसरले जयाचे अंतकरण तोच संन्यासी जाण निरंतर" ||

कारण आपल्यामध्ये नेहमी अहंकार येतो. आपण अहंकाराने वागतो. आपण उपाधीला श्रेष्ठ मानतो आणि उपाधी धारण केल्यावर नम्र व्हायला मागत नाही, तेव्हा संत म्हणतात," एक उंच पण गेले | एक अहंकाराने गेले || असा नसावा संन्यासी | जो का परमार्थाचा दोषी ||" म्हणून आपण जीवन जगत असताना की मी जो कर्म करत आहे त्या कर्माचे फळ मलाच मिळणार आहे. "जैसे कर्म केले तसे फळासी आले | उपजले मेले ऐसे किती || हे ज्ञानेश्वर माऊली सांगतात. ते अगदी तंतोतंत आपल्याला जीवन जगत असताना लागू पडतं. म्हणून माझ्या कर्माचे फळ जर मला मलाच भोगावयाचे असेल तर मी कर्मच चांगली का करू नये? मी चांगला विचार का करू नये ? मी संतांना शरण का जाऊ नये? मला सुख पाहिजे असेल तर मी इतरांना सुख द्यायला शिकलं पाहिजे. जेव्हा ही भावना मानवाच्या मनामध्ये निर्माण होईल तेव्हा तो खऱ्या अर्थाने आनंदी होईल. आपल्या मनामध्ये द्वेष ,ईर्षा, राग यामुळे आपल्याला समोरच्या व्यक्तीला चांगलं काहीच दिसत नाही म्हणून आपण चांगल्या गोष्टी पेरल्या तर चांगलंच उगवणार आहे. याची जाणीव ठेवली, तसे वर्तन केले, आचरण असले तर आपल्या जीवनामध्ये फक्त आनंदी आनंद चुरेल यासाठी संत कबीर म्हणतात, "पेड बबूल का लागावे, तो आम कहां से पावे" || म्हणून आपल्याला जर सुख हवं असेल, आनंद हवा असेल तर आपलं आचरण सुद्धा अगदी त्याप्रमाणेच असायला हवं. आपलं मन कसं असतं ना की सगळ्यांनी माझी सेवा करावी, सगळ्यांनी माझं कौतुक करावं परंतु मी कोणाची सेवा करणार नाही. मी इतरांचं कौतुक करणार नाही. इतरांच्या सुखदुःखात मी सहभागी होणार नाही. आणि याच वृत्तीमुळे माणूस सतत दुःखी आहे यासाठी. संत म्हणतात की, रोते क्यों हो मिया, सुरत ही है ऐसी "|| कारण आपल्या मनामध्ये, अंतकरणांमध्ये जे काही विचार सुरू असतात त्याचे प्रतिबिंब चेहऱ्यावर पडत असते. जर आपल्या अंतकरणांमध्ये शांत भाव, प्रेम निर्माण असेल तर चेहरा आपला अतिशय सुंदर दिसतो. चेहऱ्यावरती एक वेगळ्याच प्रकारचे तेज दिसत. परंतु जर आपल्या मनामध्ये प्रेम नसेल इतरांविषयी घृणाअसेल, द्वेष असेल, राग असेल त्याचे सर्व प्रतिबिंब चेहऱ्यावर उमटतं आणि आपल्या चेहऱ्यावरचे भाव बदलतात. चेहरा सतत दुःखी चिंतेने ग्रासलेला दिसू लागतो. म्हणून परमार्थच मुळात अंतकरण शुद्धीसाठी आहे. अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण होण्यासाठी आहे. आणि हे करण्यासाठी पांडित्य करणे, पोथ्या वाचन, हवन करणं, याची गरज नाही. त्यासाठी फक्त एका मनावरती काम केलं की सगळ्या गोष्टी सुंदर आहेतच आहेत. हे जगत मुळात सुंदर आहेच आहे फक्त आपल्या मनावर विषयांचं विकारांचा शेवाळ आल्यामुळे आपल्याला सगळ्या जगतामध्ये वाईट गोष्टी दिसायला लागतात. यासाठी संत सांगतात," न बोलो फार न बैसो जनामध्ये , मोडतील भक्तीच्या वाटा आणि कोपतील संतजन" म्हणून आपण जेवढं जास्तीत जास्त स्वरूपामध्ये लीन राहू, चिंतनामध्ये मग्न राहू, नामस्मरणात अधिक राहू तेवढा काळ आपला आनंदाचा व सुखाचा असणार आहे. म्हणून आपल्याला आनंद हवाय, सुख हवय तर आपण मनोमार्गे न जाता आपण संयमाने वागायला हवं म्हणून कधी कधी वाटल्यास गोष्टी म्हणाला तर मन गेलं तरी चालेल पण आपण देहाने त्याच्या पाठीमागे धाव घेता कामा नये म्हणून संत सांगतात, मन जाता है तो जाने दे| मत जाने दे शरीर || नही खेचेगा कमान तो | कहा से निकलेगा तीर ||

# राजकारणातला डोमकावळा : नाना पटोले



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**क्षेत्र कुठलेही असो?मनुष्य जीवन म्हटलं की, वैचारिक मतभेद आलेच. राजकारण त्याला अपवाद राहिलंच कसं? एक गोष्ट निश्चित आहे की, राजकारणात मतभेद असु शकतात पण मनभेद नसतात. मात्र वर्तमान राजकिय काळात असे काही संधी साधु, लबाड लांडगे जन्माला आलेत की ज्यांच्या बाबतीत वर्णन करायला शब्द अपुरेच पडतात. महाराष्ट्राच्या राजकारणात नाना पटोलेसारखा डोमकावळा राजकियदृष्ट्या ज्याला मढ्यावरचं लोणी देखील पुरत नसावं.असा माणुस एका मोठ्या राजकिय पक्षाचं नेतृत्व राज्यात करतो.**

तो माणुस विदर्भात अकोल्याचे खा.संजय धोत्रे यांच्यावर उपचार सुरू असताना, त्यांचे व्हेंटीलेटर कधीही निघु शकतं असं म्हणणं खरं तर दुश्मन देखील एवढं शापीत गिधाडासारखं परस्परांना बोलत नाहीत. मात्र औरंग्याची वृत्ती ज्यांच्या अंगात घुसलेली असते त्यावेळी जन्मदात्या बाप असो किंवा मुलगा असो यालाही यमसदनी पाठवायला मागे रहात नाहीत. नाना पटोले ज्यांच्या नेतृत्वाची लायकी काँग्रेसनं ओळखायला हवी ज्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे मातब्बर पुढारी तुटलेल्या माळेच्या मण्यासारखे रोज गळुन पडताना दिसतात. प्रश्न हाच पडतो की या पक्षात आयुष्य घालवणारे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरातांचं पटोलेंच्या अशा बेधुंद बोलण्याला समर्थन आहे का नाही हे त्यांनी माध्यमांसमोर सांगण्याची गरज वाटते.

नाना पटोले यांचा मुळ स्वभाव? ज्याचं अवलोकन केलं तर खरंच औरंगजेब वृत्तीला मागे टाकेल असाच म्हणावा लागेल. राजकिय फायद्यासाठी हा माणुस काय कुठे आणि कधी बोलेल? याचा नेम नाही. मुळात त्यांच्या स्वभावात प्रगल्भता नावाचा सद्‌गुणच नाही.विक्षिप्त माणुस ज्यांनी नेहमीच बेडुकउड्या राजकारणात मारलेल्या आहेत. भाजपाच्या तिकीटावर खासदार झाले. पण तिथं देखील टिकले नाहीत. कालांतराने काँग्रेसमध्ये आले. मध्यंतरी राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आलं त्यावेळी विधानसभेत सभापती पद मिळालं. एक वर्षात मन लागलं नाही. पदाचा राजीनामा दिला. नेतृत्व गुण त्यांच्यात जाणवत नाही. ओबीसी नेता म्हणुन काँग्रेसवाल्यांनी प्रदेश अध्यक्ष पदाची माळ त्यांच्या गळ्यात घातली. त्याच दिवसापासुन नागपुरात दोन-तीन गट निर्माण झालेले पहायला मिळतात. अध्यक्ष म्हणुन खरं तर एक चांगली संधी संघटनात्मक असते. पण या माणसाने संपुर्ण राज्यात पक्षांतर्गत गटबाजी केली ज्यामुळे काँग्रेस आज रसातळाला जात आहे. रोज एक नेता तुटलेल्या मण्यासारखा पक्षाबाहेर पडताना दिसतो. वैफल्यग्रस्त, नैराश्य आणि मानसिक संतुलन ढासळलेला माणुस कुणाविरूद्ध काहीही बोलु शकतो ज्याचा ईलाज केवळ येरवडा हाच असु शकतो.खरं तर त्यांना प्रसिद्धीचं खुप वेड आहे. विक्षिप्त बोलणं म्हणजे आपल्याला प्रसिद्धी मिळते हे त्यांच्या मुळ स्वभावाचे सद्‌गुण पक्ष हितासाठी फायद्याचे कधीच ठरत नाहीत. चंद्रपुरमधुन त्यांचे सहकारी विजय वडेट्टीवारांना लोकसभेवर पाठवण्यासाठी या माणसाने जीवाचे रान केलं. त्याचे कारण विरोधी पक्ष नेते पद आता त्यांना हवं आहे. नितीन राऊतांना देखील नागपूरात विरोध असतो. चार महिन्यापुर्वी नागपुरच्या काँग्रेस पक्षात या सर्व कारणास्तव गदारोळ उडाला होता. दोन वर्षापुर्वी भंडारा जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत या महाशयांनी असंच एक तरं नशेत असल्यासारखं वक्तव्य करत खळबळ उडवुन दिली होती. मी म्हणे पंतप्रधानाला ठार मारू शकतो. काही तरी वेग बोलायचं आणि कुठल्याही बाजुने आपली ओळख चर्चेत आणायची ही सवय त्यांना आहे.अकोला लोकसभा मतदारसंघात सद्याचे खा.संजय धोत्रे प्रकृतीच्या कारणास्तव व्हेंटीलेटरवर आहेत. मात्र निच राजकारणाचा कळस गाठताना डोमकावळ्याच्या स्वभावाप्रमाणे प्रचारासाठी अकोल्यात आलेल्या पटोलेंनी जाहिर सभेत भाषणात धोत्रेंचे व्हेंटीलेटर कधीही निघु शकते. मरण चिंता जाहिरपणे व्यक्त केली. खरं तर गिधाड वृत्ती याशिवाय दुसरी उपमा असु शकत नाही किंवा माणसं जेव्हा टाळुवरचं लोणी खाण्यासाठी कावळ्याच्या शापासारखं धडपडतात ज्याला डोमकावळा म्हणतात. वास्तविक पहाता दुश्मन देखील आपल्या शत्रुविषयी अशा प्रकारच्या भावना बोलु शकत नाहीत. एक गोष्ट खरी आहे की कावळ्याच्या शापाने जनावर मरत नसतं. पटोले नावाचा कावळा कितीही कावकाव करत असेल तर दुसऱ्या बाजुने संजय धोत्रे यांची प्रकृती चांगली होईल आणि त्यांना दीर्घायुष्य देखील लाभेल. कारण ही नियतीची रीत आहे. पण अशा डोमकावळ्याच्या जबाबदार पुढाऱ्यांनी जर अशी वक्तव्य केली तर समाज त्याचा आदर्श घेईल काय? मुळात प्रश्न असा आहे की, राहुल गांधी पटोलेंच्या वक्तव्याचे कदाचित समर्थन करतील. पण आमचा प्रश्न राज्य काँग्रेसमध्ये आयुष्य



घालवणारे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, माणिकराव ठाकरे, नितीन राऊत या निष्ठावान काँग्रेसजनांना विचारावं वाटतं की, संजय धोत्रे यांच्या बाबतीत पटोलेंनी केलेले वक्तव्य ज्याला तुमचं समर्थन आहे का? एकीकडे काँग्रेस पक्ष हाच राज्यात व्हेंटीलेटरवर असताना पक्षाचा प्रदेश अध्यक्ष जर अशा प्रकारे मानसिक संतुलन ढासळल्यासारखी जाहिरपणे बडबड करत असेल तर एखादी विजयासमिप असलेली लोकसभा तिथे देखील पराभव झाल्याशिवाय रहाणार नाही. कारण महाराष्ट्र साधुसंत, वारकरी संप्रदायाचा सुसंस्कृत स्वभावाचा जी कर्मभुमी छत्रपती शिवाजी महाराजांची, जिथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासुन संत, महंत, थोर, विचारवंत त्या मातृभुमीतला पक्षाचा प्रदेश अध्यक्ष अशा प्रकारे राजकिय शत्रुविषयी अशुभ बोलत असेल तर मग व्हेंटीलेटरवर असलेला तुमचा पक्ष त्याची काय अवस्था होणार? येणारा काळच ठरवेल. पटोलेजी, तुमचं भाकित तुम्हाला लखलाभ, कावळ्याच्या शापाने कुणी मरत नसतं. पण तुम्ही डोमकावळे या राज्यात राजकारण करताना नव्या पिढीला काय आदर्श देवु शकतात? हीच खरी चिंता वाटते. ज्या महाविकास आघाडीत तुम्ही सहभागी आहात त्या शरदचंद्रजी पवार असो किंवा उद्धवजी ठाकरे असो हे देखील तुमच्या शापित बोलण्याचं समर्थन निश्चित करणार नाहीत. बाकी काही असलं तरी राजकिय फायदा उचलण्यासाठी तुम्ही व्यक्तीद्वेषातुन दिलेला शाप संजय धोत्रे यांना विजयाचं टॉनिक निश्चित मिळेल आणि या जागेवर महायुतीचा उमेदवार निवडुन येईल. मग व्हेंटीलेटर कुणाचं काढायचं? आणि कुणाला लावायचं?येणारा काळचं ठरवेल आणि हो हे अगदी खरंच आहे की, तुमच्या उडाणटप्पु नेतृत्वाला बिचारे राहुल गांधी देखील काहीच आक्षेप घेवु शकणार नाहीत. कारण तुम्ही ज्या शाळेत सद्या शिकतात, तुमचे गुरूदेखील तसेच आहेत. ज्यांना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या योगदानाची किंमत काहीच वाटत नाही. जो माणुस सावरकरांनी ब्रिटीशांची माफी मागितली असं बालिश वक्तव्य करतो अशा नेतृत्वाकडून पटोलेजी तुम्हाला धोत्रेंच्या बाबतीत केलेल्या वक्तव्याची शाब्बासकी मिळु शकते. ज्यामुळे तुमची गिधाड वृत्ती प्रबळ होते हे नक्कीच.

# तरुणांनो मतदान अवश्य करा



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**तरुण मित्र मैत्रिणींनो नमस्कार . मंडळी सध्या निवडणुकीचे वारे आता चांगलेच जोर धरायला लागलेला आहे .भारताच्या भविष्याला आकार देणाऱ्या लोकशाहीच्या निवडणुकीचा रणसंग्राम आता चांगलाच जोरात आलाय . भारतीय निवडणूक आयोगाने अठराव्या लोकसभेची निवडणूक जाहीर केली असून ही निवडणूक संपूर्ण देशभरात सात टप्प्यांमध्ये होऊ घातलेली आहे . त्याचा पहिला टप्पा हा 19 एप्रिल रोजी होत असून या निवडणुकीचा निकाल 04 जून रोजी लागणार आहे . एकूणच संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडावी आणि या जगातील सगळ्यात मोठ्या लोकशाहीच्या माध्यमातून देशाच्या पंतप्रधान पदावर योग्य व्यक्तीची निवड व्हावी म्हणून संपूर्ण प्रशासन कामाला लागलेल आहे .**

आणि यात सगळ्यात मोलाची भूमिका पार पाडणार आहेत ते या लोकशाही प्रधान देशात राहणारे तब्बल 97 करोड नोंदणीकृत मतदार . तब्बल 55 लाख ईव्हीएम मशीनच्या माध्यमातून आणि चार लाख गाड्यांच्या सहकार्याने 10.5 लाख पोलिंग बूथ वर जवळपास 97 करोड मतदार मतदान करणार आहेत . आणि यात सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे युवा मतदार . जे पहिल्यांदाच मतदान करणारे आहेत आणि , अठरा वर्षाच्या वरचे मतदार आहेत . मित्रांनो तब्बल 1.82 करोड मतदार हे पहिल्यांदा मतदान करणार आहेत . तर अठरा वर्षाच्या वर मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या ही 21.5 करोड एवढी आहे . आणि म्हणूनच मित्रांनो या देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी त्यांची सगळ्यात महत्त्वाची भूमिका राहणार आहे. आणि म्हणून मी आज हा विषय हाती घेतला की , ज्यामुळे तुम्ही सगळ्यांनी मतदान केंद्रावर जाऊन आपलं मतदान करावं आणि सोबतच आपल्या घरच्या प्रत्येकाला मतदानासाठी घेऊन जावं . आणि इतरांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करावं.

मित्रांनो भारत हा लोकशाही प्रधान देश आहे . आणि या लोकशाही प्रधान देशांमध्ये आपलं मत हे अमूल्य आहे आणि म्हणून मतदान हे आपलं कर्तव्य आहे. कारण, या देशाच्या संसदेमध्ये जे लोकप्रतिनिधी जातात ते लोकप्रतिनिधी हे आपण मतदान करून निवडून दिलेले असतात. तेच या लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसदेमध्ये पोहोचत असतात. त्यामुळे या देशाच्या भविष्याला आकार देणारे खरे कोणी जर असतील तर ते आहेत मतदार त्यातही युवा मतदार म्हणून तुमची जबाबदारी खूप जास्त आहे मित्रांनो.

आपल्याला काय करायचं आहे ? नाही आपण मतदान केलं तर काय बिघडणार आहे ? असा विचार आपण कधीही करता कामा नये मित्रांनो . मला आठवत 1999 हे साल . या देशाच्या राजकारणामध्ये ज्यांनी आपलं संपूर्ण आयुष्यच समर्पित केलं असे अटल बिहारी वाजपेयी यांचे तेव्हा सरकार होतं . आणि हे सरकार 1999 मध्ये केवळ एका मताने पडलेलं होतं . 1999 मध्ये जेव्हा जयललिता यांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता आणि ऐनवेळी मायावती या सुद्धा मागे हटल्या होत्या . तेव्हा अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार अवघ्या एका मतामुळे पडलेलं होतं. मित्रांनो करोडो रुपये खर्च करून या देशाची निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते . आणि अवघ्या एका मताने , फक्त एका मताने या देशाचं सरकारही पडू शकतं याचं हे आजवरच्या इतिहासातलं एकमेव उदाहरण आहे मित्रांनो . आणि म्हणून आपल्या एका मताने काय होणार ? हा विचार न करता आपलं मतदान हे एक राष्ट्रीय कार्य म्हणून आपण आपल्या जवळ असलेल्या बूथ वर जाऊन मतदान करणे हे आपलं अतिशय महत्वपूर्ण काम आहे . शंभर काम असतील आपल्या मागे पण एक गोष्ट मात्र नक्की लक्षात ठेवा मित्रांनो की ही शंभर काम अर्ध्या तासासाठी बाजूला ठेवा . पण जिथे कुठे आपलं मतदान असेल तिथे जाऊन आपण मतदान करा . कारण लोकशाही प्रधान देशांमध्ये आपलं मत हे अतिशय अमूल्य असतं आणि , मतदानाच कार्य हे एक राष्ट्रीय कार्य असतं . आणि म्हणून या राष्ट्रीय कार्यात तुमचे योगदान देण्यासाठी म्हणून थोडा वेळ आवश्यक काढा या भारत मातेच्या सेवेसाठी .

सरकारच्या प्रधान पातळीवरून सरकार मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून सातत्याने प्रयत्नशील आहेत . वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून सरकार आज विविध पातळीवर जाऊन काम करत आहेत. माय व्होट इज माय फ्युचर , पावर ऑफ वन व्होट अशा थीमवर युवकांच्या आवडत्या क्षेत्रातील रील्स , पोस्टर मेकिंग , मिम्स अशा स्पर्धांच आयोजन सरकार द्वारे करण्यात येत आहे . एवढेच नव्हे तर ई. एल सी . ELECTROL LITRASY CLUB निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या माध्यमातून सुद्धा महाविद्यालयीन पातळीवर सरकारने मोठ्या प्रमाणात निवडणूक जनजागृतीचे कार्य चालू केलं असून प्रत्येक महाविद्यालयामध्ये नोडल अधिकारी आणि कॅम्पस ॲंबॅसिडरच्या माध्यमातून सुद्धा युवकांचे मतदान वाढावं या दृष्टीने सरकार प्रयत्न करत आहेत . पण मित्रांनो आपल्याला स्वतःच मतदान तर करायच आहेच . पण सोबतच आपले आई-वडील , बहिण , भाऊ , मित्र , नातेवाईक ,आपल्या परिसरातील सगळे नागरिक यांना सुद्धा आपल्याला मतदानासाठी त्यांच्या त्यांच्या मतदान केंद्रावर जाण्यासाठी आपण मदत करायची आहे.



त्यांना प्रोत्साहित करायच आहे . त्यांना प्रेरणा द्यायची आहे . यातूनच या देशाच्या कोणशीलेला आकार देणारे तरुण म्हणून तुमचं सगळ्यात मोलाचे योगदान राहणार आहे .

कोणी कोणाला मतदान करायचं हा ज्याचा त्याचा वैयक्तिक अधिकार आहे . त्यामुळे याबाबत आपण न बोललेलं बरं . परंतु एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा मित्रांनो की मतदान करायसाठी मात्र आपण प्रत्येकाला प्रवृत्त करायला हवं . ही निवडणूक देशपातळीवरील निवडणूक असल्याने देशाची ध्येय धोरण , आंतरराष्ट्रीय पातळीवरील देशाची छबी , देशाच्या सीमा सुरक्षा , देशाचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील निर्णय , संबंध आणि एकूणच राष्ट्रीय पातळीवरील विविध योजना ज्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचून त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणत या देशाच्या लोकशाहीची महती खऱ्या अर्थाने त्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचं कार्य जे सरकार करत असेल त्या सरकाराला आपल्याला मतदान करायचं आहे . त्यामुळे मतदान कोणाला करायचं हा ज्याचा त्याचा वैयक्तिक अधिकार परंतु मतदान करायचं हे मात्र नक्की ठेवा . आणि त्या दृष्टीने आपण सगळेजण मिळून प्रयत्न करूया. या देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी या देशातल्या प्रत्येक नोंदणीकृत मतदाराचे मतदान सगळ्यात अमूल्य असं मतदान असून त्यासाठी आपण सगळ्यांनी एकत्र येऊन प्रयत्न करायला हवेत . सरकारचे प्रयत्न चालले आहेत असं जेव्हा सरकार म्हणत तेव्हा त्या सरकारच्या प्रयत्नामध्ये आपलं सहकार्य हेही तितकंच मोलाच आहे मित्रांनो ही जाणीव ठेवा . आणि सरकारच्या प्रयत्नाला मतदान करत असताना आपणही राष्ट्रीय कार्यामध्ये आपलं अमूल्य योगदान देत आहोत अशी भावना जर आपल्या मनामध्ये असेल तर निश्चितच या देशाच्या लोकशाहीला एक वेगळा अर्थ प्राप्त होईल . आणि , लोकशाही आणखीन खऱ्या अर्थाने मजबूत होईल . तेव्हा मित्रांनो चला आपण सगळेजण मतदान करूया आणि आपल्या सोबत सगळ्यांना मतदान करायला लावूया.

# मतदार मतदान का करीत नाहीत?



संदीप वाकचौरे
संपर्क क्र.8329328470

आधुनिक केसरी

**लोकशाहीचा उत्सव म्हणून निवडणुकांकडे पाहिले जाते. आपल्या देशात सातत्याने निवडणुका सुरू असतात. आज लोकशाहीचा उत्सव सुरू असला तरी सामान्य जनतेच्या जीवनात त्या उत्सवाने किती परीवर्तन होते हा खरा प्रश्न आहे. कधीकाळी आपले लोकप्रतिनिधी म्हणजे सामान्यांच्या जीवन परीवर्तनाचे दूत मानले जात होते. लोकप्रतिनिधींवर प्रचंड विश्वास होता. लोकप्रतिनिधी देखील सामान्यांच्या वेदनाचा हुंकार ऐकत होते. सामान्य माणसं ही त्यांना आपल्या परिवारातील वाटत होते. त्यामुळे नेतृत्व आणि समाज यांच्यामध्ये नात्याचा एक बंध तयार झाला होता. एकमेकांच्या विश्वासाला पात्र ठरत होते.**

खरंतर ते नेतृत्व सामान्य माणसांसारखे जगण्यात धन्यता मानत होते. त्यांना आपण वेगळे आहोत असं कधी वाटल नाही. आज हे अंतर प्रचंड वाढत चालले आहे. त्यामुळे ती माणसं आपली वाटेनासे झाली आहेत. लोकप्रतिनिधी आणि मतदार यांच्यात अंतर वाढत चालले आहे. त्यामुळे लोकशाहीच्या उत्सवात लोकांचा सहभाग कमी होतो आहे का? याचा विचार करण्याची गरज आहे. मतदारानी मतदान करावे म्हणून एकीकडे कायदा करावा अशी मागणी लोक करत आहेत. दुसरीकडे लोक मतदान करत नसतील तर त्यांना दिल्या जाणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ देऊ नये असेही म्हटले जाते. पण असे केले तर मतदानाच्या टक्केवारीचा आलेख वाढेली, पण लोक मतदान का करत नाही ? याचा विचार करण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधी आणि मतदार यांच्यातील नात्यात दुरावा निर्माण झाला आहे का ? असा प्रश्न पडतो. कधीकाळी प्रचंड विश्वास असणारी माणसं आज आपल्या प्रतिनिधींवर विश्वास का ठेवत नाही ? याचा विचार करण्याची गरज आहे.

१९४० मध्ये महात्मा गांधी यांनी दुसऱ्या महायुध्दाच्या काळात युध्दविरोधी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला होता. मुबंईत त्या दरम्यान लॅमिंग्टन रोड पोलिस ठाण्यासमोर एका गुर्जर महिलेचा सत्याग्रह होणार होता.त्या महिलेच्या कानात हिऱ्याच्या कुडया, गळ्यात मोत्याचा हार, हातात सोन्याच्या बांगडया होत्या. तीने युध्दविरोधी घोषणा देऊन सत्याग्रह करताच पोलीसांनी त्या महिलेला अटक केली. त्या महिलेला पोलीस कस्टडी देण्यात आली. त्या महिलेने गर्दीत जमलेल्या एका खादीधारी माणसाला आपल्या जवळ बोलावले. त्यांनी आपल्या जवळ असलेले मौल्यवान अंलकार एका रूमालात बांधून त्या खादीधारी व्यक्तिच्या हाती दिले. शिक्कानगर येथील आपल्या घरच्या निवासस्थानाचा पत्ता दिला आणि अलंकार घरी पोहचवण्याची विनंती केली. त्यावेळी ती खादीधारी व्यक्ती म्हणाली की, अहो, मी तुम्हाला ओळखत नाही. तुमचे इतके महत्वाचे आणि मौल्यवान असलेले अलंकार तुम्ही माझ्या ताब्यात कसे काय देता? तुमचे दागिने घेऊन मी पळून जाईल अशी भिती तुम्हाला नाही का वाटली? तेव्हा ती महिला म्हणाली, अहो ,तुमच्या अंगावर महात्मा गांधी यांची खादी आहे. ती पवित्र खादी धारण केलेली माणसं चुकीचे कसं बर वागतील ? असा प्रश्न तीनेच विचारला. खरंतर हा विश्वास जितका गांधीजींवर होता तितकाच खादीच्या प्रामाणिकतेवर देखील होता. खादी म्हणजे सत्याची वाट,प्रामाणिकतेची आस आणि राष्ट्रहिताचा विचार असं मानले जात होते. खादीने हा विश्वास कमवला होता आणि प्रतिष्ठा देखील प्राप्त केली होती. आज ती प्रतिष्ठा आणि विश्वास गमवला गेला आहे का ? असा प्रश्न पडतो. आपला भोवताल आपण वाचला तर निश्चितपणे खादीधारण करणाऱ्या माणसांवरील विश्वास आपण गमवला आहे त्यात



संशय नाही. तो विश्वास जोवर प्राप्त होत नाही तोवर मतदानाचा टक्का उंचावण्याची शक्यता नाही. अर्थात त्या काळी समाजाचे नेतृत्व करणारी माणसं ही अधिक स्वच्छ होती.ते भ्रष्टाचाराची वाट चालले नाही तसा समाजाच्या पैशाचा विनियोग अधिक चांगला होईल यासाठीच सातत्याने प्रयत्न केला. पैसा आपला नाही तो जनतेचा आहे ही धारणा त्यांच्या अंतकरणात सातत्याने जोपासली. त्यामुळे तो पैसा जपूनच वापरायला हवा असं म्हटले जायचे. एकदा महात्मा गांधी, आचार्य कृपलानी, आणि आचार्य भन्साळी पुण्याच्या पर्वती टेकडीवर दर्शनासाठी जाऊन परतीचा प्रवास करत होते.गांधीजींना ज्यांच्याकडे भोजनाचे निमंत्रण होत त्यांच्याकडे जाण्यासाठी घोडागाडी करावी अशी विनंती कृपलानी यांना केली. त्याप्रमाणे घोडागाडी ठरवली आणि निर्धारित ठिकाणी जाण्यासाठचा प्रवास सुरू झाला. त्यासाठीचे भाडे म्हणून त्यांनी पाच रूपये ठरवले गेले होते. घोडागाडी सुरू होणार तेवढयात एक महाविद्यालयीन विद्यार्थी गांधीना पाहताच धावतच त्यांच्याकडे आला आणि स्वाक्षरी मागू लागला. गांधीजी म्हणाले स्वाक्षरी मोफत मिळणार नाही. आपल्या सार्वजनिक कामासाठी आर्थिक मदत करावी अशी विनंती केली. ती विनंती ऐकताच विद्यार्थ्यांने स्वाक्षरीसाठी तात्काळ गांधीजींना दहा रूपये दिले. गांधीजींनी तात्काळ ते दहा रूपये कृपलानी यांच्या हाती दिले. त्यातूनच घोडागाडीचे भाडेही देण्यास सांगितले. त्यांनी नियोजित ठिकाणी घोडागाडी पोहचताच त्या घोडागाडीच्या चालकाच्या हाती दहा रूपयाची नोट दिली. ती नोट घेऊन चालक निघून गेला. घोडागाडीतून उतरून पुढे चालू लागताच गांधीजींनी उरलेल्या पाच रूपया विषयी चौकशी केली, तर घोडागाडीवाला दहा रूपये घेऊन निघून गेला असे सांगण्यात आले. तेव्हा गांधीजी म्हणाले की, आपण त्याला पाच रूपयात नियोजित ठिकाणासाठी चे भाडे ठरवले होते. मात्र तुम्ही सार्वजनिक कामासाठी मिळालेल्या दहा रूपयातील पाच रूपये कृपलानी यांनी घालविल्याने त्यांनी भरपाई म्हणून आता रात्रीचे जेवन घेऊ नये असे महात्मा गांधी यांनी त्यांना सांगितले. त्यामुळे यजमानाच्या घरी जाताच गांधीजींनी त्यांना केवळ दोघांचेच जेवण बनविण्यास सांगितले. खरंतर आचार्य कृपलानी थकलेले होते पण हातून चूक झाल्याने त्यांना उपाशीपोटी झोपावे लागले होते. आपल्या हाती असलेल्या सार्वजनिक निधीतील पाच रूपये वाया गेले याबददल गांधीजींना चिंता वाटत होती. समाजाच्या प्रति असलेली प्रिती आणि विश्वास यामुळे त्यांनी समाजाचा विश्वास संपादन केला होता. त्यामुळे गांधीजींनी केवळ आवाहन केले तरी कोणतेही माध्यम उपलब्ध नसताना लाखो लोक त्यांच्या आंदोलनात सहभागी होत होते. आज असा विश्वास कमविणारी माणसं आपल्या भोवतालमध्ये कमी झाली आहेत. समाजमाध्यम, प्रसारमाध्यमात जे काही छापले जाते त्यावरून लोक जे अनुमान करतात त्यावरून लोकांचा विश्वास कमी होत चालला आहे. खरेतर आपल्या लोकशाही व्यवस्थेत ज्यांनी पारतंत्र अनुभवले होते ती माणसं स्वातंत्र्यात देखील अधिक जबाबदारीने वागत होती. सामान्य माणसांच्या उध्दाराचा विचार त्यांच्या मस्तकात ठासून भरलेला होता. अगदी अलिकडच्या काळाचा विचार केला तरी आपल्या देशाचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या आठवणी लिहिताना राम खांडेकर यांनी म्हटले आहे की. मी एक दिवस पंतप्रधानांच्या स्वयंपाक गृहात गेलो तेव्हा तेथील तांदूळ पहिला तर मला धक्का बसला. तो तांदूळ कमी प्रतीचा होता. मी स्वयंपाक करणाऱ्याला विचारले तर त्याने जे सांगितले ते धक्कादायक होते. पंतप्रधान नरसिंहराव यांच्या भोजनात रेशनचा तांदूळ होता. त्यांच्याकडे रेशनकार्ड होते आणि तेथून ते तांदूळ आणत होते. देशाचे पंतप्रधान रेशनकार्डवरील तांदूळ आपल्या आहारात उपयोगात आणत होते. किंबहुना तिथे जे कोणी जेवत होते त्यांनाही तोच तांदूळ वापरला जात होता. लालबहादूर शास्त्री आपल्या देशातील गरीबांना एकवेळेचे अन्न मिळावे म्हणून स्वतः एक दिवस उपवास करत होते. हे समाजाबददलचे प्रेम, आस्था त्यांच्या ठायी होती म्हणून लोकांच्या त्या नेतृत्वावर विश्वास होता. आज आपल्या सर्वच नेतृत्वाने सामान्यांचा विश्वास गमवला आहे का ? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. सामान्य माणसांचा विवेक आणि निष्ठा नेहमीच असंशयीत असते. ते अधिक जबाबदार असतात. त्यांच्याच हाती परीवर्तनाची दोरी असते. जेव्हा ती माणसं ठरवतात तेव्हा लोकशाहीचा उत्सव अधिक उत्सवाने खेळला जातो.. आणि तेच योग्यवेळी या निर्णय घेत असतात. त्यांचा सदसदविवेकबुध्दी अधिक शाबूत असते. ते सतत आपला भोवताल जाणत असतात. त्यामुळे सामान्यांच्या निष्ठेवरती संशय घेऊन लोकशाही उत्सवातील काही बरे वाईट केले जात असेल न, पण त्याला ते सामान्य लोक जबाबदार नाहीत हे लक्षात घ्यायला हवे.

मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पण ते केवळ प्रयत्न, कायदे, नियम करून होण्याची शक्यता नाही. यासाठी लोकप्रतिनिधी लोकप्रशासन आणि सामान्य माणसं यांच्यामध्ये विश्वासाचा पूल निर्माण करावा लागेल. तो जितका उंचावेल तितक्या मोठ्या प्रमाणावर मतदानाची टक्केवारी वाढेल. अन्यथा मागच्या पानावरून पुढे चालू असेच घडण्याची शक्यता अधिक आहे.

# तुका म्हणे ऐसे जाणतसो वर्म । करणे तो श्रम न वजे वांयां ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**वाचावा आणि समजून घ्यावा असा आपल्या सर्वांचा जिवलग सोयरा म्हणजे लोक कवी तुकाराम! तुकारामांची संगत मोठी गमतीदार आहे. तसं संगत प्रत्येकाचीच गमतीदार असते. ज्याच्या संगतीत जाल त्याप्रमाणे तुम्हाला त्याचे गुण किंवा दोष लागतातच. माय-बाप वाचक, सज्जनहो बघता बघता तुकाराम नीती तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. मागील वर्षी एक वर्ष संपन्न झाल्यानंतर दै.आधुनिक केसरी या लोकप्रिय दैनिकाचे संपादक श्रीमान डॉ.प्रभुजी गोरे यांना, "आता तुकाराम नीती थांबवू का?" असा प्रश्न केला असता त्यांनी, "सर, तुकाराम नीती अजिबात थांबवू नका" असे बोलून लिहित्या हातांना आणखीनच लिहिते केले, बळ दिले.**

एवढेच काय मला जगद्‌गुरू तुकोबांच्या संगतीत आणखी काळ घालवण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली. ही दोन वर्षे आणि त्या दरम्यान चिंतन केलेले जवळपास ८६ अभंग हा माझ्या जीवनातील अनमोल खजाना निर्माण झाला आहे. या दोन वर्षांच्या दरम्यान तुकोबांच्या संगतीमुळे अनेक व्यासंगी, वाचक, लेखक, समीक्षक, कवी यांचे अनमोल मार्गदर्शन आणि आत्यंतिक प्रेम लाभले. अनेक लोकांच्या अनमोल प्रतिक्रिया आल्या. महाराष्ट्रभर मोठा मित्र परिवार जोडला गेला. तुकाराम नीतीने महाबळेश्वर येथील फॉरेस्ट ऑफिसर श्री दत्तराव कदम साहेब जोडले गेले. आत्ताच संपन्न झालेल्या तुकाराम बिजेला "धन्य आम्ही तुका वाचीयेला...!" हा लेख प्रकाशित झाला होता. तो लेख दै.आधुनिक केसरी बरोबरच इतर अनेक वर्तमानपत्रात प्रकाशित झाला. तो लेख दै.वृत्तरत्न सम्राट सारख्या लोकप्रिय छापील वर्तमानपत्रात मुंबईतून प्रकाशित झाला. तो लेख वाचून अनेक बौद्ध धम्म अनुयायी बंधू-भगिनी-वाचकांचे फोन आले. सेवानिवृत्त सहाय्यक कमिश्नर मा.श्री सुरेश गायकवाड साहेब पुणे, पोलीस उपनिरीक्षक घोडके साहेब बीड त्याचबरोबर अनेक संशोधक, कादंबरीकार वाचकांचे फोन आले. त्या लेखातील तुकोबांच्या जीवनावर लिहिलेला माझा अभंग अनेकांनी मला वाचून दाखवतांना त्यातील आशय आवडल्याचे सांगितले. तोच लेख माजलगावच्या श्री शिवाजीराव ढाकणे मामांच्या साप्ताहिक गौरीपूर दर्शन मध्ये प्रकाशित झाला. त्यातून शिरूर कासारचे कवी, कादंबरीकार, कथाकार डॉ.विठ्ठल जाधव सर जोडले गेले. अनेक प्राध्यापक जसे अंबेजोगाईचे मित्रवर्य, सुप्रसिद्ध गझलकार, कविवर्य डॉ.मुकुंद राजपंखे सर, जालण्याचे लेखक मित्र डॉ.पुरुषोत्तम जुन्ने सर, लेखक, कीर्तनकार, प्रकाशक डॉ.बालाजी जाधव सर, मंठा येथील सुप्रसिद्ध कवी, लेखक, प्रकाशक डॉ.धोंडोपंत मानवतकर सर आणि असे अनेक प्राध्यापक सन्मित्र अवर्जून प्रतिक्रिया देतांना लिहायला बळ देतात. त्याचबरोबर अनेक संशोधकांनी या तुकाराम नीतीचा उपयोग आपल्या संशोधनासाठी करत असल्याचे कळवले आहे. एवढेच काय, दोन-तीन कीर्तनकारांनी कीर्तनासाठी तुकाराम नीतीचा उपयोग होतो असे कळवले आहे. त्याच्या जोडीने एक व्याख्याता आहेत, जे तुकाराम नीती व्याख्यानासाठी वापरतात असे कळवले आहे. माय-बाप सज्जनहो, खरंच मी आपला हृदयातून ऋणी आहे. मागील दोन वर्षात जे काही लिहिले त्यातील माझे काहीच नाही. मी केवळ एक हमाल आहे. एका हमालाला आपण एवढे प्रेम दिले, माझी हमाली काही प्रमाणात




का होईना फलद्रूप झाली. हे माझे मी परम भाग्य समजतो आणि माझी हमाली अखंड चालूच ठेवतो.

तुकाराम नीती लिहितांना मी काहीही ठरवून लिहित नाही. मी संपूर्ण तुकाराम गाथा एकदा वाचला आहे. तुकाराम नीती हे चिंतन लिहिण्यासाठी मी अभंग क्रमांक एक पासून क्रमाने वाचतो आहे. मागील ८४ भागापर्यंत मी सलग तुकोबांचा गाथा वाचत आलो आहे. त्यातील जे अभंग मला भावले, ज्यातील तुकोबांचे चिंतनाने मला लिहिते केले असे अभंग मी निवडले आहेत आणि निवडत आहे. आजच्या १२७५ क्रमांकाच्या अभंगाअगोदर मी चिंतन मांडलेले अभंग आणि त्यातून सुटलेल्या अभंगात अनेक महत्वपूर्ण अभंग असतीलही, तर त्यावर इतरांनी आपले चिंतन मांडावे. असे झाल्यास "तुम्ही आम्ही खेळी मेळी" या वारकरी न्यायाने सर्वच अभंगावर उत्तम चिंतन होईल. आत्तापर्यंत अनेक समीक्षकांनी तुकोबांच्या जीवन आणि अभंगावर लिहिले आहे. त्या सर्वांच्या लिहिण्याने आणि तुकोबांच्या अखंड संगतीने मलाही त्यांच्या जीवन-अभंगांवर चिंतन करण्याची दै.आधुनिक केसरी वर्तमानपत्राने संधी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहे. क्रमाने चिंतन करण्यासाठी निवडलेला तुकोबांचा

**बोलिलें चि बोलें पडपडताळुनी । उपजत मनी नाही शंका ॥१॥ बहुतांची माय बहुत कृपाळ । साहोनी कोल्हाळ बुझावीसी ॥धृ॥ बहुतांच्या भावे वांटीसी भातुके । बहु कवतुकें खेळविसी ॥३॥ तुका म्हणे ऐसे जाणतसो वर्म । करणे तो श्रम न वजे वांयां ॥४॥ (१२७५)**

हा आणखी एक अभंग जो आपल्याला पुन्हा चिंतन करायला भाग पडतो. तुकोबा मोठे विस्मयकारी विचारवंत, कवी होऊन गेले. ते जेंव्हा अभंग बोलत असायचे आणि कीर्तनात त्यावर लोकांना उपदेश करतांना त्यांना सर्व अभंग उत्स्फुर्तपणे वहायला लागायचे. ते होत असतांना समकालीन समाज, धर्म किंवा अन्य एखादी व्यवस्था जी तुकोबांना खटकते त्यावर ते सहजतेने भाष्य करत. तुकोबा कधीही ठरवून लिहित नसावेत. त्याचं उत्स्फूर्त लेखन म्हणजे त्यांना सहज लागलेला झरा आहे. झाडाला नव्याने फुटलेली टवटवीत नव पालवी! त्यातून त्यांना वेगवेगळे शब्द सुचायचे आणि त्यातून अनेक अभंग जन्म घेत असावेत. तुकोबांनी शेकडो अभंग उत्स्फूर्तपणे गायिले अथवा बोलले असावेत. त्यातील जेवढे लोकांच्या मनात अथवा श्री संत जगनाडे महाराजांना आठवले तेवढेच आज आपल्याला वाचायला मिळतात. श्री संत जगनाडे महाराजांचे वारकरी संप्रदाय आणि मराठी कवी, लेखक यांच्यावर हे अनंत उपकार आहेत. संत जगनाडे महाराजांना संत तुकाराम महाराजांएवढेच अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले दिसून येते. एकेक अभंग लक्षपूर्वक ऐकणे, लोक संपर्क करून त्यांना पाठांतर असलेले दुर्मिळ अभंग गोळा करून त्यांना लेखन संस्कार देणे आणि मग लिहिणे. एवढे मोलाचे कार्य नव्हे नव्हे हे त्या काळातील उत्तम प्रकारचे मुद्रित शोधनच!

प्रस्तूत अभंगात तुकोबाराय स्वतःला, वाचकांना आणि लोकांना उपदेश करतांना महत्वपूर्ण बाबींवर लक्ष केंद्रित करतात. साधारणतः तुकोबा स्वतःशी, कीर्तनात समोर बसलेल्या लोकांशी अथवा प्रत्यक्ष देवाशी संवाद साधतात. त्यांचा संवाद मोठा सरळ, रोखठोक आहे. त्यांच्याकडे कुणाचीही भीडभाड नाही. प्रस्तुत अभंगात माणसाने कसे बोलावे, त्यातून शेवटी ईश्वराशी म्हणजे स्वतःशी कसा संवाद साधावा( ?) याचे हा अभंग उत्तम उदाहरण आहे. माणसाने बोलतांना पुन्हा पुन्हा विचार करून बोलावे. तसे केल्यास आपण बोललेल्या विषयी मनात कोणतीही शंका शिल्लक रहात नाही. एकदा का माणूस निःशंक होऊन बोलायला लागला की; त्याला कशाची भीती राहत नाही. माणसाचे मन निर्भय बनते. माणसाचे मन निर्मळ असले की; माणसाला कशाचीही भीती रहात नाही. त्याच अनुषंगाने तुकोबाराय प्रत्येकाच्या आईला निर्भयतेसोबत जोडतात. इथे प्रत्येकाची आई प्रेमळ, कृपाळू असते. ती एक दिव्यतत्व घेऊन आपल्याला जन्म देत असते. अनंत कोल्हाळ म्हणजेच अनंत संकटे झेलून ती आपल्याला उपजवित असते. त्याचबरोबर पृथ्वीतलावरील दिव्य गोष्टी जसे सूर्यप्रकाश, हवा, झाडे, पाणी ज्यांच्या आधाराने माणसातील चैतन्यशक्ती जिवंत आहे अशा सर्वच बाबी सुद्धा आपल्यात ईश्वरी शक्तीने जिवंत आहेत. या सर्वांच्या रूपाने आपले आई-वडील आपले पालन पोषण करत असतात. ती म्हणजे एका ईश्वराचीच रूपे आहेत. त्यामुळे ही ईश्वराची रूपे अनेक रूपाने आपल्या सर्वांना प्रमाचे भातुके म्हणजेच प्रसाद वाटत असतात. भातुके म्हणजे आई-वडील-भाऊ बाजाराला गेल्यानंतर जसे खाऊ आणतात त्यालाच भातुके म्हणतात. तसा विविध गोष्टीत आणि चराचरात प्रवाही असणारा हा ईश्वर आपल्याला मोठ्या कौतुकाने खेळवत खेळवत, कधी हसवत तर कधी रडवत जागवत आणि जगवत असतो. असे हे सोपे असणारे संसाराचे गणित तुकोबांना उमजले आहे. आम्ही जो जो श्रम करतो तो तो श्रम वाया जात नाही. असे सहज सोपे जगण्याचे गणित मांडत मांडत तुकोबाराय आपले अभंग लेखन करतात. आपले कीर्तन सांगत असतात. तुकोबांना एखादा फार मोठा वेदांत अथवा सिद्धांत सांगायचा नाही. माणसाला आपले दैनंदिन जगणे सहज सोपे व्हावे हाच त्यांचा मूळ हेतू होता. त्यांच्या जीवन, अभंग-कीर्तनातून तत्कालीन असो की; आज समकालीन असो, एकच महत्वपूर्ण तत्व म्हणजे माणसाने माणसाला त्याचे दैनंदिन जगणे-वागणे सोपे जावे.

सज्जनहो, तुकोबाराय आपलेसे करून घेतले तर वाचायला, समजायला आणि अंगीकार करायला सहज सोपे आहेत. त्यांनी काहीही अवघड किंवा गूढ तत्वज्ञान पाजळले नाही. अलीकडे कीर्तनकार जगद्‌गुरू तुकाराम समजावून सांगतांना अधिकच क्लिष्ट आणि किचकट करत आहेत. तुकारामाचे सहज सोपे अभंग वाङ्मय अवघड न करता आपण गाथा आपले लाडके लेकरू समजून दररोज मांडीवर घेऊन बसावे. असे नियमित केल्यास त्या बाळाचा आपल्याला लळा लागेल. एकदा लळा लागला की; आनंदी जगण्याचा जीवन मळा सहज फुलून येईल. जिकडे तिकडे फुलांचा सुगंध दरवळू लागेल. असे होणे म्हणजेच तुकोबारायरुपी वसंत जीवनात बहरणे होय. जय तुकोराय!



# शालेय अभ्यासक्रमात छत्रपती संभाजी महाराज शिकवले जावेत !

आधुनिक केसरी

फाल्गुन अमावस्या म्हणजेच छत्रपती संभाजी महाराजांचा बलिदानदिन. धर्मरक्षणासाठी मृत्यूलाही हसत कवटाळणारा असा युगपुरुष महाराष्ट्राच्या इतिहासात ना कधी झाला आणि पुन्हा होणेही नाही. पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याची पताका डौलत ठेवण्याची आणि स्वराज्याचे सर्वार्थाने रक्षण करण्याचे महत्कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनंतर संभाजी महाराजांनी केले.

म्हणूनच त्यांच्या नावापुढे 'स्वराज्यरक्षक' ही उपाधी लावली जाते. मध्यंतरी 'स्वराज्यरक्षक संभाजी महाराज' या मालिकेतून छत्रपती संभाजी महाराजांचा भीमपराक्रम जनतेसमोर आणला गेला; मात्र पुढे या मालिकेनेही इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप निर्मात्यांवर करण्यात आला. संभाजी महाराजांविषयी इतिहासकारांनी लिहिलेल्या उलट सुलट बाबींमुळे महाराजांविषयीचा खरा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत आजतागायत कधी पोहोचलाच नाही. महाराजांच्या सडेतोड वृत्तीमुळे म्हणा किंवा कर्म धर्म संयोगाने म्हणा, महाराजांचे अहित पाहणारे लोक दुर्दैवाने स्वराज्यातच निर्माण झाले होते. या सर्वांना छत्रपती संभाजी महाराज मात्र पुरून उरले. ज्या महाभागांनी स्वराज्याचे खाऊन स्वराज्याशी बेईमानी केली त्यांच्याच पुढच्या पिढीच्या काही लोकांनी इतिहासकार बनून संभाजी महाराजांविषयी खोटेनाटे लिहून महाराजांना बदनाम करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. परिणामी एका असामान्य योध्याचा महत्पराक्रम अनेक पिढ्यांपासून झाकोळला गेला. ज्यामुळे आजपर्यंतच्या शालेय अभ्यासक्रमातही संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यातच आटोपण्यात आला आहे. देशाच्या भावी पिढीलाही या पराक्रमी योध्याच्या सर्वगुणसंपन्नतेची ओळख व्हावी यासाठी शालेय अभ्यासक्रमात संभाजी महाराजांचा सत्य इतिहास सविस्तरपणे शिकवण्यात यावा.

सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई

# कर्तव्य...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग 43

हक्कासोबत कर्तव्य राहत असतं. जिथे आपण हक्कासाठी भांडतो तिथे आपलं कर्तव्य काय आहे आणि ते आपण पार पाडले आहे का ? हे आधी पहावं आणि मगच हक्कासाठी भांडावं.

आई वडील ज्याप्रमाणे मुलांप्रती आपले कर्तव्य चोखपणे पार पाडतात. त्याप्रमाणे मुलांनी सुद्धा आई-वडिलांप्रती आपले कर्तव्य तत्पर पार पाडावे. कारण आई वडील आपलं संपूर्ण आयुष्य मुलांसाठी खर्ची घालतात. मुलांना तर फक्त काहीच वर्ष आईवडिलांसाठी द्यायची असतात. मग ती आनंदाने त्यांना द्यावीत. आपले कर्तव्य जबाबदारीने मुलांनी पार पाडावीत. बऱ्याचदा आई-वडिलांच्या संपत्तीसाठी मुलं भांडतात. भांडण्याआधी विचार करा आपण आपलं कर्तव्य पार पाडलं आहे का ? तरच आपल्या हक्कासाठी भांडता येईल. देशाचा नागरिक म्हणून सुद्धा आपली काही कर्तव्य असतात. तिथेही आपण शिस्त पाळावी. उदाहरणार्थ रस्त्यावर थुंकू नये. कुठेही कचरा टाकू नये. प्लास्टिक रॅपर कुठेही फेकू नका. ते आपल्या पिशवीत ठेवा. आपण ज्या बागेत फिरायला जातो तिथली काळजी घ्या. कधीतरी तिथे थोडे बागकाम करा. एखादं झाड लावा. त्याला जगवा. कोणत्याही राष्ट्रीय संपत्तीचा विध्वंस करू नका. त्या संपत्तीची काळजी सर्वांनीच घ्यावी. आपल्या मुलांची, पतीची, पत्नीची, आई वडिलांची ,भाऊ बहिणीची खूप काळजी घ्या. त्यांच्यासाठी आपली जी कर्तव्य आहेत ती वेळेत आणि योग्य पद्धतीने पार पाडा .सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालू नका. मंदिरात कचरा करू नका. आवाज करू नका .शांतता ठेवा. घरातील रेडिओ टीव्ही चा आवाज शेजाऱ्यांना त्रास होईल एवढा ठेवू नका.


आपल्या अंगणातील कचरा दुसरीकडे फेकू नका. पाणी भरून झाल्यास नळ बंद करू. विनाकारण पाणी मारणे ,गाडी नळीने धुणे यामुळे पाणी वाया जाते. अशी जी लहान लहान आपली कर्तव्य असतात ना ती जागरूकपणे करू या. कुठली गोष्ट आपल्या मालकीची आहे म्हणजे तिच्यावर आपला पूर्ण हक्क असतोच असं नाही. चला तर मग हा एवढा लेख वाचला हेही आपलं एक कर्तव्य झालं वाचनाचं. चांगलं वाचन नक्की करा...

# 'अग्निदिव्या'तून 'अग्निसाक्ष'कडे!

आधुनिक केसरी

**एका स्त्रीचा जीवनलढा 'अग्नितांडव' मधून तो 'अग्निदिव्य' बनत गेला.म्हणूनच हा जीवनप्रवास केवळ त्या महिलेपुरता मर्यादित न राहता त्याला अनेक छटा आहेत.आशिष निनगुरकर लिखित 'अग्निदिव्य' हे पुस्तक नुकतेच चपराक प्रकाशनाद्वारे रसिकवाचकांच्या भेटीला आले आहे.या चरित्रात्मक पुस्तकाचा घेतलेला हा मागोवा....**

'अग्निदिव्य' हे पुस्तक वाचतांना एका स्त्रीचा लढा केवळ 'अग्नितांडव' न राहता तो 'अग्निदिव्य' कसा बनत गेला याची प्रचिती होते. कारण पुस्तकाच्या या नावातच या पुस्तकाचा सर्व गाभा दडलेला आहे. एका मुलाची आंतरिक वेदना,एका महिलेचा आभाळाएवढा संघर्ष व समाजमन असे तीन टप्पे युवालेखक आशिष निनगुरकर यांच्या 'अग्निदिव्य' या चरित्रात्मक पुस्तकात आहेत. एका महिलेने व तिच्या मुलाने केलेला संघर्ष म्हणजे हे पुस्तक अशीच प्राथमिक ओळख या पुस्तकाची करून द्यावी लागेल.'चपराक प्रकाशन'ने रमाबाई कांबळे यांच्या जीवनावर नुकताच प्रकाशित केलेला व लेखक श्री आशिष निनगुरकर यांचा "अग्निदिव्य" हा ग्रंथ वाचनात आला. एखाद्या स्त्रीला किती संकटाना सामोरं जावं लागते, त्याची काही परिसीमा असते. परंतू सदर ग्रंथातील नायिका रमाबाई कांबळे यांच्यावर लागोपाठ येणाऱ्या संकटांना कसलेली परिसीमा नाही. धुणीभांडी करावी लागणे तसेच खेळण्याच्या वयात लहान भाऊ कर्करोगाने त्रस्त होतो आणि नोकरीमुळे वडील बाहेरगावी असल्यामुळे साहजिकच घराची जबाबदारी मोठी मुलगी या नात्याने रमाबाईवर येऊन पडते आणि इथून तिच्या आयुष्याची जी फरपट चालू होते, ती पार सासरच्या घरापर्यंत सुरू राहते आणि पुढे पती निधनानंतरही हे वादळ काही थांबायचं नाव घेत नाही. तरीही एक बाई म्हणून आपलं समाजभान बाळगत बाळगत "आईपण" सुद्धा जपत जाते आणि अभिषेकला (तिच्या मुलाला) स्वतःच्या पायावर उभे राहायला सक्षम करते. हा प्रवास वाचायला साधा वाटत असला तरी जीवन प्रवास म्हणून कापायला सोपा नव्हता. उदा. आपल्या लग्नात स्वतःचे आईवडिल आणि बहीण भाऊ कोणीच हजर राहू न शकणं किंवा "आपला नवरा मेला आहे" ही खबर सहा महिन्यांनी मिळणं, मुलाला आपला बाप (म्हणजे वडील) आपण दहावीत गेल्यावर म्हणजे जवळ सोळा वर्षांचा झाल्यावर बघायला मिळणं ही कल्पनाच करवत नाही. काही प्रकरणे वाचताना तर अक्षरशः पोटात गोळा उठतो. पुस्तक वाचताना आतल्या आत वेदना होते. इतकं दुःख या चित्तारकथेत मांडण्यात आलेले वास्तव सत्य आहे. दोन वर्षांपूर्वी लेखक आशिष निनगुरकर यांच्या आयुष्यात एक मित्र आला. मुंबईच्या साकिनाका डाक कार्यालयात काम करतांना त्यांना भेटलेला हा मित्र अभिषेक कांबळे.त्याचा जीवनप्रवास ऐकल्यावर लेखकाला राहवले नाही. अभिषेकच्या मनात त्याच्या भूतकाळाविषयी अनेक प्रश्न होते, त्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आटोकाट प्रयत्न लेखकाने चालू केला. मित्रत्व स्वीकारलं की सगळ्या गोष्टी कराव्या लागतात. सुख-दुःख वाटून घ्यावे लागतात. तशी त्यांची ती प्रोसेस सुरू झाली. तेव्हाच या विषयावर लिहावे, हे लेखकाने मनाशी पक्के केले असावे. अभिषेक त्याच्या भूतकाळात पूर्णपणे अडकला होता. कदाचित त्याला मन मोकळे करायचे होते आणि त्याला मन मोकळं करण्याला लेखकाची हक्काची जागा भेटली.त्याने सांगितलेली त्याची व त्याच्या आईची वास्तव चित्तरकथा म्हणजेच हे 'अग्निदिव्य'.'अग्निदिव्य' या पुस्तकाची दर्जेदार निर्मिती चपराक प्रकाशन ने केली आहे.जेव्हा चपराकचे प्रकाशक-संपादक घनश्याम पाटील यांनी हा विषय ऐकला,तेव्हाच तात्काळ या पुस्तकाला होकार दिला आणि 'अग्निदिव्य'चा जन्म झाला. एका महिलेचा संघर्ष,माहेर-सासर जबाबदारी,त्यातून वाढलेल्या अनेक गोष्टी या सर्व परिस्थितीतून एका स्त्रीला कशाप्रकारे सर्व गोष्टींमधून जावे लागते. सासर व माहेरची दोन्ही नाती कशी सांभाळावी लागतात.हे सर्व समजून घेण्याचा प्रयत्न या चरित्रातून दिसून येतो.रमाबाई कांबळे यांचा जीवनप्रवास अतिशय खडतर होता तसेच त्यांच्या वाटेत प्रत्येकवेळी काटेच आले आहेत.तरी त्यांनी आत्महत्या न करता,प्रत्येक संकटाला झुगारून सर्व गोष्टींचा सामना केला.




हार मानली नाही.

अभिषेक व त्यांच्या आईचा जीवनपट किती काळीज फाडून दुःख देणारा आहे,हे पुस्तक वाचल्यावरच तुम्हाला कळू शकेल. पण खरं सांगू तर अशी वेळ कुणावर येऊ नये असे वाटते. एक स्त्री आपल्यावर आलेल्या सर्व संकटावर कशी मात करते.वेळप्रसंगी पळ न काढता प्रत्येक गोष्टीला कशी सामोरी जाते. तोंड देते,कुणाच्या खोट्या आश्वासनांना बळी पडत नाही.

प्रत्येकाच्या जीवनात अनेक चढउतार येत असतात. आयुष्य हे असेच चित्रविचित्र गुंतागुंतीचे बनलेले आहे.कुठलाही रस्ता सरळ नसतो आणि सहजसोप्या पद्धतीने काहीच मिळत नसते आणि सहजसोपे काही मिळाले तरी त्याची किंमत नसते. कोणतेही मोठे दुःख झाले तरी आत्महत्या करणे हा शेवट असता कामा नये.या सगळ्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला 'अग्निदिव्य' वाचून मिळू शकतात, फक्त आपण ती शोधायला हवीत.

आत्मचिंतन करायला हवे. हे पुस्तक वाचून तुम्हाला सकारात्मक ऊर्जा मिळेल आणि ती आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या जगात जगायला बळ देईल. नात्यांची वस्तुस्थिती कळेल. या पुस्तकासाठी अभिषेक व त्यांच्या आई रमाबाई यांचे मला कौतुक वाटते,त्यांनी स्वतःच्या जीवनाचे चांगले-वाईट अनुभव अगदी खरेपणाने लेखक आशिष यांच्याजवळ व्यक्त केले आहेत आणि लेखकाने कुठलीही अलंकारिक किंवा अतिशयोक्ती न करता अगदी साधेपणाने ही चरित्रागाथा मांडली आहे.त्यामुळे हा जीवनपट वाचतांना डोळे पाणावतात व जगण्याची नवी उमेद देतात.'चपराक प्रकाशन'चे संपादक श्री.घनश्याम पाटील यांचे या पुस्तकाची निर्मिती केल्याबद्दल जेवढे आभार मानावेत तेवढे कमीच आहेत. त्यांच्या कल्पक,अभ्यासू, वैचारिक व रसिक वृत्तीमुळे या पुस्तकाला एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे. संतोष घोंगडे यांनी पुस्तकाला साजेसे असे उत्तम असे मुखपृष्ठ साकारले आहे.

एका संकटग्रस्त कुटुंबातील स्त्रीला संशयकल्लोळातून कोणत्या अग्निदिव्यातून जावं लागलं, हे सांगणारी ही वास्तव कथा. लागोपाठच्या संकटांनी तिच्या आयुष्याची परवड झाली. त्यातही ती खंबीरपणे उभी राहिली. संकटांशी दोन हात केले. आपल्या मुलासाठी संघर्ष केला. अनंत अडचणींवर मात केली. मुलाला अर्थार्जनासाठी सक्षम केलं. त्याच्या पायावर उभं केलं. एका आईचं कर्तव्य पार पाडलं. कुठलाही दोष नसताना, गैरसमजाच्या अग्निदिव्यातून जात तिनं एक महत्त्वाचा टप्पा गाठला. यात आपलं अस्तित्व, ओळख मात्र ती पार विसरून गेली. अजूनही तिची वाटचाल संपलेली नाही. अजूनही तिची वाटचाल सुरूच आहे. तिच्या कष्ट-त्याग-समर्पणाचीच ही एक गाथा-गाथा अग्निदिव्याची. लेखक श्री. आशिष निनगुरकर यांनीही कमालीची संवेदशीलता दाखवून आपली लेखणी झिजवली आहे. शुद्ध लेखनाच्या अंगाने पुस्तक एकदम निकोप असून छायाचित्रांमुळे अधिक बोलके वाटते. बांधणी मजबूत आणि कागदाचा दर्जा उत्कृष्ट असल्यामुळे सदर ग्रंथासाठी दोनशे रुपये शुल्क म्हणजे नाममात्र आहे. रमाबाई यांचा जीवनपट वाचून आपल्या जीवनातील असंख्य अडचणी आपल्याला नगण्य वाटतील व स्त्रीचा आदर करणे गरजेचे आहे हे देखील मनोमन पटते. नात्यांची ओळख सांगणारे हे आशयघन पुस्तक काळजाचा ठाव घेणारे आहे. अशा चरित्रात्मक "अग्निदिव्य"साठी भरघोस शुभेच्छा!

**राजू रणवीर**
**(लेखक डाक सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत)**

**पुस्तक- अग्निदिव्य**
**प्रकार- चरित्र, लेखक- आशिष निनगुरकर**
**पृष्ठे- १२० पाने, किंमत- २०० रूपये**
**प्रकाशक- चपराक प्रकाशन**

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आता उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शक्यतो सर्वजण पाडव्याला श्रीखंड किंवा देवाला नैवेद्यासाठी पुरणपोळी असा मेनू करत असतात. श्रीखंड हा तसा सोप्पा पदार्थ आहे आणि बहुतेक सर्वांना आवडते त्यामुळे नेहमी केले जाते, नाहीतर विकत सुद्धा आणले जाते. सध्या फळे सुद्धा छान मिळतात. त्यामुळे पारम्पारीक श्रीखन्ड न बनवता विविध फळे ,ड्रायफ्रुट्स, आणि आंबट गोड मधुर चव असलेली हेल्दी स्वीट डिश बनवली तर सर्वांना नक्कीच आवडेल . चला मग बनवायला.

**साहित्य :** अर्धा किलो घट्ट चक्का, 1 चमचा लोणी, पाव किलो पिठीसाखर, पावकिलो साखर , वेलदोडे पुड व जायफळ पुड अर्धा चमचा, पाव कप दूध ,केशर, सफरचंद, द्राक्षे, मोसंबी , पपई, छान पिकलेला गोड अननस, चेरी , डाळिम्ब सर्व फळे मिळून आपापल्या आवडीनुसार 2 बाऊल, बदाम, काजू मनुका, पिस्ते सर्व मिळून पाव बाऊल

**कृती :** प्रथम एका कढई मध्ये साखर घालून ती बुडेल एवढे पाणी घालून गॅस वर पाक करण्यास ठेवावा. साखर पूर्ण विरघळली की आणि बुडबुडे आले की गॅस बंद करावा . मग त्यामध्ये वेलची.. जायफळ पुड घालावी. दूध थोडे कोमट करून त्यात केशर काड्या घालव्यात. नंतर चक्का लोणी मिसळुन तारेच्या चाळणीमधून छान फेटून गाळून घ्यावा म्हणजे छान टेक्चर येईल.विकतचा चक्का कधी कधी कमी ओशट असतो ,त्यामुळे लोणी घातले की ओशटपणा येतो आणि चवही वाढते. आता पाक थंड झाला असेल. त्यात आधी सफरचन्द, चेरी, अननस या सारख्या घट्ट फळांच्या बारीक फोडी घालून हलवाव्यात नंतर पपई, मोसंबी, आवडत असेल तर किनू , चिक्कू, केळी यांसारखी गोड चवीची फळे घालावीत. पाकात फळे घातल्यामुळे चमक छान येते. नंतर ड्रायफ्रुट्स घालून केशर घातलेले दुध घालुन सर्व व्यवस्थित एकत्र करावे. पाकामुळे श्रीखन्ड थोडे पातळ होण्याची शक्यता असते म्हणुन शेवटी पिठीसाखर घालून पुन्हा सर्व छान एकत्र करावे व सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून फ्रिज मध्ये थंडगार करून वरुन सजवुन सर्व करावे.

**वैशिष्टय :** उन्हाळ्यात शरीराला पाण्याची खूपच गरज असते . फळे शरीराला थंडावा देतात, गोड रसांमुळे पित्ताचा त्रास होत नाही . आणि त्यात विविध प्रकारची व्हिटॅमिन्स असतात जी अत्यंत गुणाकारी ,लाभदायक असतात . शरीरातील पाण्याची पातळी व्यवस्थित राहते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते .फायबर्समुळे पचन क्रिया व्यवस्थित होते . केसांपासून ते त्वचा आणि नखांपर्यंत संपूर्ण आंतरबाह्य शरीरासाठी फळे, दह्यातील व लोण्यातील स्निग्धता , साखरेतील गोडी , ताकद वाढवून एनर्जी मिळण्यासाठी ड्रायफ्रुट्स खूप उपयुक्त आहेत चव सुद्धा एकदम भन्नाट असून नावीन्यपूर्ण डिश बनवल्याचे समाधान आपल्याला तर मिळतेच वर खाणारे सुद्धा समाधानाने वाहवा करतील तो आनंद वेगळाच.





किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

# मालदीवला ६४, ४९४ टन साखर निर्यातीची परवानगी

आधुनिक केसरी

**५ एप्रिल रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार सरकारने द्विपक्षीय व्यापारांतर्गत २०२४-२५ या कालावधीत साखर आणि इतर जीवनावश्यक वस्तू जसे की अंडी, बटाटे, कांदे, तांदूळ, गव्हाचे पीठ, डाळ, स्टोन एग्रीगेट आणि नदीची वाळू मालदीवला निर्यात करण्यास परवानगी दिली आहे. भारत सरकार आणि मालदीव सरकार यांच्यातील करार अधिसूचनेनुसार, सरकारने ६४,४९४ टन साखरेला परवानगी दिली आहे. अधिसूचनेमध्ये असे म्हटले आहे की मालदीवमध्ये वरील वस्तूंच्या निर्यातीला २०२४-२५ दरम्यान विद्यमान किंवा भविष्यातील कोणत्याही निर्बंध/प्रतिबंधातून सूट दिली जाईल. साखरेचे उत्पादन कमी झाल्यामुळे सरकारने चालू हंगामात इतर देशांना होणारी साखर निर्यात रोखली आहे.**

**देशातील साखरेचे उत्पादन ३०२ लाख टनांवर :-** दि. १ एप्रिल पर्यंत देशातील साखरेचे उत्पादन ३०२ लाख टनांवर पोहचले. मागील वर्षी याच कालावधीमध्ये ३०० लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते. महाराष्ट्र आणि कर्नाटकात साखरेचे उत्पादन वाढले. तर गुजरात आणि तमिळनाडूमध्ये साखरेचे उत्पादन घटले. महाराष्ट्रातील जवळपास १५१ साखर कारखान्यांनी आपला गळीत हंगाम पूर्ण केला. या कालावधीत १०५२ लाख टन ऊसाचे गाळप करून १०५० लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

**संयुक्त अरब अमिरातला १०,००० टन कांद्याच्या निर्यातीसाठी अनुमती :-** केंद्रसरकारने संयुक्त अरब अमिरातला १०,००० टन कांद्याच्या निर्यातीसाठी अनुमती दिली. हा कांदा मागील १४,४०० टनाच्या निर्यात कोटा व्यतिरिक्त असेल. प्रत्येक तिमाही मध्ये ३६०० मेट्रिक टन कांद्याची निर्यात संयुक्त अरब अमिरातला निर्धारित करण्यात आली आहे. ही निर्यात राष्ट्रीय सहकारी लिमिटेड यांच्याकडून होईल. आता या आठवड्यात सरकारही बफर साठण्यासाठी ५ लाख टन कांद्यांची खरेदी सुरु करेल परिणामी कांद्याच्या भावात २ ते ३ रुपये प्रति किलोची वाढ दिसून येऊ शकते. मागणी, उत्पादन आणि पुरवठा पाहता कांद्याचे भाव १५ ते २० रुपये प्रतिकिलो दरम्यान स्थिर राहतील असे वाटते .

**भारताकडून बांगलादेशला होणारी निर्यात :-** देशांतर्गत बाजारपेठेतील गहूची उपलब्धता वाढविण्यासाठी केंद्र सरकारने मे २०२२ मध्ये गहूच्या निर्यातीवर बंदी घातली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये बिगर बासमती तांदळाची निर्यात रोखली. निर्यातबंदीचा सर्वात जास्त फटका बांग्लादेशला बसला. बांग्लादेश भारताकडून बिगर बासमती तांदूळ, गहू, कांदा, आले आणि लसूणची आयात करू इच्छितो. भारत सरकारसोबत एक निश्चित साठा आयात करण्यासाठी करार केले जाणार आहेत. ज्यामुळे निर्यात बंदी आणि निर्यातीवरील नियंत्रणाचा कोणताही प्रभाव न पडता बांग्लादेशला निर्यात होऊ शकेल. बांग्लादेशने साखरेचीही मागणी भारताकडून केली आहे.

मलेशियाने भारताकडे ५ लाख टन तांदळाची मागणी :- केंद्र सरकारने तांदळाच्या निर्यातीवर प्रतिबंध लावले आहेत. त्या नंतर मलेशियाला १ लाख ७० हजार टन तांदळाच्या निर्यातीस अनुमती दिली. आता पुन्हा मलेशियाच्या अन्नसुरक्षा विभागाकडून ५ लाख टन तांदळाची मागणी करण्यात आली आहे. सरकार यातील काही अंशी तांदळाच्या निर्यातीला मंजुरी देऊ शकते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बिगर बासमती तांदळाचे भाव वाढले आहेत.

**पाम तेलाची आयात घटली :-** ब्राझीलसह मलेशियामध्ये पामतेलापासून बायोडीझेलची निर्मिती सुरु केली आहे. परिणामी पामतेलाच्या भावामध्ये सातत्याने वाढ होत आहे. भाव अधिक असल्यामुळे पामतेलाची आयातही घटली आहे. तर सोयाबीन, सुर्यफूल तेलाची आयात मात्र वाढत चालली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या तुलनेत मार्च महिन्यामध्ये सुर्यफूल तेलाची आयात ५१% रएअ सोयाबीन तेलाची आयात २७% नी वाढली. पामतेलाच्या आयातीत मात्र ३.३% ची घट दिसुन आली. पामतेलाची आयात तर मागील १० महिन्यातील निच्चांकी स्तरावर पोहचली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पामतेलाचे भाव १ हजार २० डॉलर प्रतिटन इतके आहेत. तर अर्जेंटिनामध्ये १ हजार डॉलर प्रतिटनापर्यंत भाव सुरु आहेत.

**गहूचा साठा नोंदविणे अनिवार्य :-** देशातील FCI कडे असलेला गहुचा बफरसाठा मागील ७ वर्षातील निच्चांकी स्तरावर पोहचला आहे. सरकारकडून जोराने खरेदी सुरु आहे. या हंगामात ३७० ते ३७५ लाख टन गहूची खरेदी सरकार करु शकते. यासोबत आटा मिल, गहूचे व्यापारी आणि पुरवठ्यामध्ये काम करणा-यांना आपल्याजवळील गहूचा साठा सरकारकडे नोंदविणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्रीय अन्न मंत्रालयाने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार मार्च महिन्यात ३१ मार्च २०२४ पर्यंत गहूची सरकारी खरेदी २.५६ लाख टन इतकी झाली आहे. जी मागील वर्षीच्या ९८,५०० टन खरेदीपेक्षा अडीच पट जास्त आहे. ३१ मार्चपर्यंत एकूण गहूची ३१% खरेदी झाली होती. मागील वर्षी याच कालावधीत १३% हून कमी गहूची खरेदी झाली होती. यावर्षी ३२० लाख टन गहू खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तथापि अन्न मंत्रालयाने ३७० लाख टन गहू खरेदी होण्याची शक्यता वर्तविली आहे.

**बफर साठ्यासाठी कांदा खरेदी :-** केंद्र सरकार बफर साठ्यासाठी ५ लाख टन कांदा खरेदी करणार आहे. नाफेड आणि NCCF कडून पुढील आठवड्यापासून कांद्याची खरेदी बाजार भावाप्रमाणे केली जाणार आहे. सध्या कांद्याला सरासरी १३.५० ते १४ रुपये प्रतिकिलो इतके भाव मिळत आहेत. यामध्ये आणखी २ ते ३ रुपयांची सुधारणा नजिकच्या काळात होऊ शकते.

**अमेरिकेमधील मक्याचे लागणक्षेत्र :-** अमेरिकेच्या कृषी खात्याने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार अमेरिकेमधील मक्याचे लागणक्षेत्र ५% ने घटून ९०० लाख एकरवर पोहचण्याची शक्यता वर्तविली आहे. तर सोयाबीनचे लागणक्षेत्र ३% ने वाढून ८६५ लाख एकरपर्यंत पोहचण्याची शक्यता वर्तवली आहे. मक्यामधील कमी उत्पादकतेमुळे लागणक्षेत्र घटताना दिसत आहे. तर शेतकरी उत्पादन खर्चही कमी करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत.

**उन्हाळ पिकांचे लागणक्षेत्र :-** देशात उन्हाळ



पिकांचे लागण क्षेत्र ४३.८१ लाख हेक्टरवर पोहोचले आहे. कृषी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार भाताची पेरणी १०% ने वाढून २८.४२ लाख हेक्टरवर पोहोचले. कडधान्याचे लागणक्षेत्र २४% ने वाढून ६.३५ लाख हेक्टरवरून ७.७२ लाख हेक्टरवर पोहोचले. तर तेलबियांचे क्षेत्र ४% ने वाढून ७.६७ लाख हेक्टरवर पोहोचले. केंद्रीय कृषी मंत्रालयाने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार देशात कडधान्याचे लागण क्षेत्र २४ टक्के ने वाढले. तर तेलबियांचे लागणक्षेत्र ४ टक्के ने अधिक आहे. भाताचे लागण क्षेत्र मागील वर्षापेक्षाही १० टक्के अधिक आहे. दरवर्षी सिंचनाखालील क्षेत्र वाढत असल्यामुळे रब्बी आणि उन्हाळ पिकांचे लागण क्षेत्र वाढत आहे. यावर्षी तर पाणी कमी असतानाही आश्चर्यकारक रित्या लागणक्षेत्र वाढण्याची आकडेवारी येत आहे.

**इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी :-** इथेनॉल उत्पादनात वापरण्यासाठी केंद्र सरकारकडून मक्याच्या खरेदीवर जोर देण्यात येत आहे. केंद्र सरकारकडून मक्याला २,०९० रुपये प्रतिक्विंटल किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे. सध्या मक्याला किमान आधारभूत किमतीपेक्षा जास्त भाव मिळत असून इथेनॉल निर्मितीसाठी डिस्टीलरीजन मका पुरवणाऱ्या एजेंसी शेतकऱ्यांकडून प्रचलित बाजारभावाऐवजी किमान आधारभूत किमतीवर खरेदी करण्ण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे मका खरेदीमध्ये अडचणी येत आहेत.

**सोयाबीनला ४३०० ते ४४०० रुपये प्रति क्विंटल भाव :-** सोयाबीनला अपेक्षित भाव मिळत नसल्यामुळे बहुतांश शेतकरी अजुनही सोयाबीन विक्री करताना दिसत नाहीत. सध्या राज्यात सोया मिलला ४७०० ते ४७८० रुपये प्रति क्विंटल इतके भाव मिळत आहेत. पण, खुल्या बाजारपेठेत ४३०० ते ४४०० रुपये प्रति क्विंटल इतके भाव मिळत आहेत. मागील वर्षी याच काळात ५४०० रुपये प्रति क्विंटल इतके सरासरी भाव मिळत होते. मागील वर्षीच्या तुलनेत सोयाबीनला १५ टक्केने कमी भाव मिळत आहेत. नजीकच्या काळात सोयाबीनच्या भावात मोठ्या हालचालीची शक्यता नाही

**ब्राझीलमधील सोयाबीनची काढणी ७५% पूर्ण :-** ब्राझील मधील सोयाबीनची काढणी वेगाने सुरु आहे. १ एप्रिल पर्यंत जवळपास ७५% क्षेत्रावरील सोयाबीनची काढणी पूर्ण झाली. अनुकूल वातावरणामुळे ब्राझील मधील सोयाबीनचे उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत ४३ लाख टनांनी वाढून १५६५ लाख टनांवर पोहचण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ब्राझील मधील सोयाबीन लागण क्षेत्रातही साडे सात लाख हेक्टरने वाढ झाली होती. **उन्हाळा लागणक्षेत्र :-** सोमवार दि. १ एप्रिलपर्यंत महाराष्ट्रातील उन्हाळ पिकांचे लागणक्षेत्र ३ लाख ३४ हजार ५६२ हेक्टरवर पोहोचले. मागील वर्षी याच कालावधीत राज्यभरात उन्हाळ पिकांचे लागणक्षेत्र ३ लाख १४ हजार ३६५ हेक्टर होते. तृणधान्याखालील एकूण क्षेत्र २ लाख ३६ हजार ४९२ हेक्टरवरून २ लाख ५० हजार ७५५ हेक्टरवर पोहोचले. उन्हाळ भात पिकाखालील क्षेत्र १ लाख ६१ हजार ८९७ हेक्टरवरून घटून १ लाख ५६ हजार २०८ हेक्टरवर पोहोचले. मक्याखालील क्षेत्र ४०,६५९ हेक्टरवरून ४१,०९९ हेक्टरवर पोहोचले. कडधान्याखालील क्षेत्र १,३६२ हेक्टरवरून ६९८ हेक्टरवर पोहोचले आहे. तेलबियांखालील क्षेत्र ७१,६९६ हेक्टरवरून ७७,७२३ हेक्टरवर पोहोचले आहे.

**गहू खरेदी :-** केंद्रसरकारने कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी ३१ मार्च २०२४ नंतरही नियातबंदी लागू केली आहे. त्याचप्रमाणे आता गहूच्याही वाढत्या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रसरकारकडून प्रयत्न चालू आहेत. केंद्रसरकारने जागतिक आणि देशांतर्गत व्यापा-यांना एप्रिल महिन्यात थेट शेतकऱ्यांच्याकडून गहू खरेदी न करण्याची विनंती केली आहे. परिणामी भारतीय अन्न महामंडळला (FCI) ला गहूचा कमी असणारा साठा वाढवण्यासाठी मदत होऊ शकते. सध्या खुल्या बाजारपेठेत गहूला २५००-२६०० रुपये प्रतिक्विंटल दरम्यान भाव मिळताना दिसत आहेत. **अमेरिकेतील द्राक्ष उत्पादन :-** अमेरिकेतील द्राक्ष शेतीची उलाढाल ६० हजार कोटींची आहे. दरवर्षी ४५०-४७० कोटी लिटर वाईन उत्पादन केले जाते. जवळपास ११ हजार वाईनरीमधून जागतिक उत्पादनाच्या १२% उत्पादन एकट्या अमेरिकेत केले जाते. सर्वाधिक वाईनचे उत्पादन कॅलिफोर्नियामध्ये केला जातो. सध्या मात्र अतिरिक्त उत्पादनाचा परिणाम होत आहे. उत्पादनाच्या तुलनेत खपत कमी झाली आहे. कोविडपासून वाईनचा साठा वाढत चालला आहे. यासाठी तेथील संघटनेने द्राक्ष उत्पादनाखालील क्षेत्र कमी करण्याचे आवाहन केले आहे. यासोबत बेदाणा आणि खाण्यासाठी द्राक्षही बनवली जातात. यावर्षी जवळपास २५-३० हजार एकर वरील द्राक्षक्षेत्र कमी केले जाऊ शकते.

**पिवळा वाटाण्याच्या करमुक्त आयातीसाठी मुदतवाढ :-** केंद्र सरकारने पिवळा वाटाण्याच्या करमुक्त आयातीसाठी आणखी दोन महिन्याची मुदतवाढ दिली. जून २०२४ पर्यंत करमुक्त आयात होऊ शकते.या करमुक्त आयातीची मुदत एप्रिल महिन्यात संपणार होती. देशातील मागणीची पूर्तता करण्यासाठी चणा, मसूर, उडीद, कबुली चणा, तुरीची आयात मोठ्या प्रमाणात केली जाते, तर पिवळा वाटण्याची आयात रशिया आणि कॅनडामधून केली जाते.



# महिला भाविकांची सोन्याची बांगडी प्रामाणिकपणे केली परत

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** ६ एप्रिल रोजी गुंटूर, आंध्रप्रदेश येथील साईभक्त के. राजेंद्र श्रीनिवास हे साईबाबा दर्शनाकरिता आलेले होते. ते एक हजार रूम भक्तनिवास येथे कुटुंबासह राहणेस होते. आज सकाळी ते ८,३० वाजता शनी शिंगणापूर येथे दर्शनाला गेले असता त्यांचे लक्षात आले कि, हातात घालायची सुमारे २० ग्राम वजनाची सोन्याची बांगडी किंमत एक लाख चौतीस हजार रु किमतीची भक्तनिवास येथे रूम किंवा बाहेर कुठेतरी विसरले आहेत. त्यांनी फोन करून सुरक्षा अधिकारी यांना कळविले, साईबाबा संस्थान चे सुरक्षा रक्षक . प्रवीण भागवत हे तात्काळ त्यांचे रूम मध्ये गेले त्यावेळी तेथे साफ सफाईची काम चालू होते. तेथील सर्व कर्मचारी बोलावून घेऊन त्यांनी ती सोन्याची बांगडी शोधून ऑफिस येऊन जमा केली. शनी शिंगणापूर वरून साईभक्त आल्यानंतर त्यांची ओळख पटवून सोन्याची बांगडी साईभक्ताला परत दिली. त्यावेळी भक्त अतिशय भावुक झाले आणि शिर्डीत साईबाबांची लीला पाहून साईबाबांवरील श्रद्धा अधिक दृढ झाली. सुरक्षा रक्षक श्री प्रवीण भागवत यांच्या या चांगल्या कामाबद्दल श्री साईबाबा संस्थान चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तुकाराम हुलवळे सुरक्षा पोलीस उपनिरीक्षक. रोहीदास माळी. यांनी शाबासकी दिली. सदर प्रामाणिक कर्मचारी श्री प्रवीण भागवत यांना संरक्षण ऑफिस ला बोलावून घेऊन त्यांचा यथोचित सन्मान केला.

# भाजपच्या स्थापना दिनानिमित्त वृद्धाश्रमात फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** भाजपच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने नेवासा खडका रोडवरील शरणपूर वृद्धाश्रमात फळांचे वाटप करून स्थापना दिन साजरा करण्यात आला. तसेच वृध्दाश्रमाला विविध योजनांच्या माध्यमातून हातभार लावण्याचा निर्धार ही यावेळी करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या धडाकेबाज कार्यामुळे देशाची आण बाण शान जगात वाढली असे गौरवोदगार इंजिनियर सुनीलराव वाघ यांनी यावेळी बोलताना काढले.

यावेळी वृद्धाश्रमात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी इंजिनियर सुनीलराव वाघ हे बोलत होते. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पेचे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भाजपचे पदाधिकारी श्रीकांत बर्वे, सचिन भांड, गोरखनाथ बेहळे, रोहित पवार,शंकर कनगरे, किरण दारुंटे, सतीश गायके, अनिल परदेशी, प्रतीक शेजुळ यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी यावेळी भाजपचे नेते दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

यावेळी वृद्धाश्रमाचे मार्गदर्शक सुधीर चव्हाण यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले तर वृद्धाश्रमाचे चालक रावसाहेब मगर यांनी प्रास्ताविक करतांना स्वबळावर सुरू असलेल्या वृद्धाश्रमाला अनेक योजनांचा लाभ देऊन हातभार कसा लागेल यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावा असे आवाहन केले

यावेळी बोलताना इंजिनियर सुनीलराव वाघ म्हणाले की देशाच्या उन्नती व्हावी या आंतरिक तळमळीच्या भावनेतून पंतप्रधान मोदी यांनी देशासाठी समर्पित असे जीवन केले. राष्ट्र हितासाठी अनेक हितावह निर्णय घेतले. काश्मीर प्रश्नी धडाकेबाज निर्णय घेतले, कोटयावधी भाविकांचे श्रद्धास्थान अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांचे मंदिर निर्मितीसाठी मोठे योगदान दिले त्यामुळे कठीण परिस्थितीत स्थापन झालेल्या भाजप पक्षाने आपल्या कृतिशील कार्यातून साऱ्या जगाचे लक्ष वेधले,पंतप्रधान मोदी यांच्या कार्यामुळे देशाची आण बाण शान जगात वाढली असल्याचे गौरवोदगार त्यांनी यावेळी बोलताना काढले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पेचे म्हणाले की भाजपने केंद्रात स्थिर सरकार देऊन देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम केले तसेच भष्ट्राचार मुक्त शासन देण्याचा प्रयत्न केला असे सांगून त्यांनी शरणपूर वृद्धाश्रमात वास्तव्यास असलेल्या भाजपच्या महिला मोर्चाच्या माजी तालुकाध्यक्षा श्रीमती इंदूबाई गिरी यांचे पालकत्व भाजप स्थापना दिनाच्या निमित्ताने स्विकारतो असे जाहीर केले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृद्धांचे दर्शन घेऊन फळांचे वाटप करण्यात आले. वृद्धाश्रम व्यवस्थापक संतोष मगर यांनी आभार मानले.



# निवडणूक निरीक्षकांचा परतूर, घनसावंगी दौरा

आधुनिक केसरी न्यूज




**घनसावंगी :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने परभणी लोकसभा मतदार संघात परतूर व घनसावंगी विधानसभा मतदार संघातील निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा शुक्रवारी मुख्य निवडणूक निरीक्षक कृष्णकुमार निराला , निवडणूक निरीक्षक (पोलीस) डॉ. विष्णुकांत आणि निवडणूक निरीक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांनी घेतला. घनसावंगी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित या आढावा बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ , जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शशिकांत हदगल, उपविभागीय अधिकारी मनिषा दांडगे, उपविभागीय अधिकारी दिपक पाटील आदींसह निवडणूकीशी संबंधित विविध कामकाजाचे नोडल अधिकारी उपस्थित होते. तत्पूर्वी येताना निवडणूक निरीक्षक यांनी आष्टी, ता परतूर येथील स्थिर पथकास भेट दिली.

सदर दौ-यादरम्यान मुख्य निवडणूक निरीक्षक कृष्णकुमार निराला व सर्व अधिकारी यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील स्ट्रॉंग रुमला भेट दिली. ज्या ठिकाणाहून मतदान पथके मतदान केंद्रावर रवाना होणार, त्या जागेची पाहणी केली . पोलींग पथके कसे रवाना होणार व जमा कसे होणार या बाबत सविस्तर आढावा घेतला . तसेच निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व सुरळीत वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे. कर्मचा-यांना व्यवस्थित प्रशिक्षण द्यावे . निवडणूकीत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी परस्पर समन्वय ठेवावा, याबाबत सूचना केल्या. जिल्हाधिकारी जालना डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी PPT द्वारे निवडणूक कामकाजाविषयक सादरीकरण केले . दोन्ही मतदार संघाबद्दल माहिती दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की परतुर व घनसावंगी मध्ये निवडणूक विषयक नेमणूक करण्यात आलेले सेक्टर अधिकारी, नोडल अधिकारी व विविध कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दोन ते तीन वेळा प्रशिक्षण दिलेले आहे. जिल्ह्यातील सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणजे उपजिल्हाधिकारी यांचे वेळोवेळी प्रशिक्षण घेऊन त्यांचेमार्फत निवडणूक विषयक कामकाज व्यवस्थितरित्या सुरू आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप ( SWEEP ) कार्यक्रमा अंतर्गत जिल्हाभरात विविध उपक्रम सुरू आहेत . ज्यामध्ये पालकांचे संकल्प पत्र भरून घेणे, व्हॅन द्वारे जनजागृती करणे इत्यादी बाबी मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध प्रतिबंधात्मक कारवाया याबद्दलची माहिती दिली. तसेच निवडणूक निरीक्षकांना आश्वासित केले की जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीने कायदा व सुव्यवस्थेचा कोठेही भंग होणार नाही, याबाबत पुरेपूर दक्षता घेतली जाईल. निवडणूक निरीक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांनी स्थिर पथक, व्हिडिओ टीम, लेखा समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच सूचित केले की, खर्चाचा हिशोब व्यवस्थितरीत्या ठेवावा. कोणत्याही उमेदवाराची एकही बैठक सोडू नका , सर्व ठिकाणचे खर्च बघा , त्याबद्दलच्या नोंदी ठेवा , अशा सूचना केल्या. निवडणूक निरीक्षक (पोलीस) डॉ विष्णुकांत यांनी पोलीस विभागाकडून केलेल्या कारवायांची माहिती घेतली व सुचना केली की पुढील काळात येणारे दोन मुख्य सण म्हणजेच रमजान ईद व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी. निवडणूक प्रक्रिये दरम्यान असे संशयित व्यक्ती ज्यांच्याकडून निवडणूक प्रक्रियेस बाधा येऊ शकते, त्यांना ताब्यात घ्यावे. जेणे करुन निवडणुक प्रक्रीया सुरळीत पार पडेल. यानंतर मुख्य निरीक्षक कृष्णकुमार निराला यांनी विविध सूचना केल्या . त्यांनी सर्वांना आवाहन केले की मतदारांना जास्तीत जास्त आवाहन करून यावेळी 75 टक्के मतदान होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे . मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्र अधिकारी व इतर अधिकारी यांच्या प्रशिक्षणात कोणतीही कमतरता राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत सर्व अधिकाऱ्यांना सांगितलं. सर्व मतदान केंद्रांवर सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध राहतील यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. मतदान अधिकाऱ्यांना पिण्याचे पाणी , उत्तम जेवणाची व्यवस्था , लाईट, स्वच्छतागृह मिळेल याची दक्षता घ्यावी . मास्टर ट्रेनर यांनी मतदान अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देताना त्यांच्या मनात कोणतीही शंका राहणार नाही, याची दक्षता घ्यावी . अशा अनेक सुचना करुन मतदान सुरळीत पार पडेल याबाबत माझी खात्री आहे, आणि तुम्ही पार पाडाल असा विश्वास दर्शविला. सदरची बैठक व्यवस्थित रित्या पार पडावी यासाठी अपर जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी विशेष मार्गदर्शन केले, आमच्या शंकाचे निरसन केले, असे सहायक निवडणूक अधिकारी दीपक पाटील आणि मनीषा दांडगे यांनी नमूद केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल हे नेहमीच ऑनलाईन बैठका घेऊन मार्गदर्शन करतात, तसेच निवडणूक आयोगामार्फत प्राप्त नवीन सूचना आमच्यापर्यंत पोहोच करतात, ज्यामुळे निवडणूक विषयक कामकाज अगदी उत्तम रीतीने सुरू असल्याबाबत घनसावंगीच्या तहसीलदार योगिता खटावकर यांनी नमूद केले. निवडणूक निरीक्षक यांचा दौरा यशस्वीरित्या पार पडावा यासाठी बैठकीची व्यवस्था करणे , सर्व अधिकारी , कर्मचारी यांचा आढावा घेणे, यासाठी अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# १५ एप्रिलपासून पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर होणार जमा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व परिसरातील बहुप्रतिक्षेत खरिप २०२३ च्या पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांना १५ एप्रिलपासून खात्यावर वर्ग होणार असल्याची माहिती गुरुवारी पीकविमा कंपनीचे जिल्हा समन्वयक हेमंत शिंदे यांनी दिली. दरम्यान, पंधरा एप्रिलपासून सोयगाव तालुक्यातील केवळ नुकसानीच्या ऑनलाइन तक्रारींची पडताळणी झालेल्या शेतकऱ्यांनाच या पीकविम्याचा पहिल्या टप्प्यातील रक्कमेचा लाभ होणार आहे. त्यामुळे पोर्टलवर नुकसानीच्या ७२ तासांत तक्रारी न केलेल्या ऑफलाइन शेतकऱ्यांना पीकविमा कंपनीने वगळले आहे. ऑफलाइन शेतकऱ्यांना खरिपाच्या पीकविम्यासाठी दुसऱ्या टप्प्यासाठी मे महिन्याच्या अखेरीस अथवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

दुष्काळ जाहीर झालेल्या सोयगाव तालुक्याला शंभर टक्के पीकविम्याची नुकसान भरपाई मिळणार असल्याची घोषणा जिल्हा प्रशासनाने केली आहे.

परंतु, पीकविमा कंपनीने पहिल्या टप्प्यात ऑनलाइन तक्रारी केलेल्या २२ हजार ५२४ शेतकऱ्यांचाच समावेश केला होता. त्यानंतर पीकविमा कंपनीने सामूहिक क्षेत्रातील संमती न दिलेल्या कारणावरून काही शेतकऱ्यांचे अर्ज अपात्र ठरविले होते. त्या आशयाच्या पत्रही तालुका कृषी विभागाला कंपनीने दिले आहे. या पत्रात सामूहिक क्षेत्रातील संमती न दिलेल्या व महसूलकडून प्राप्त झालेल्या पीक पेरा अहवालावरून सोयाबीन पिकाच्या पीकविम्याचे अर्ज अपात्र ठरविल्याचे पत्र थेट कृषी विभागाला मार्च महिन्यात दिले होते. या पत्राला पुन्हा कृषी विभागाने अपात्र झालेल्या शेतकऱ्यांच्य संख्येनिहाय कळवावे असे पत्र तालुका कृषी विभागाने उलट टपाली दिले आहे. त्याचे उत्तर न देताच पीकविमा कंपनीने सदर अपात्र ठरविलेल्या शेतकऱ्यांना अपात्र ठरविल्याचे स्पष्ट झाले.

सोयगाव तालुक्यात खरीप पीकविम्यासाठी ५४ हजार शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त आहेत . त्यापैकी पोर्टलवर ऑनलाइन तक्रारी केलेल्या शेतकऱ्यांची अर्ज संख्या २२ हजार ५२४ इतकी आहे . त्यामुळे ऑफलाइन असलेल्या ३१ हजार ५८६ शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगाच्या निकषावरून पीकविम्याचा लाभ मिळणार आहे . त्यासाठी मात्र मे महिन्याच्या अखेरीस अथवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे .पीकविमा कंपनीकडून सामूहिक क्षेत्रात असलेल्या शेतकऱ्यांनी पूर्वसंमती न दिल्याने व महसूल विभागाच्या पीक पेरा अहवालानुसार सोयाबीन क्षेत्राची लागवड नसलेल्या शेतकऱ्यांना पीकविम्यामधून अपात्र करण्यात आल्याचे पत्र दिले होते . परंतु, याबाबत पीकविमा कंपनीला अपात्रतेची ठोस कारणे कळविण्यात यावे असे उलट टपली पत्र दिले, त्याचे अद्यापही उत्तर मिळाले नाही .

**मदन सिसोदिया, तालुका कृषी अधिकारी, सोयगाव**

कंपनीकडून सामूहिक क्षेत्रात व लागवड न करता सोयाबीनचा पीकविमा उतरविलेल्या शेतकऱ्यांना या योजनेतून अपात्र करण्यात आले . त्यामुळे सोयगाव तालुक्यात १५ एप्रिलपासून ऑनलाइन तक्रारींची पडताळणी झालेल्या पात्र शेतकऱ्यांना पीकविमा खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येईल .

**हेमंत शिंदे, जिल्हा समन्वयक, पीकविमा कंपनी, छत्रपती संभाजीनगर .**

# उमेदवारी नाकारल्याने भावना गवळी नाराज

आधुनिक केसरी न्यूज



**वाशीम :** यवतमाळ वाशीम लोकसभा मतदार संघाच्या खासदार भावना गवळी यांची अखेरच्या क्षणी उमेदवारी कापून शिवसेना शिंदे गटाने खासदार हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून खासदार भावना गवळी यांनाच नव्हे तर सर्वांनाच धक्का दिला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यवतमाळ येथे हजर असतानाही गवळी मात्र दूरच राहिल्या. गुरुवारी काही कार्यकर्त्यांसह त्या त्यांच्या निवासस्थानी होत्या. त्यानंतर मात्र रात्री उशीरा यवतमाळ येथून थेट रिसोड येथील स्वगृही दाखल झाल्या. पक्ष त्यांची नाराजी दूर करणार का, त्यांचे पुनर्वसन होणार का, त्या काय भूमिका घेणार, याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. यवतमाळ वाशीम लोकसभा मतदार संघ शिवसेनेचा पारंपरिक गड म्हणून ओळखला जातो. मागील २५ वर्षांपासून खासदार भावना गवळी येथून निवडून येत आहेत. मागील तीन टर्मचा विचार करता त्या भरघोस मतांनी निवडूक जिंकून येत आहेत. भावना गवळी यांनी २००९ मध्ये कॉंग्रेस चे हरिभाऊ राठोठ, २०१४ मध्ये कॉंग्रेसचे शिवाजी राव मोघे तर २०१९ मध्ये कॉंग्रेस च्या माणिकराव ठाकरे यांचा १ लाखाच्या फरकाने त्यांनी पराभव केला होता. अनेक दिग्गज नेत्यांना त्यांनी पराभवाची धूळ चारली होती. मात्र शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात सामील झाल्या. यवतमाळ वाशीम मधून संभाव्य उमेदवार म्हणून त्यांनी तयारीही सुरु केली होती. मात्र शिवसेना शिंदे गटाने संभाव्य उमेदवाराची पहिली यादी जाहीर केली होती. मात्र त्यामध्ये भावना गवळी यांचे नाव नसल्याने व भाजपने केलेल्या अंतर्गत सर्वेमध्ये त्यांच्या नावाला विरोध दर्शवील्याने गवळी यांच्या उमेदवारी वरून तर्क वितर्क लावले जात होते. मात्र उमेदवारी आपल्यालाचं मिळेल, अशी त्यांच्यासह समर्थकांना आशा होती. उमेदवारी करीता त्यांचे अविरत प्रयत्न देखील सुरु होते. मात्र, शेवटच्या क्षणी शिवसेना शिंदे गटाने राजश्री पाटील यांना उमेदवारी जाहीर केल्याने खासदार भावना गवळी व समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली होती. त्या अपक्ष म्हणून लढणार अशीही चर्चा रंगू लागली मात्र त्यांनी पक्षाविरोधात न जाता शांत राहणे पसंत केले.

# सोयगाव तालुक्यात सर्वर डाऊन, शेतकरी त्रस्त पहाटेपासूनच महा-ई-सेवा केंद्रावर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात देव्हारी, फर्दापूर,टिटवी, पळसखेडा, नांदा तांडा, मोलखेडा, हिवरी, चारुतांडा,जामठी, घाणेगाव तांडा, नांदा, सावळदबारासह दोन ते तीन दिवस झाले आहे पण सर्वर डाऊन आहे शेतकरी त्रस्त झाले आहेत.नुकसान भरपाई मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना केवायसी करणे आवश्यक असून अन्यथा आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागू शकते. असल्याची माहिती सोयगाव पंचायत समितीचे सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे.शेतकऱ्यांसाठी महत्वाचे! नुकसान भरपाईसाठी ई-केवायसी करा अशी अट प्रसाशाने घातली आहे.म्हणून E-KYC करणे आवश्यक आहे. सोयगाव अतिवृष्टी, सीव्हीएम आदी नुकसानभरपाईबाबतचे शासकीय अनुदान काही शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा होण्यास सुरुवात होणार आहे. तर काही अनुदान टप्प्याटप्प्यात दिले जात असल्याने नागरिकांना वारंवार बँक खाते केवायसी करावे लागत आहे. संबंधित शेतकऱ्यांना केवायसी करणे आवश्यक असून ज्या शेतकऱ्यांनी केवायसी केली नसल्यास त्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे केवायसी करणे आवश्यक झाले आहे. राज्य आणि केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना देण्यात येणारी विविध प्रकारची मदत ही संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा केली जाते. त्यासाठी बँक खाते क्रमांक व ग्राहक क्रमांकाची पडताळणी केली जाते. ग्राहकाचे नाव किंवा बँक खाते क्रमांक चुकले तर संबंधितांच्या खात्यात सानुग्रह अनुदानाची रक्कम जमा होत नाही. शासनाकडून मिळत असलेली मदत टप्याटप्यात दिली जात आहे. यासाठी सोयगाव तहसील कार्यालयाच्या यादीत लाभार्थ्यांची नावे प्रकाशित केली जातात, ज्यावेळी यादीत नाव येईल, त्या-त्या वेळी लाभार्थ्यांना मिळणा-या शासकीय अनुदानाकरिता तलाठी स्तरावर मिळणारे विशिष्ट क्रमांक टाकूनच स्वतःचे बँक खाते केवायसी करावे लागते, अन्यथा शासनाच्या सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळत नाही.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# महाविद्यालयीन तरुणीचा विनयभंग; आरोपीस कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या राहाता तालुक्यातील रहिवासी असलेल्या महाविद्यालयीन तरुणीचा शिर्डी येथील रहिवासी असलेल्या रिक्षा चालक आरबाज रमजान शेख याने विनयभंग केला असल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.दरम्यान या आरोपीच्या विरुद्ध पोलिसांनी ऍट्रॉसिटी कायद्यांचे कलम लावल्याची माहिती मिळाली असून त्यास जिल्हा व सत्र न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.
भारतीय दंड संहिता कलम ३५४ नुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल करता येतो.कलम ३५४ आणि कलम ५०९ स्त्रियांचे विनयभंगापासून संरक्षण करतात. सदर गुन्हा हा नैतिक अधःपतनांशी संबंधीत मानला जातो.सदर कायदा हा स्त्रियांच्या हितासाठी आहे. तसा तो सार्वजनिक जीवनातील नैतिक आणि सभ्य वर्तनाशी संबंधीत आहे.म्हणून हा कायदा व्यक्तीचा व्यक्तिशी झालेल्या वर्तनापुरता मर्यादीत नसून त्याकडे सार्वजनिक ठिकाणी पाळायची सभ्यता आणि नैतिकता याच्याशी संबंधीत आहे.या गुन्ह्यात तक्रारदार केवळ स्त्री असणे पुरेसे नसून घडलेली घटना ही सदर स्त्रीला लज्जा उत्पन्न करणारी आणि तिच्या सभ्यतेला बाधा आणणारी होती हे न्यायालयात सिद्ध झाले पाहिजे.सदर गुन्हा हा दखलपात्र असून २ वर्षे सक्तमजुरी आणि रू.०२ हजार दंडाची शिक्षा आहे.अशी कायद्यात तरतूद असताना या गुन्ह्यात कमी आलेली नाही हे विशेष !

अशीच घटना कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून यात फिर्यादी तरुणीने गुन्हा दाखल केला असून त्यात म्हटले आहे की,"शिर्डी येथील आरोपी अरबाज शेख याने दि.०२ एप्रिल सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास महाविद्यालयीन दोन तरुणी आपले महाविद्यालय संपल्यावर आपल्या घरी जाताना त्यांनी रिक्षा भाड्याने केली होती.त्या घरी जात असताना आरोपीने हा उद्योग केला आहे.त्याने सदर रिक्षा हि मुंबई-नागपूर या जुन्या महामार्गाने वैजापूर रस्त्याने नेली होती व पुढे कोकमठाण शिवारात एका निर्जन स्थळी नेऊन रिक्षा थांबवून फिर्यादी तरुणीचे मनाविरुद्ध बळजबरीने तिचा हात पकडून तिला काटवनात घेऊन जाऊन तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे.व तिचा विनयभंग केला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. या प्रकरणी तिने आरोपी विरुद्ध कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणी शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने,कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख आदींनी घटनास्थळी भेट दिली आहे.दरम्यान त्यावरून कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात या प्रकरणी आरोपी विरुद्ध नुकताच दि.०२ एप्रिल मार्च रोजी रात्री उशिरा गु.क्रं. १६८/२०२४ भा.द.वि.कलम ३५४,अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियंम १९८९ चे सुधारणा २०१५चे कलम ३(१) (डब्ल्यू)(१)(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास नगर येथील पोलीस अधीक्षक राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली शिर्डीचे पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने हे करत आहेत. रोपीस शिर्डी पोलीस अधिकारी यांनी आरोपीस कोपरगाव येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपीस एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.व आज त्यास न्यायालयीन कोठडीत रवानगी केली असल्याची माहिती हाती आली आहे.दरम्यान या घटनेचा कोपरगाव,राहाता तालुक्यातील पालकांनी निषेध व्यक्त करून आरोपीस कठोर शासन करण्याची मागणी केली आहे.



# गडचिरोली जिल्ह्याला सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्हा हा वनसंपत्ती, खनिज संपत्तीने संपन्न आहे, तरीही या जिल्ह्यात गरिबी आणि बेरोजगारी आहे. पण ही गरीबी दूर करण्याचे काम सुरू झाले आहे. अशोक नेते यांनी खासदार म्हणून अनेक कामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. हा जिल्हा सर्वच बाबतीत सुजलाम सुफलाम करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते चामोर्शी येथे भारतीय जनता पार्टी- शिवसेना- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-आरपीआय-पिरीपा महायुतीचे उमेदवार खासदार अशोक नेते यांच्या प्रचारासाठी आयोजित प्रचार सभेत बोलत होते. या जिल्ह्यातील रस्त्याच्या सोयी, वैद्यकीय सुविधा, पुलांची उभारणी, सिंचनाच्या सोयी, मोबाईल फोनची कनेक्टिव्हिटी, रोजगार अशा सर्वच बाबतीत कामे झपाट्याने सुरू आहेत. त्यामुळे हा जिल्हा समृद्ध, संपन्न महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यात पहिल्या क्रमांकावर राहील, असा विश्वास देतो. या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हाच भारतीय जनता पार्टीचा संकल्प आहे. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, ओबीसी यांचे जीवन बदलविण्याकरिता पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी ताकद लावून अशोक नेते यांना विजयी करा, असे आवाहन ना.गडकरी यांनी यावेळी केले. चामोर्शीतील हरडे कृषी महाविद्यालयात आयोजित या प्रचार सभेत अन्न व औषध प्रशासनमंत्री धर्मरावबाबा यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी अशोक नेते यांना विजयी करण्याचे आवाहन केले. महायुतीचे उमेदवार अशोक नेते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जगात देशाला नंबर वन करायचे असेल तर पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार आणणे गरजेचे आहे असे सांगत गेल्या दहा वर्षात राबविलेल्या कल्याणकारी योजनांबद्दल सांगितले. जिल्ह्यातील रेल्वेमार्गाची मंजुरी, सिंचनाच्या सुविधा, मेडिकल कॉलेज, हवाई धावपट्टी, सुरजागड प्रकल्प आदी कामात माझा मोलाचा वाटा आहे. काँग्रेसचे उमेदवार बाहेरचे पार्सल आहेत. या लोकसभेत त्यांचा कुठलाही संबंध नाही. त्यामुळे विकासाची दृष्टि असलेल्या आणि तुमच्याशी नाळ जुळलेल्या उमेदवाराची निवड करा, असे आवाहन खा.नेते यांनी केले.
या प्रचारसभेच्या सुरुवात करण्यापुर्वी चामोर्शी येथे भाजपाचे युवा नेते स्व. स्वप्निल वरघंटे यांना मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी मंचावर आमदार डॉ.देवराव होळी, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी, लोकसभा विस्तारक बाबुराव कोहळे, लोकसभा समन्वयक प्रमोद पिपरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, युवा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष लिलाधर भरडकर, भाजपचे जिल्हा महामंत्री गोविंद सारडा, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा महामंत्री योगिता पिपरे, किसान आघाडीचे प्रदेश सचिव रमेश भुरसे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष गिता हिंगे, डॉ.चंदा कोडवते, युवा जिल्हाध्यक्ष अनिल तिडके, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अनिल पोहनकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रणय खुणे, जिल्हा उपाध्यक्ष अरुण हरडे, रोशनी वरघंटे, तालुकाध्यक्ष आनंद भांडेकर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष निकू नैताम, शहराध्यक्ष सोपान नैताम, नगरसेवक राहुल नैताम, लौकिक भिवापुरे, दिलीप चलाख, सुरेश शहा, मधुकर भांडेकर, निखील धोडरे, यश गण्यारपवार, तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# तलाठी सजा यांनी घेतले मोलखेडा गावाला दत्तक; सावळदबारा गाव सोडले वाऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** चार वर्षांपासून कायमस्वरूपी तलाठीच नाही सावळदबारा ग्रामपंचायतींचे महसूल कामकाज चालते. राजकीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावळदबारा सजाला गेल्या तिन ते चार वर्षांपासून कायमस्वरूपी तलाठीच सोयगाव तहसील कार्यालयाकडून मिळाला नाही. त्यामुळे डोंगरमाथ्याखालील सावळदबारा, टिटवी पळसखेडा ग्रामस्थांची सात बाऱ्यासह इतर कामकाजासाठी परवड होत आहे. तलाठीच नसल्यामुळे ग्रामस्थांना सजा भोगावी लागत आहे.शेलकर आप्पा तलाठी सजा आहे तर महाशय महिन्यात दोन महिन्यांत एक चक्कर मारता आणि निघून जातात नेहमी मोलखेडा आठ दिवसांतून चकरा मारतात यांना सावळदबारा गाव दिले असल्यावर मोलखेडा गाव दत्तक घेतले आहे का तरी कायमस्वरूपी तलाठी मिळावा, अशी मागणी विजय बाविस्कर यांनी केली आहे.याबाबत माहिती अशी की, सावळदबारा अठरा गावाचे केंद्र बिंदू असून फक्त नावालाच गेल्या तीन ते चार वर्षांपासून गावाला कायमस्वरूपी गावकामगार तलाठीच महसूल विभागाने दिलेला नाही. तर आता कुठे शेलकर आप्पा तलाठी देण्यात आला आहे ते देखील फक्त नावालाच ते सावळदबारा सजासाठी वेळच देऊ शकत नाहीत. पर्यायी या सजाअंतर्गत येणाऱ्या गावांमधील नागरिकांना उतारा कोतवालाकडून करून घ्यावी लागते.मात्र, तलाठी सहीसाठी सोयगाव गाठून दफ्तर घेऊन कोतवालादेखील सही आणावी लागत असल्यामुळे उतारा मिळवायला सात-सात दिवस विलंब होत आहे. तलाठी नसल्यामुळे सावळदबारा ग्रामस्थांना तलाठीच भेटत नसल्यामुळे त्यांची तर नुसतीच पायपीट होत आहे.
कायमस्वरुपी तलाठी सजा दिल्यास नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याचीही काळजी घेतली जाईल.किंवा एका हफतातून तलाठी सजा यांनी दिले पाहिजेत शासनाचा तशा जिआर आहे कोणत्याही अधिकारी कर्मचारी यांनी गावातच थांबण्याचे आदेशाला केराची टोपली समजली असेही माहिती विजय बाविस्कर सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले.
सजाला गावकामगार तलाठी नसल्याने या सजाअंतर्गत येणाऱ्या सहा गावांतील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तर या नागरिकांना तलाठी नसल्याचा मोठा फटका बसत आहे. या सजात काम करणाऱ्या कोतवालावर नागरिकांच्या प्रश्नांना तोंड देण्याची वेळ आली आहे.त्यामुळे महसूल विभागाने नागरिकांची गैरसोय ओळखून कायमस्वरूपी तलाठी नियुक्त करावा अशी मागणी विजय बाविस्कर सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा यांनी केली आहे.



**शेतकरी व विद्यार्थी यांचे अडणारी कामे :** सातबारा फेरफार, चतु : सीमांच्या नकला मिळवणे, दाखल्यातील चूक दुरुस्त करणे, पंचनामे तयार करण्यासाठी, जमीन–घर–फ्लॅट बंगला खरेदी केल्यानंतर खरेदीखताआधारे जुन्या मालकाचे नाव वगळून सातबाऱ्यात नाव नोंदवणे, कर्जासाठी सातबाऱ्यावर बोजा उतरवणे, एकून जमिनीचा दाखला या आणि अशा अनेक दैनंदिन छोट्या–मोठ्या कामांसाठी लोकांना तलाठी कार्यालयांत जावे लागते . पण गावात असलेली कार्यालये केव्हाही बंद राहत असल्याने हजारो शेतकरी व विद्यार्थी यांना उन्हात तान्हात चकरा माराव्या लागतात .
**विजय बाविस्कर, सामाजिक कार्यकर्ते, सावळदबा,रा . ता . सोयगाव**

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त शनिवारी मुंबई प्रदेश भाजपा कार्यालयात भाजपाचे ज्येष्ठ नेते व उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल पद्म भूषण राम नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, सह सचिव भरत राऊत आदी उपस्थित होते.

# उमेदवाराने ज्या माध्यमातून आपले शिक्षण पूर्ण केलें त्याच माध्यमाच्या शाळेवर आध्यापनासाठी त्याची नियुक्ती करणे गरजेचे : उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** प्राथमिक आणि माध्यमिक शाळेमध्ये शिक्षक म्हणून नियुक्ती करताना उमेदवाराचे ज्या माध्यमातून इयत्ता १० वी किंवा १२ वी पर्यंतचे शिक्षण झालेले असेल त्याच माध्यमाच्या शाळेत ते उमेदवार शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यास पात्र समजले जावे. मग त्याने अध्यापन पदविका कोणत्याही माध्यमातून उत्तीर्ण झाले असली तरी, अध्यापन पदविकेचे माध्यम विचारात घेण्यात येवू नये असे आधीचे शासनाचे धोरण होतें तथापि, त्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र. २९५७/२००० व ४१५०/२००० तसेच अन्य याचिकांमध्ये निर्णय देताना मा.उच्च न्यायालयाने प्राथमिक शिक्षक या पदासाठी नियुक्ती देताना केवळ इयत्ता १० वी किंवा १२ वी चे माध्यम विचारात न घेता अध्यापन पदविकेचे माध्यमही विचारात घेण्यात यावे, असा निर्णय दिला होता. या संदर्भात राज्य शासनाने २८.०८.२००१ मध्ये धोरणात्मक निर्णय घेवून ज्या माध्यमातून उमेदवाराने इयत्ता ११ वी अथवा १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतले असेल त्याच माध्यमाच्या शाळेत ते उमेदवार शैक्षणिकदृष्ट्या योग्यरितीने अध्यापन करु शकेल अशी भूमिका घेतली, तथापि या संदर्भात संबंधित नियमामध्ये तरतूद नसल्याने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे सद्यःस्थितीत कार्यवाही करण्याचे शासनाने ठरविले असतानाही पवित्र पोर्टल वर शिक्षक भरती दरम्यान मराठी माध्यमातुन शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना उर्दू माध्यमाच्या शाळेवर अध्यापना साठी सीलेक्ट केलें असल्याने माननीय उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर येथे उर्दू शिक्षकांनी ॲड.राम कारोडे यांच्या मार्फत याचिका दाखल करुन आवाहन देण्यात आले आहे.

सदर याचीका माननीय उच्च न्यायालया समोर सुनावणीस दिनांक ३एप्रिल २०२४ रोजी लागली असता, प्रथम दर्शनी माननीय उच्च न्यायालयाने मराठी माध्यमातुन शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना उर्दू चे अध्यापनाचे काम देने हे राज्य घटनेच्या कलम ३५० (अ) तसेच शासनाच्या आधीच्या धोरणाशी विसंगत असून प्राथमिक शिक्षक/शिक्षण सेवक या पदासाठी उमेदवाराची निवड करताना उमेदवाराने इयत्ता १०वी/१२ वी पर्यंतचे शिक्षण ज्या माध्यमातून घेतले असेल किंवा अध्यापक पदविका ज्या माध्यमातून उत्तीर्ण केली असेल त्यापैकी एका माध्यमाच्या शाळेत उमेदवार अध्यापन करण्यास पात्र असायला पाहिजे असे मत नोंदविले आणि माननीय उच्च न्यायालया ने राज्य शासन, शिक्षण आयुक्त पुणे, संचालक शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण पुणे, तसेच जिल्हा परिषद वर्धा, जिल्हा परिषद बुलढाणा, जिल्हा परिषद अकोला, जिल्हा परिषद अमरावती, नगर परिषद उमरखेड जिल्हा यवतमाळ, नगर परिषद धामणगाव जिल्हा अमरावती यांना नोटीस जारी केल्या आणि संबंधित विषयावर उत्तर सादर करण्यास आदेशित केलें.



# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मिळणार कृतिपुस्तिका



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आदिवासी विकास विभागाच्या सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीत घरी अभ्यास करण्यासाठी कृतिपुस्तिका देण्यात येणार आहेत. 'आदिनिपुण' कार्यक्रमांतर्गत हा प्रकल्प राबविण्याच्या सुचना आदिवासी विकास विभागाच्या आयुक्ता नयना गुंडे यांनी राज्यातील सर्व प्रकल्प अधिका-यांना दिल्या असून त्यानुसार प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत कृतीपुस्तिका देण्यात येणार आहे.

आदिवासी विकास विभागाच्या सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये 'आदिनिपुण' कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाच्या विविध संकल्पनांचा विसर पडू नये व उन्हाळी सुटीचा आनंद घेतांनाच शैक्षणिक प्रवाहाची नाळ तुटु नये, यासाठी हा नाविण्यपूर्ण उपक्रम प्रकल्प कार्यालय चंद्रपूर येथे राबवला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत पहिली ते सातवीच्या कृतिपत्रिका देण्यात येणार आहेत. या कृतिपत्रिकेत विद्यार्थ्यांना मराठी, गणित, सामाजिक, भावनिक, शिक्षण, पर्यावरण अभ्यास अशा विषयांची वर्गनिहाय काठिण्यपातळी, अभ्यासक्रम आणि सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न देण्यातआलेले आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या पूर्वज्ञानाच्या आधारावर अथवा पालकांशी चर्चा करून या कृतिपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे लिहिणे व वर्गशिक्षकाने शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे प्रवेशोत्सवाच्या दिवशी भरलेली कृतिपुस्तिका विद्यार्थ्यांकडून जमा करून तपासणे अपेक्षित आहे.

8 एप्रिल रोजी मिळणार कृतिपुस्तिका : पहिली ते पाचवीच्या प्रत्येक विद्यार्थ्याला सदर उन्हाळी सुट्टीत उपक्रमाचे प्रिंट आउट मिळतील. या अनुषंगाने आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या सर्व मुख्याध्यापकांना तात्काळ सुचित करावे. प्रत्येक विद्यार्थ्याला 8 एप्रिल रोजी कृतिपुस्तिका मिळेल, या दृष्टिने मुख्याध्यापकांनी कार्यवाही करावी. याबाबत आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. पालकांकडून उपक्रमांचे स्वागत : या उपक्रमाचे पालकांकडून स्वागत करण्यात आले असून या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची उन्हाळी सुट्टीत शिक्षणाची नाळ जुळून राहण्यास मदत होणार आहे. शिवाय या उपक्रमांमुळे विद्यार्थी स्वयंअध्ययनाच्या माध्यमातून शिकणार आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, म्हणून आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणा-या या नाविण्यपूर्ण उपक्रमाचे शिक्षण क्षेत्रात स्वागत करण्यात येत आहे.

**प्रकल्प अधिकारी यांच्या सुचना :** वर्गशिक्षकांनी सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थी व पालक यांच्याशी संपर्कात राहावे. कृतिपुस्तिकेच्या सॉप्टकॉपी मुख्याध्यापकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना पोहचतील, याची मुख्याध्यापकांनी दक्षता घ्यावी. झेरॉक्स कॉपीचा खर्च आश्रमशाळा व्यवस्थापन समिती या लेखाशिर्षातून भागविण्यात येण्याच्या सुचना प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी प्रकल्पातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांना दिल्या आहेत.

# मंदिर उभारणीसोबत गावात अभ्यासिका केंद्र उभे करा

## अनेक नम्रता अधिकारी होतील : आमदार कैलास पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** गावातील तरुणांनी पुढाकार घेऊन मंदिरे उभारण्यासोबतच अभ्यासिका केंद्रे हि उभा करावित त्याला लागणारी पुस्तके आम्ही द्यायला तयार आहोत असे आवाहन आमदार कैलास घाडगे पाटील यांनी केले. आंदोरा, ता. कळंब येथील विविध प्रशासकीय स्तरावर स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत नम्रता पौळ (एस. टी. आय वर्ग 2 ), आरती देवकर ( तलाठी पदासाठी निवड ) तर उमेश करडे ( आरोग्य सेवक ) यांचा सत्कार आमदार कैलास घाडगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला अध्यक्षस्थानी. सरपंच श्री. बळवंत तांबारे उपसरपंच दत्तात्रय तांबारे येडाई आयुष व्यसनमुक्तीचे संचालक डॉ. संदीप तांबारे एसबीआय चे मॅनेजर कदम संग्राम देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रस्तावीक करताना डॉ संदिप ताबारे यांनी छोट्याशा गावात कुठल्याही सोयी सुविधा नसताना सुद्धा विद्यार्थी स्पर्धा परिक्षेतून पुढे जात आहेत या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा परिक्षेची पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी आपण गावकरी मिळून प्रयत्न करू व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देवु असे आवाहन त्यांनी केले. तर आमदार पाटील पुढे बोलताना म्हणाले की गावात अभ्यासिका केंद्र उभारण्याची आज काळाची गरज आहे आज गावात अनेक नमृता व आरती आहेत पण त्यांना प्रोत्साहन व स्पर्धा परिक्षेची आवड निर्माण करणे गरजेचे आहे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गावकऱ्यांनी पुढे येवून त्यांना मदत करणे हि काळाची गरज आहे. या वेळी, ग्रामपंचायत सदस्य अशोक गाडे, राहुल लांडगे, राजाभाऊ कवडे दादा कदम, लांडगे किरण कवडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदन तांबारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप लोंढे यांनी केले.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना 'शेअर मार्केटचे प्रशिक्षण'

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लांडेवाडी भोसरी येथील यूपीएससी एमपीएससी अँड आय. बी. पी. एस बँकिंग गायडन्स सेंटर अंतर्गत दिनांक 4 जानेवारी ते 23 जानेवारी दरम्यानच्या कालावधीत "स्टॉक मार्केट अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट कोर्स यशस्वीपणे राबविण्यात आला.कोर्समध्ये सहभागी विद्यार्थ्यांना आज शुक्रवार दिनांक ५ एप्रिल २०२४ रोजी प्राचार्य. बी.एन. पवार, प्राचार्य चिंतामणी, प्राचार्य के. जी. कानडे, प्राचार्य डॉ .श्रेया दानी, डॉ . सुग्रीव आडाल यांच्या शुभ हस्ते कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सर्व विद्यार्थ्यांना देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक दीपक पावडे यांनी केले. सविता रावसाहेब पाटील, मृदुला किंभवने, लोकेश शर्मा डॉ. प्रगती गोरे या विद्यार्थ्यांनी कोर्स मध्ये आलेले अनुभव सर्वांना सांगितले. प्राचार्य बी.एन.पवार यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना शेअर मार्केट व अर्थकरण आणि याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवनावर होणारा परिणाम स्पष्ट केले. "स्टॉक मार्केट अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट कोर्स यशस्वीपणे पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा दिल्या. डॉ. के. जी. कानडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या आयुष्यातील अनुभवाद्वारे शेअर बाजार आणि त्या संदर्भातील समाजामध्ये असणाऱ्या अज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच त्यांनी स्वतःला शेअर मार्केट संदर्भात विद्यार्थी असताना ज्ञान मिळवता आले नाही.परंतु आज प्राचार्य म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ही संधी आशा कोर्सेस द्वारे उपलब्ध करून देऊ शकलो याचे समाधान व्यक्त केले.योग्य प्रशिक्षणाने यशाचा आलेख उंचावू शकतो.असे सुद्धा प्राचार्य. डॉ.के.जी.कानडे यांनी सांगितले.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.अनिल गंभीरे यांनी आभार मानले .




# शेतकऱ्यांच्या हस्ते होणार श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** हिंदू नववर्षाचे औचित्य साधून मंगळवारी दि.९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी नेवासाफाटा ते श्रीराम साधना आश्रम अशी बैलगाडी शोभायात्रा निघणार असून श्रीराम साधना आश्रमातील श्रीराम जन्मोत्सव सोहळयाचे ध्वजारोहण शेतकरी बळी राजांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांनी दिली. श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत स्वामी श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली सदरची बैलगाडी शोभायात्रा निघणार आहे.नेवासाफाटा येथील राजमुद्रा चौकातून गुढीपाडव्याच्या मंगळवारी दि.९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता बैलगाडी शोभायात्रा मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे,या मिरवणुकीत असंख्य बैलगाडया शेतकऱ्यांसह सहभागी होणार आहे.यावेळी मिरवणूकीतील सहभागी शेतकऱ्यांचा सन्मान भगवे फेटे घालून करण्यात येईल. सदरची मिरवणूक वाजत गाजत संभाजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरून दुपारी १२ वाजता श्रीराम साधना आश्रमात येणार आहे. या मिरवणुकीत भाविक ही मोठया संख्येने सहभागी होणार असून श्रीराम साधना आश्रमात मिरवणुकीचा समारोप झाल्यानंतर श्रीरामनवमी श्रीराम जन्मोत्सव सोहळयाच्या निमित्ताने आयोजित किर्तन महोत्सव व रात्री होणाऱ्या रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक यांच्या तुळसी रामायण कथा सोहळयाचा शुभारंभ उपस्थित शेतकऱ्यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण करून करण्यात येणार आहे.



# लूटमार करणाऱ्या टोळीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरालगत मुंबई-आग्रा महामार्गावर लुटमार करणाऱ्या टोळीचा आझादनगर पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून दोघांवर कारवाई करण्यात आली आहे त्यांच्याकडून ५३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करून तीन गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे व इतर आरोपींचा शोध सुरू आहे. जुने धुळ्यातील ज्ञानेश्वर वामन माळी हे दि. २६ मार्च रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास मुंबई-आग्रा महामार्गावरील वरखेडा फाटा जवळील सर्व्हीस रोड लगत त्यांचे मालकीच्या ट्रकला धुण्यासाठी थांबले होते. तेव्हा दुचाकीवर आलेल्या दोघांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्याकडील ८ हजारांचा मोबाईल जबरीने हिसकावून नेला. याप्रकरणी शुक्रवारी आझादनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार माळी यांनी चोरट्यांच्या केलेल्या वर्णनाप्रमाणे यापुर्वी देखील वरखेडी फाटा येथे जबरी चोरीच्या घडलेल्या घटनांचा पोलिस निरीक्षक निवृत्ती पवार त्यांच्या शोध पथकाने आढावा घेतला. त्यानुसार गुन्हे करणारे आरोपी हे सराईत असल्याने दररोज वरखेडी फाटा व महामार्ग उड्डाण पुलावर सर्तक पेट्रोलींग करून आरोपीतांचा शोध सुरू केला. त्यादरम्यान हा गुन्हा अर्शद शाह लियाकत शाह (रा. काझीचे शेत, नटराज टॉकीज जवळ धुळे) व त्याचा साथीदारांनी केल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. त्यानुसार दि. ४ रोजी पथकाने अर्शद शाह यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हा गुन्हा साथीदार अरबाश शाह सुबराती शाह (रा. काझी प्लॉट, धुळे) यांच्यासह केल्याची कबुली देत लुटीतील ८ हजारांचा मोबाईल काढून दिला. तसेच अर्शद शाह पोलिस कोठडीत साथीदार अब्दुल फरहान अब्दुल खालीद (रा. मेमनजमातखाना समोर, वडजाई रोड, धुळे) व अरबाश शाह सुबराती शाह याच्यासह मोहाडी पोलीस ठाणे हद्दीत रानमळा रोड, पाटीलवाडा हॉटेल तसेच रेसीडेन्सी हॉटेल जवळ दोन दुचाकी, ६० हजारांची रोकड व एक मोबाईल जबरीने लुटल्याची कबुली दिली. अर्शद शाह याने साथीदारांसह मोहाडी पोलिस ठाणे हद्दीत यापुर्वी केलेल्या तीन गुन्हयांची उकल करण्यात आली. त्याचा साथीदार अब्दुल फरहान अब्दुल खालीद या देखील गुन्हयात अटक करण्यात आली. दरम्यान दोघांकडून ८ हजारांचा मोबाईल, २० हजारांची एमएच-१८-एजे- ९३५३ व २५ हजारांची एमएच-१८ बीक्यु-९१४८ क्रमांकाची दुचाकी व गुन्हा करते वेळी वापरलेला धारदार व दाते असलेला चॉपर असा एकूण ५३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, सहाय्यक पोलीस अधिक्षक एस. ऋषिकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली आझाद नगर पोलिस ठाण्याचे पीआय निवृत्ती पवार, मोहाडी पोलिस ठाण्याचे पीआय शशिकांत पाटील व त्यांच्या पथकातील पीएसआय समाधान सुरवाडे, पोहेकॉ योगेश शिरसाठ, गौतम सपकाळे, शांतीलाल सोनवणे, संदीप कढरे, अनिल शिंपी, अझरुद्दीन शेख, पंकज जोंधळे, मकसुद पठाण या पथकाने केली.





# विहीर पुनर्भरण, नाला खोलीकरण, बांध, शेती सपाटीकरण कामांना वेग

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कानडगाव-मंहमदपूर, विरमगाव, भांडेगाव, सुलतानपूर, खांडीपिंपळगाव येथे मिशन -५००,कोटी लिटर जलसाठा पाच पाटील टीम चाळीसगाव तथा शेतकरी यांच्या संयुक्तमाने गावागावांत शेती जलबचत व शेतीचे विविध कामांना वेग आला आहे. सदर कामे रात्रंदिवस जोरात सुरू असल्याचे चित्र आहे. जेसीबी मशीन आमचा डिझेल तुमचा एकमेका साहाय्य करू... या धर्तीवर रोटरी क्लब ऑफ चेंबूर मुंबई. मिशन -५०० कोटी लिटर जलसाठा पाच पाटील टीम चाळीसगाव तथा शेतकरी यांच्या संयुक्तमाने गावागावांत शेतालगत बांध करणे, विहिर पुनर्भरण, नाला खोलीकरण रूंदीकरण, गाळ काढणे,शेती सवानीकरण आदि विविध शेती कामे रात्रंदिवस जोरात सुरू आहे. दि.२१रोजी शेतकऱ्यांची बैठक चर्चा करत शेतीकामांना प्रारंभ करण्यात आला होता. आजरोजी रात्रंदिवस कामांचा धडाका सुरू आहे.

# यशस्वी होण्यासाठी सत्कर्मी असावे

## पूज्य स्वामी आत्मानंद सरस्वती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील CSMSS छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अध्यात्मिक गुरु व वेदांत आश्रम, इंदोर येथील पुज्य स्वामी आत्मानंद सरस्वती यांनी 'भगवत गिता' या विषयावर उद्‌बोधनपर विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यामध्ये त्यांनी भगवतगितेचे विवेचन करताना आजच्या युगामध्ये लागू पडणाऱ्या व मनुष्य जातीला दिशा देणाऱ्या महत्वपूर्ण बाबींचा उल्लेख केला. ज्यामध्ये मानवी मूल्यांची जोपासना, आत्मचिंतन, आत्म प्रबोधन, ज्ञान संकलन, दृढनिश्चय इत्यादी बाबीवर विवेचन केले. आजच्या धक्काधकीच्या व स्पर्धेच्या युगात अध्यात्म व दृढनिश्चय याशिवाय मानवाला जीवनाचा खरा आनंद घेता येणार नाही. यानंतर त्यांनी भगवत गिता व सर्वसमावेशक नेतृत्व कौशल्य याविषयी सांगताना त्यांनी भगवत गीतेतील नेतृत्व कौशल्य पूरक अशा मार्गदर्शक श्लोकांचा संदर्भ दिला. शेवटी त्यांनी सत्य हे वैश्विक असून तुमचे कर्म हेच तुमच्या आयुष्याची दिशा ठरवते. यशस्वी होण्यासाठी व जिवनाचा आनंद घेण्यासाठी माणसांनी सत्कर्मी असावे, तसेच मला काय मिळाले, त्यापेक्षा मी या जगाला काय  देवू शकतो. याचा विचार प्रामुख्याने करणे अपेक्षित आहे. पुज्य स्वामी आत्मानंद सरस्वती यांचा सत्कार CSMSS छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे विश्वस्त समीर मुळे यांनी केला तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सी. आय. आय. मराठवाडा अध्यक्ष उद्योजक सुनील किर्दक यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी एन. एस. बी. टी. चे संचालक हर्ष जाजु, CSMSS प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार, विभाग प्रमुख व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. मनोज मते यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. संजय कुलकर्णी यांनी केले.




# आंबेडकरी कार्यकर्त्यांनी निष्ठेने काम करावे : भदंत पंयाबोधी थेरो

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आंबेडकरी चळवळीत काम करीत असतांना फुले शाहू आंबेडकरांची प्रेरणा आणि विचारधारा अत्यंत महत्त्वाची आहे. स्वार्थ आणि दलबदलू प्रवृत्तीमुळे आंबेडकरी चळवळीचे नुकसानच झाले आहे. ते होऊ द्यायचे नसेल तर आंबेडकरी कार्यकर्त्यांनी निष्ठेने काम केले पाहिजे असे प्रतिपादन येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांनी केले. ते शहरातील पोलिस मुख्यालयानजिकच्या देगाव चाळ परिसरातील बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघ, साहित्यिक प्रज्ञाधर ढवळे, पत्रकार भैय्यासाहेब गोडबोले, गंगाधर शिराढोणकर, राहुल गायकवाड, विजय हनुमते, सुभाष लोखंडे, शोभाबाई पवार, प्रतिभा गोडबोले, निर्मलाबाई पंडित, शिल्पा लोखंडे, सोनाबाई राजभोज, आम्रपाली कदम आदींची उपस्थिती होती. येथील साहित्यिक प्रज्ञाधर ढवळे यांच्या वाढदिवसानिमित्त देगाव चाळ परिसरातील प्रज्ञा करुणा विहारात धम्मदेसना आणि खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित बौद्ध उपासक उपासिकांना धम्मदेसना देतांना भदंत पंयाबोधी थेरो म्हणाले की, बुद्धाने चार प्रकारच्या स्वभावाचे लोक सांगितले. त्यात पहिला फक्त स्वतःसाठी जगतो. दुसरा स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी जगतो, तिसऱ्या प्रकारचे लोक हे स्वतः व कुटुंबासाठीही काहीही करीत नाहीत. ते बुद्धाच्या मते, कांहीच कामाचे नसतात. मात्र चौथ्या प्रकारचे लोक हे स्वतःसाठी, कुटुंबासाठी तसेच समाजासाठी जगतात. आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून काम केल्यास आंबेडकरी चळवळ अधिक मजबूत होईल अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बालिकांनी केलेल्या याचनेवरुन भिक्खू संघाने उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. त्यानंतर स्तंभलेखक तथा पत्रकार भैय्यासाहेब गोडबोले यांनी मनोगत व्यक्त करताना प्रज्ञाधर ढवळे यांच्या सामाजिक, शैक्षणिक तथा



सांस्कृतिक कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर माता रमाई आंबेडकर महिला मंडळाच्या वतीने ढवळे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. भिक्खू संघानेही बुके देऊन मंगल कामना व्यक्त केल्या. भिक्खू संघाच्या आशिर्वाद गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली. सुभाष लोखंडे आणि शिल्पा लोखंडे यांच्या पुढाकाराने उपस्थित उपासक उपासिकांना खीरदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला मंडळाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष लोखंडे यांनी केले तर आभार प्रज्ञाधर ढवळे यांनी मानले. कार्यक्रमाला स्त्री, पुरुष आणि बालक बालिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# ज्ञानेश्वर महाराज मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** हिंदू नववर्षाच्या निमित्ताने नेवासा येथील संत श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले असून त्यानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहातील रात्री आयोजित किर्तन सोहळयाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.
संत महंतांच्या मार्गदर्शनाखाली व नेवासा गावचे भूमीपत्र व आळंदी येथील हभप नारायण महाराज नजन यांच्या नेतृत्वाखाली सदरचा अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या सोहळयामध्ये पहाटे काकडा भजन,सकाळी विष्णू सहस्त्रनाम, सकाळी ७.१५ ते ११.३०,या वेळेत सामुदायिक ज्ञानेश्वर पारायण होत आहे चंद्रकांत महाराज मुळे हे पारायण व्यासपीठ प्रमुख म्हणून सेवा देत आहे.
११ ३० ते १ यावेळेत महाप्रसाद,दुपारी ४ ते ५ नाम जप, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ यावेळेत होणाऱ्या किर्तन महोत्सवात नामवंतांची कीर्तने व त्यानंतर महाप्रसाद होत आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने मंगळवारी दि.९ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता ग्रामगुढीची ग्रंथराज ज्ञानेश्वरीसह शोभायात्रा मिरवणूक निघणार आहे यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन हभप नारायण महाराज नजन यांनी केले आहे.
ग्रामगुढी शोभायात्रेचा समारोप संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात झाल्यानंतर श्री क्षेत्र आळंदी येथील हभप पदमाकर महाराज पाटोळे यांच्या काल्याच्या किर्तनाने आठ दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.हिंदू नववर्षाच्या निमित्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात होणाऱ्या पारायणाचा व रात्री कीर्तनाचा होणाऱ्या कीर्तनाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सोहळा संयोजक हभप नारायण महाराज नजन यांनी केले आहे.



# कायाकल्प योजनेत निंभोरे उपकेंद्र प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** शासनाच्या स्वच्छ भारत अभियानास अनुसरुन आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने आरोग्य विभागासाठी सुरू केलेल्या कायाकल्प उपक्रमात निंभोरे उपकेंद्राने प्रथम क्रमांक मिळविला आहे. उपकेंद्राची बाह्य व अंतर्गत स्वच्छता आणि संसर्ग नियंत्रणाच्या मानकांच पालन करून अनुकरणीय कामगिरी राबवलेल्या सार्वजनिक आरोग्य सुविधांना प्रोत्साहित देण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. संपूर्ण तालुक्यात असणाऱ्या आरोग्य संस्थांमध्ये उपकेंद्र निंभोरे नी हा पुरस्कार मिळवून वेगळा ठसा उमटवला आहे. उपकेंद्राच्या डॉ.शैलजा कदम समुदाय आरोग्य अधिकारी यांनी यासाठी भरपूर कष्ट घेतले असून त्यांना डॉ.अनिल कदम प्रा.आ.केंद्र तरडगाव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच डॉ. कोंडके प्रा.आ.केंद्र साखरवाडी यांचे सहकार्य लाभले.तसेच उपकेंद्र निंभोरे टीम एम पी डब्ल्यू धायगुडे,आरोग्यसेविका मोनिका कांबळे,आशा स्वयंसेविका मदतनीस यांनीही योगदान दिले.

# सोबलगाव लघुपाटबंधारे धरणाच्या पाळूवरुन हायवाने साहित्याची ने-आण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे सोबलगाव येथील सोबलगाव लघुपाटबंधारे धरणाच्या पाळूवरुन हायवाने साहित्याची ने-आण होत असल्याने धरणाची पाळु दबली तर पाळुवरुन सार्वजनिक रस्ता नसतांना पाडळी सोबलगाव शिवार डोंगरा लगत होत असलेल्या केटीचे व इतर ठिकाणी हायवा येथून ये जात करत असल्याने नागरिकांनी हायवा थांबवून रस्ता वापरू नका धरणाची तुटफुट झाल्यास भविष्यात आमची शेती नष्ट होईल असा इशारा दिला.मात्र येथील जलसंपदा विभागाचे अधिकारी कर्मचारी झोपेत असुण त्यांना न घेणं न देणं वरिष्ठांनी याकडे लक्ष देवून हा प्रकार थांबवावा अशी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे. जलसंपदा विभाग अंतर्गत शाखाधिकारी पाटबंधारे लघु प्रकल्प छ संभाजी नगर मौजे सोबलगाव ता.खुलताबाद. येथे लघुपाटबंधारे धरण असुण धरण सद्या कोरडा पडला आहे. तर सोबलगाव व पाडळी शिवारात डोंगरालगत दोन केटी बांध होत आहे.तर व इतरत्र कामे सुरू आहे. धरणावर कुणी राहत नसल्याने कामांवर साहित्याची जसे खडी सिमेंट वाळु दगडी चुरा व इतर साहित्य ने आण साठी मोठा हायवा वाहनधारक रस्ता म्हणून सोबलगाव लघुपाटबंधारे धरणाच्या पाळुचा बिनधास्त



वापर करत आहे.ज्यामुळे पाळु दबून खाली जात आहे.यासंदर्भात शेतकऱ्यांनी हायवा थांबवून पाळुवरुन हायवाची ये जा करु नका भविष्यात धरणाची पाळु फुटून खाली आमच्या शेती पाण्याने वाहून नष्ट होवू शकते.तरीही बिनधास्त पणे वाहतूक सुरु असुण येथील अधिकारी कर्मचारी झोपेत असल्याचे चित्र असुण त्यांना न घेणं न देणं नौकरी पगार सुरु आहे बाकी नुकसान शेतकऱ्यांचा होईल? त्यांना काय? याकडे वरिष्ठांनी लक्ष घालून हा प्रकार थांबवावा व सार्वजनिक रस्ता म्हणून वापरत असलेला पाळुचा रस्ता जड वाहनांसाठी बंद करावा असी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.

# पंकजांसमोर आता ज्योती मेटेंचे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** दिवंगत मराठा नेते विनायक मेटे यांच्या पत्नी आणि शिवसंग्राम संघटनेच्या अध्यक्षा ज्योती मेटे याही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. महाविकास आघाडीकडून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तबही झालं होतं. परंतु, अचानक बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनवणे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. परंतु, मी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन राजकारणात सक्रिय होणार असल्याचं त्यांनी याआधीच सांगितलं होतं. त्यामुळे महाविकास आघाडीने उमेदवारी न दिल्याने त्यांची आता पुढची दिशा काय असणार याबाबत त्यांनी संवाद साधला आहे.
ज्योती मेटे यांनी बीड दौरा केला. या दौऱ्यात त्यांना तुफान प्रतिसाद मिळाला. याबाबत त्या म्हणाल्या, जनतेचं आणि कार्यकर्त्यांचं प्रेम पाहून भारावून गेले आहे. यामुळे जबाबदारीचं ओझं दुप्पट वाढलं आहे. छत्रपती संभाजी नगरहून येथे येण्यास सुरुवात केली. काफिला बनता गेला, तसं एक एक ॲड होत गेला. महाविकास आघाडीने उमेदवारी नाकारल्यानंतर ज्योती मेटे पुढचा निर्णय काय घेणार याबाबत विचारले असता, त्या म्हणाल्या, “सहसंमतीने आणि पूण विचारांअंतीच निर्णय घेतला जाईल. बीडमध्ये चौथ्या टप्प्यात मतदान असल्याने वेळ भरपूर आहे. ही वेळ विचारात घेऊन पुढची पावले निश्चित उचलू. बीडमध्ये तिहेरी लढत रंगण्याची शक्यता आहे. महायुतीकडून पंकजा मुंडे आणि महाविकास आघाडीकडून बजरंग सोनवणे अशी उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत. त्यामुळे ज्योती मेटे यांनीही निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतल्यास येथे तिहेरी लढत होईल. या लढतीत काय आव्हान वाटते, याबाबत विचारले असता त्या म्हणाल्या, एकदा शर्यतीत उतरल्यानंतर जिंकण्यासाठीच उतरले पाहिजे या मानसकितेची मी आहे.

# आश्वासनाची पूर्तता होत नसल्याने पुन्हा उपोषणाची तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात होत असलेले रस्ता खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण कामे,पुल कामे निकृष्ट दर्जाहिन तथा अनेक त्रुट्या राहत असल्याने बाजार सावंगी येथे जेष्ठ समाजसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालय समोर विभाग विरुद्ध आमरण उपोषण सुरु केले होते.याची दखल विभागाने घेवून हा सर्व प्रकार थांबवून ठेकेदारांकडून अंदाज पत्रक नुसार व दर्जेदार कामे करुन घेण्याची व कुठलाही त्रुट्या न ठेवण्याचा आश्वासन देवून आमरण उपोषण सोडवले होते. मात्र पुन्हा तेच येरे माझ्या मागच्या तसाच प्रकार सुरू असल्याने पुन्हा आमरण उपोषणची तयारी सुरू झाली आहे.
बाजार सावंगी ते इंदापूर ते चिकलठाणा हद्द पर्यंत ८-१०पुलकामे, सावंगी ते ताजनापूर चौफुली ३पुलकामे,सावंगी ते झरी बोडखा वडगाव ते जैतखेडा हद्द पर्यंत ६-७पुल कामे, व इत्ररत्र पुलकामे झालेले व होत असलेल्या कामां संदर्भात शाखाभियंता उपाभियंता कार्यकारी अभियंता ते अधिक्षक अभियंता पर्यंत होत असलेल्या व झालेल्या कामांतील त्रुट्या संदर्भात माहिती देवून चौकशी ची मागणी करण्यात आली होती. मात्र त्याकडेही विभागाने दुर्लक्ष केल्याने जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे यांनी बाजार सावंगी येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले होते.तेव्हा उपविभागीय कार्यालयाने याची दखल घेऊन ठेकेदाराकडून सर्व कामे अंदाज पत्रकांनुसार व नियमांनुसार करून घेण्याचे लिखित आश्वासन दिले होते. मात्र त्यात काही बदल होतांना दिसत नाही. त्यांचे येरे माझ्या मागच्या.. प्रमाणे सुरु आहे. होत असलेल्या कामांवर माहिती फलक न लावणे, खाजगी सर्व कामांवर वाळु मिळते वापरही सुरु आहे.मात्र विभागांच्या ठेकेदाराना वाळु ऐवजी सर्रासपणे दगडी पावडर चा वापर करून देण्यात येत आहे, पुलाच्या मागे पुढे कामांवर खडीमुरूम तथा डांबरी ने रस्ता सवान लेवल न करणे,खाली पुलाचा पाया करताना थातुरमातुर कोरडी खडी चुरा टाकुन त्यावर सरळ सळाई बांधणी करून भराव करणे, पुलाचे काम झाल्यावर कठाड्याला रंगरंगोटी न करणे,पुलाच्या मागे पुढे दोन्ही बाजूला खाली खडी मुरुमचा भराव न करता थातुरमातुर माती ने भराव करणे, खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण रस्ता काम झाल्यावर सिल्कोट व रस्त्याच्या दुतर्फा कडेला मुरमी भराव न करणे आदी एक ना अनेक त्रुट्या कामांत असताना कामाचे बिलाची अदायगी कसी होते. यासंदर्भात सतत तक्रार द्वारे वरिष्ठा पर्यंत पाठपुरावा करून ही काहीच कारवाई होत नाही उलट ठेकेदारांचे हित व लाभ देण्याचा प्रयत्न सुरु असतो. सदर नीधी शासन व जनतेचा असताना बोगसगिरी का खपवून घेतले जात आहे.याची जिल्हाधिकारी यांनी चौकशी समिती नेमून तालुक्यातील कामांची पाहणी चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.व त्याकरीता विभाग व वरिष्ठ अधिकारी प्रशासनाला अवगत करण्यासाठीं पुन्हा नव्याने आमरण उपोषण करण्याची तयार होत आहे.



# भाजपाची पक्षप्रवेश व प्रचारात आघाडी तर काँग्रेसचे मनोमिलन

आधुनिक केसरी




निवडणुकीच्या रणसंग्रामातील धुराळा आता चांगलाच उडायला लागला आहे . या धुरळामध्ये भाजपने पक्षप्रवेशाचा धडाका उडवून दिलेला आहे . तर , दुसऱ्या बाजूला निवडणूक प्रचारात आघाडी घेत नितीन गडकरींची सभा व रविना टंडन यांचा रोड शो आटोपला असून येत्या आठ तारखेला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विराट सभा घेत प्रचारामध्ये आघाडी घेतलेली आहे .
दुसऱ्या बाजूला काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर आणि वडेट्टीवार यांच्यामध्ये मनोमिलन होऊन ताई शंका घेण्याचे कारण नाही मी प्रचाराला येणार असा विश्वास प्रतिभा धानोरकर यांना देत सरकार आल्यानंतर मात्र मला चांगले खाते मिळाले पाहिजे असं थेट पक्षश्रेष्ठींच्या समोरच आपली नाराजगी प्रकट करत धानोरकरांच्या सोबत मात्र मनोमिलन केल्याचे चित्र चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये दिसत आहे .
लोकसभा 2024 च्या निवडणुकीतील पहिल्या टप्प्यातील निवडणूक 19 एप्रिल रोजी होत असून यात चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्राचाही समावेश आहे . त्या दृष्टिकोनातून भाजप आणि काँग्रेस दोघांनीही प्रचाराची वेळ आणि वेग वाढविला असून येत्या काही दिवसांमध्ये मोठमोठ्या नेत्यांच्या सभा या ठिकाणी होतील अशी अपेक्षा आहे . महाराष्ट्रातील हेविवेट नेते सुधीर मुनगंटीवार विरुद्ध प्रतिभा धानोरकर असा हा सामना असून या सामन्यांमध्ये सुधीर मुनगंटीवार यांनी उमेदवारी जाहीर होतात प्रचारामध्ये आघाडी घेतली तर धानोरकर आणि वडेट्टीवार यांच्या धुमश्चक्रीमुळे उमेदवारी घोषित करण्यासच काँग्रेसने बराच वेळ घेतला . असे असले तरी काँग्रेसने सुद्धा आता घरोघरी प्रचार करत आपली दिशा स्पष्ट केली आहे . शिवाय पाच तारखेला चंद्रपूर मध्ये झालेल्या सभेत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश निरीक्षक रमेश चेंनिथला , महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना पाटोले , अ. भा. काँग्रेस कमिटी सरचिटणीस मुकुल वासनिक यांच्यासह महाराष्ट्रातील विरोधी पक्ष नेते असलेले विजय वडेट्टीवार यांनी सुद्धा या सभेला यावं म्हणून पक्षाच्या उमेदवार असलेल्या प्रतिभा धानोरकर यांनी जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांच्यासह



थेट ब्रह्मपुरी गाठली . आणि विजय वडेट्टीवार यांना या सभेला येण्याचे आमंत्रण दिले . वास्तविक पाहता उमेदवारी मिळवण्यावरून या दोघांमध्ये टोकाचे वाद निर्माण झालेले होते . त्यामुळे दोघांमधून विस्तवही जात नव्हता . याचाच परिणाम म्हणून धानोरकर यांनी भव्य शक्ती प्रदर्शन करत अर्ज नामांकन दाखल केले त्यावेळी मात्र वडेट्टीवार हे अनुपस्थित राहिले. परंतु , धानोरकरांनी दोन पावलं मागे येत थेट ब्रह्मपुरी ला वडेट्टीवार यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेत या सभेला येण्याचे आमंत्रण दिले . आणि वडेट्टीवार यांनी सुद्धा या सभेला



येऊन ताई शंकेचे कारण नाही मी प्रचाराला येणार म्हणून धानोरकरांना आश्वस्त केले . उमेदवारी मागणे हा प्रत्येकाचा अधिकार असतो परंतु उमेदवारी मिळाल्यानंतर आता वाद नाही आता मी प्रचाराला येणार असं आश्वासन त्यांनी भर सभेमध्ये धानोरकरांना दिलं . त्यामुळे धानोरकर आणि वडेट्टीवार यांच्या मनोमिलन झालेले असल्यामुळे आता ही निवडणूक प्रचंड अटीतटीची होणार असे चिन्ह दिसायला लागले आहे.
तर , दुसऱ्या बाजूला मात्र स्थानिक आमदार असलेले किशोर जोरगेवार यांची साथ अजूनही मुनगंटीवार यांना मिळालेली नाही. किंबहुना मुनगंटीवार यांनी " जोरगेवरांनी आता मला मदत केली नाही तर नंतर मी त्यांना मदत करणार नाही "असे म्हणत जोरगेवारांना थेट इशाराच दिलेला आहे. प्रतिभा धानोरकर आणि वडेट्टीवार यांच्या वादात धानोरकर यांनी दोन पावले मागे येत वडेट्टीवार यांची भेट घेत राजकारणातील प्रगल्भता दाखवून दिलेली आहे . तर दुसऱ्या बाजूला मुनगंटीवार जोरगेवार वादामध्ये मुनगंटीवार यांनी थेट जोरगेवारांना इशारा दिल्यामुळे जोरगेवार आता नेमकी काय भूमिका घेतील ? आणि 72 हजारा हून अधिक जास्त मतांची आघाडी घेत चंद्रपूर विधानसभेत निवडून आलेल्या जोरगेवारांची यंग चांदा ब्रिगेड आता नेमकी कोणती भूमिका घेणार ? यावर ही निवडणूक मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे .वास्तविक पाहता भारतीय जनता पार्टीच्या पक्ष प्रवेशाच्या धोरणामुळे वडेट्टीवार यांचे यांचे उजवा हात म्हणून ओळख असलेले प्रकाश देवतळे यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर वडेट्टीवरांचा मुनगंटीवार यांना छुपा पाठिंबा तर नाही ना ? अशी चर्चा चंद्रपुरात रंगू लागली होती परंतु पाच तारखेला झालेल्या सभेमध्ये उपस्थिती आणि धानोरकरांना दिलेलं आश्वासन यामुळे मुनगंटीवार दिल्लीला पोहोचतील की धानोरकर त्यांचा मार्ग अडवतील याकडे आता चंद्रपूरकरांचे लक्ष लागले आहे.



# एम.बी.बी.एस. परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल अनुज कांबळे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** शिरवळ येथे फुले -शाहू -आंबेडकर विचार प्रसारक मंडळ यांचे वतीने मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते नामदेव कांबळे यांचे चिरंजीव अनुज कांबळे यांनी टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबई या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस शेवटची परीक्षा प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करीत अभिनंदन करण्यात आले.खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठान चे सचिव व शिरवळ जिमखानाचे अध्यक्ष डॉ विजय शिंदे यांचे शुभहस्ते हा सत्कार करण्यात आला.
या कार्यक्रमात फुले- शाहू- आंबेडकर विचार प्रसारक मंडळ भोर चे अध्यक्ष प्रा.डॉ.रोहिदास जाधव ,केएनपी व्हेटर्नरी कॉलेज चे जनसंपर्क अधिकारी नितीन कदम, दंतवैद्यक डॉ. विलास खरात यांनीही त्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या यावेळी मंडळाचे स्वप्निल बनसोडे,शरद खुंटे,प्रवीण जावळे व इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांनीच अनुज कांबळे यांचे अभिनंदन केले. तसेच या यशाबद्दल अनुज यांचे शिरवळ सह पंचक्रोशीतून अभिनंदन होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत नामदेवराव कांबळे यांनी आपली दोन्ही मुलगी व मुलगा यांना वैद्यकीय क्षेत्रामध्ये उच्च विद्याविभूषित केले.त्यांनी रिक्षा व्यवसाय, चायनीज हॉटेल असे छोटे व्यवसाय करून अनुज याचे शिक्षण पूर्ण केले.हे अभिनंदनीय आहे.अनुज यांनीही आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून आपल्या वडिलांना मदत करत हे शिक्षण पूर्ण केले.म्हणूनच हे यश कौतुकास्पद आहे.असे डॉ.विजय शिंदे यांनी म्हटले.

# गुढीपाडव्याला महिलांची बाईक रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** गुढीपाडव्याचे औचित्य साधून मंगळवार दि. ९ एप्रिल रोजी लोणंद फेस्टिव्हल,एव्हरेस्टवीर प्राजित परदेशी मित्र समूह व परिवर्तन ग्रुप ऑफ लोणंद तसेच लोणंद वुमन बाईक रॅली यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वूमन बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.मराठी वर्षाचे स्वागत एका अनोख्या उपक्रमातून गेली दोन वर्षापासून लोणंद शहरात होत असते.गेल्या दोन वर्षाच्या यशस्वी बाईक रॅली नंतर यावर्षी भव्य अशी बाईक रॅली लोणंदकरांना पहावयास मिळणार आहे. प्रथम येणाऱ्या चारशे महिलांना प्रवेश मोफत असून त्यांना दोनशे रुपयांचा बॉक्स पॅक फेटा मोफत देण्यात येणार आहे.तसेच नविन येणाऱ्या माहिलांना दोन हजार रुपये किमतीचे डिस्काउंट वाउचर कुपन देण्यात येणार आहे.त्याच बरोबर प्रत्येक सहभागी महिलेस प्रमाणपत्र आणि फ्री किचेन देण्यात येणार आहे. सर्वोत्कृष्ठ पेहराव करणाऱ्या एका महिलेस वुमन बाईक रॅली २०२४ क्वीन पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असून सहभागी महिलांना गिफ्ट व्हावचर, किचेन व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.या वर्षीही मराठी नववर्षाचा सन गुढीपाडवा बाईक रॅली काढत,डान्स मस्ती, सेल्फी पॉईंट, मोफत कोल्ड ड्रिंक्स, प्रोफेशनल फोटो ग्राफर, ड्रोन कॅमरा शुटींगच्या माध्यमातून साजरा होत असून लवकरात लवकर नाव नोंदणी करावी असे आवाहन एव्हरेस्टवीर प्राजीत परदेशी,प्रज्ञा संतोष खरात,रजनी शिंदे, शैलजा खरात, डॉ. स्वाती शहा, रजनी शिंदे,दर्शना रावळ,मनिषा कुदळे,वैशाली गवळी यांनी केले आहे.

# स्पर्धा परीक्षेत यश; बार्टीच्या ५४ विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज




**लोणंद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे या महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी यु.पी.एस.सी. तसेच एम.पी.एस.सी. मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येते.तसेच मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणी परीक्षेकरीता पात्र झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य दिले जाते.महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा 2022 परीक्षेच्या निकालात बार्टीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.उपजिल्हाधिकारी,पोलीस उपअधीक्षक,तहसिलदार या पदांसह एकूण 23 गट-अ व गट-ब पदांच्या ६२३ जागांसाठी निवड यादी जाहीर करण्यात आली. या निकालात बार्टी संस्थेच्या एकूण ५४ विद्यार्थ्यांची निवड झाली असून यामध्ये ५ पोलीस उप-अधीक्षक,३ सहा.राज्यकर आयुक्त,१ तहसिलदार,५ मुख्याधिकारी,१ शिक्षणाधिकारी,१३ उपशिक्षणाधिकारी, ८ सहा.गट विकास अधिकारी अशा गट-अ व गट-ब पदांचा समावेश आहे.महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा २०२२ च्या परीक्षेमधून देखील ११ विद्यार्थ्यांची सहाय्यक अभियंता,स्थापत्य,गट-ब पदाकरीता निवड झाली आहे.तसेच सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, दुय्यम निबंधक श्रेणी १/ मुद्रांक निरीक्षक अशा पदांकरीता घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये देखील बार्टीच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. बार्टीचे महासंचालक सुनिल वारे व विभाग प्रमुख स्नेहल भोसले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

# ‘चुनाव’ लघुपटाच्या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून या लोकशाहीत मतदानाला अत्यंत महत्व आहे. प्रत्येक पात्र नागरिकांनी आपला मतदान हक्क बजावला पाहिजे, या उद्देशाने चंद्रपूर जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्वीप मोहिमेअंतर्गत अनेक उपक्रम राबविले जात आहे. याचाच एक भाग म्हणून स्थानिक आदिवासी कलाकारांचा समावेश असलेला आणि संपूर्ण चित्रीकरण चंद्रपूर जिल्ह्यात झालेल्या ‘चुनाव’ या लघुपटाच्या माध्यमातून जीवती तालुक्यात मतदानाबाबत विशेष जनजागृती करण्यात येत आहे.
चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गम अशा जीवती व गोंडपिपरी तालुक्यातील स्थानिक आदिवासी समाजाला सोबत घेऊन जीवतीचे तहसीलदार अविनाश शेंबटवाड यांनी लेखन व दिग्दर्शन केलेला ‘चुनाव’ हा लघुपट सध्या मतदार जनजागृतीसाठी गावोगावी सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यात येत आहे. दुर्गम भागातील लोकांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी हा उपक्रम जीवती तहसीलतर्फे राबवण्यात येत आहे. या अंतर्गत जिवती, शेनगाव, पुडीयाल मोहदा, भोलापठार, महाराज गुडा, परमडोली या व इतर गांवामध्येसुध्दा सदर लघुपट दाखवण्यात येत आहे. विशेष म्हणजे स्थानिक कलाकारांचा सहभाग आणि आपल्याच जिल्ह्यातील चित्रीकरण असल्यामुळे या लघुपटाचे लोकांमध्ये आकर्षण आहे. मतदान करण्याची इच्छाशक्ती जागृत करणे, हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. लोकशाहीमध्ये निवडणुकीचे महत्व तसेच आदिवासी संस्कृतीचे उत्तम सादरीकरण या लघुपटातून करण्यात आले आहे. देशाच्या उज्वल भविष्यासाठी आणि सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे, असा संदेश यातून देण्यात आला आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन जीवती तालुक्याचे परिविक्षाधीन तहसीलदार अविनाश शेंबटवाड यांनी केले आहे. छायाचित्रण -अजय घाडगे, ध्वनी -अजिंक्य जुमले, संकलन -अथर्व मुळे, संगीत -तन्मय संचेती, सहायक दिग्दर्शन -सुरज वामन, कॅमेरा सहाय्यक -प्रणय भोयर व निर्मिती व्यवस्थापन -विराज टकले यांनी केले आहे. यामध्ये मुख्य भूमिका दिव्या राऊत, नानाजी कवाडे, गजानन रंगारी, सुवर्णा खर्डे, पोसुबाई कोडापे, लक्ष्मीबाई मडावी, झाडू मडावी, सोनेराव कुंभारे, मारुबाई कोडापे, कानुबाई मडावी आणि कान्हळगाव व कोलमगुडा येथील गावकऱ्यांनी केली आहे.

